सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
धाराशिव
शनिवार, १८ एप्रिल २०२६ । वर्ष ४ थे अंक ४१ । पाने १२ । किंमत रु. ८/-
■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शनिवार, १८ एप्रिल २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



स्वतः विचार करणे, स्वतः योजना तयार करणे आणि त्याची कार्यवाही करणे - अशा प्रकारच्या चिंतनाच्या आणि कार्यवाहीच्या प्रक्रियेत जेव्हा स्वयंसेवक सहभागी होतील तेव्हा त्यांच्या मनात स्वाभाविकपणे शाखेविषयी आपुलकी वाढेल. योजना तयार करण्याची आणि त्याची कार्यवाही करण्याची त्यांची क्षमता वाढेल आणि त्यातून नवीन नवीन कार्यकर्ते मिळण्यास मदत होईल.

**- हो. वे शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

# मातृशक्तीचा विश्वासघात

## महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत नामंजूर

**◆ नवी दिल्ली, १७ एप्रिल**
**लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारे नारी शक्ती वंदन अधिनियम (१३१ वी घटनादुरुस्ती) विधेयक दोन तृतीयांश बहुमतांच्या अभावी लोकसभेत पारित होऊ शकले नाही. मतदानाच्या काही तास अगोदर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विधेयक मंजूर करण्यासाठी सहकार्य करण्याचे केलेल्या आवाहनाला विरोधकांनी प्रतिसाद दिला नाही. विधेयकाच्या बाजूने २९८ तर विरोधात २३० मते पडली. एकूण ५२८ खासदारांनी मतदानात भाग घेतला. दोन तृतीयांश बहुमतासाठी ३५२ मतांची आवश्यकता होती.**

| ५२८ | २९८ | २३० | ३५२ |
|---|---|---|---|
| एकूण सदस्यांचे मतदान | विधेयकाच्या बाजूने | विरोधात मतदान | मंजुरीसाठीची संख्या |

गुरुवार आणि शुक्रवारी या घटनादुरुस्ती विधेयकावर प्रदीर्घ चर्चा झाली. शुक्रवारी रात्री साडेसात वाजता मतदान झाले. विरोधकांच्या आडमुठ्या धोरणामुळे सत्ताधारी आकड्यांची जुळवाजुळव करण्यात अपयशी ठरल्याने विधेयक मंजूर होऊ शकले (शेवटच्या पानावर ▸



महिला आरक्षण घटना दुरुस्ती विधेयक नामंजूर झाल्यानंतर भारतीय जनता पार्टी आणि सहकारी पक्षांच्या महिला खासदारांनी संसदेच्या आवारात विरोधकांविरोधात आंदोलन केले

### महिला शक्ती तुम्हाला क्षमा करणार नाही : अमित शाह



**मतदान सुरू होण्यापूर्वी घटनादुरुस्ती विधेयकावर सरकारची बाजू मांडताना अमित शाह म्हणाले, इंडिया अलायन्स केवळ परिसीमनालाच नाही, तर प्रामुख्याने महिला आरक्षण विधेयकाला विरोध करीत आहे. त्यांनी विधेयकाचा उद्देश स्पष्ट करीत सर्वपक्षीय खासदारांना विधेयकाच्या बाजूने मतदान करण्याचे आवाहन केले. विधेयक फेटाळल्यास मातृशक्ती तुम्हाला क्षमा करणार नाही, अशी टीका गृहमंत्री अमित शाह यांनी केली.**

### आम्ही संविधानावरील हल्ला हाणून पाडला : राहुल गांधी



**जेव्हा लोकसभेत हे विधेयक नामंजूर झाले तेव्हा तुम्ही पंतप्रधानांचा चेहरा पाहिला का? आम्ही संविधानावरील हा हल्ला यशस्वीपणे हाणून पाडला आहे. हे केवळ महिला आरक्षणाचे विधेयक नव्हते, तर भारताची राजकीय रचना बदलण्याचा एक सुप्त मार्ग होता, जो आम्ही ओळखला आणि रोखला, असे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी म्हटले आहे.**

# 'तरुण भारत'च्या पुणे आवृत्तीचे आज लोकार्पण

तरुण भारत पुणे | मुखपृष्ठांचे विशेष प्रदर्शन

**◆ पुणे, १७ एप्रिल**
राष्ट्रीय विचारांचा वारसा जपत शताब्दी पूर्ण केलेल्या 'तरुण भारत' या दैनिकाच्या पुणे आवृत्तीचा लोकार्पण सोहळा उद्या, १८ एप्रिल रोजी आयोजित केला आहे. नागपूर येथील श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेतर्फे संचालित केल्या जाणाऱ्या या दैनिकाच्या पुणे आवृत्ती लोकार्पण सोहळ्याचे अध्यक्षपद राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह भय्याजी जोशी भूषविणार आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज याप्रसंगी प्रमुख अतिथी असतील.

श्री नरकेसरी संस्थेतर्फे संचालित नागपूर तरुण भारतने नुकतीच शताब्दी पूर्ण केली. आता या दैनिकाची पुणे आवृत्ती वाचकांच्या सेवेत रुजू होत आहे. शनिवार, दि. १८ एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० वाजता (शेवटच्या पानावर ▸

### पार्किंगची विशेष व्यवस्था

**» लोकार्पण सोहळ्यासाठी पार्किंगची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूस तसेच गोखले रस्त्यावरील आयएमडीआरच्या प्रवेशद्वाराजवळ दुचाकी व चारचाकी वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.**



श्री नरकेसरी प्रकाशनच्या 'तरुण भारत' या दैनिकाच्या पुणे आवृत्तीचे प्रकाशन होत असल्याचे समजून आनंद झाला. नागपूर तरुण भारतला एक उज्ज्वल वारसा आहे. पुणे आवृत्ती देखील या वारशाला जपेल आणि वाचकांचा विश्वास संपादन करेल, याची मला खात्री वाटते. वृत्तपत्रे ही लोकशाहीचा चौथा स्तंभ असून समाजाच्या विचारप्रवाहाला दिशा देणारे एक प्रभावी माध्यम आहे. ही पुणे आवृत्ती केवळ बातम्यांचे साधन न राहता वाचकांच्या विचारविश्वाला समृद्ध करणारी, समाजातील विविध घटकांना जोडणारी आणि लोकशाहीच्या मूल्यांना बळकटी देणारी ठरो, या सदिच्छा! तरुण भारतच्या पुढील वाटचालीस व नव्याने प्रकाशित होणाऱ्या पुणे आवृत्तीसाठी माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा!

**- एकनाथ संभाजी शिंदे,** उपमुख्यमंत्री



अनेक दशकांपासून ध्येयवादी पत्रकारितेचा वारसा जपत मराठी मनाचा आवाज बुलंद करणाऱ्या नागपूर येथील 'श्री नरकेसरी प्रकाशन संस्थे'चे 'तरुण भारत' हे वृत्तपत्र पुण्यातून पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल मी संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. 'तरुण भारत'ने नेहमीच सत्य, राष्ट्रहित आणि प्रबोधन यांचा समतोल साधत राष्ट्रविचारांना प्राधान्य दिले आहे. निःस्पृह लेखणी, अचूक बातम्या आणि सकारात्मक दृष्टिकोनामुळे या वृत्तपत्राचे वाचकांच्या मनात अढळ स्थान निर्माण झाले आहे. पुणे आवृत्ती पुन्हा सुरू झाल्याने वाचकांच्या जुन्या आठवणी जाग्या झाल्या असून त्यांच्या अपेक्षा पूर्ण झाल्याचा आनंद आहे. पुण्याच्या समृद्ध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक परंपरेला बळ देत 'तरुण भारत' विकासाभिमुख आणि राष्ट्राभिमुख विचार अधिक दृढ करेल, असा विश्वास आहे. या नव्या वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा!

**- राधाकृष्ण विखे-पाटील,** जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य



राज्याची सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्यात अक्षय्य तृतीयेच्या पूर्वसंध्येला 'तरुण भारत'च्या पुणे आवृत्तीचा लोकार्पण सोहळा होत असल्याचा मनस्वी आनंद आहे. विचारप्रवर्तक मजकूर, अचूक बातम्या, राष्ट्रीय भूमिका आणि वर्तमान घडामोडींवरील अभ्यासपूर्ण भाष्य ही 'तरुण भारत'ची ताकद आहे. हीच वैशिष्ट्ये पुणे आवृत्तीमध्येही ठळकपणे उमटतील, हा विश्वास आहे.

**- प्रा. राम शिंदे,** सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद

## महत्त्वाचे

### कच्च्या तेलाच्या किमतीत घसरण

**नवी दिल्ली :** इराणने ४९ दिवसांनंतर होर्मुझची सामुद्रधुनी सर्व व्यापारी जहाजांसाठी पुन्हा खुली करण्याची घोषणा केल्यानंतर कच्च्या तेलाच्या किमती जवळपास १० टक्क्यांनी आणि गॅसच्या किमती ८.५ टक्क्यांनी घसरण झाली. जागतिक कच्च्या तेलाचा बेंचमार्क असलेल्या ब्रेंट क्रूड फ्युचर्सच्या दरात १०.८ टक्क्यांची घसरण होऊन ते प्रति बॅरल ८१.२८ डॉलर्सवर आले. अमेरिकेच्या वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट क्रूड फ्युचर्समध्ये ८.८७ डॉलर्सची, म्हणजेच ९.४ टक्क्यांची घसरण होऊन ते प्रति बॅरल ८५.८२ डॉलर्सवर आले. युरोपच्या बेंचमार्क गॅस दरातही सुमारे ८.५ टक्क्यांची घसरण झाली. होर्मुझची सामुद्रधुनी खुली झाल्याने भारताला मोठा दिलासा मिळाला आहे, कारण देशाच्या एकूण कच्च्या तेलाच्या आयातीपैकी ४०-५० टक्के तेल आखाती देशांकडून येते. युद्धादरम्यान होर्मुझच्या सामुद्रधुनीतील नाकेबंदीमुळे, मार्च २०२६ मध्ये भारताची एकूण कच्च्या तेलाची आयात अंदाजे १५ टक्क्यांनी घटली. यामुळे भारताला पुन्हा एकदा रशियाकडे वळावे लागले.

### 'भाजपाचा स्वतःकडे सत्तेचा अमरपट्टा ठेवण्याचा प्रयत्न'

**मुंबई :** लोकसभेत सुरू असलेल्या नारी शक्ती वंदन म्हणजेच महिला आरक्षण विधेयकांवरुन सत्ताधारी आणि विरोधक आमने-सामने आले आहेत. महाविकास आघाडीने या विधेयकातील महिला आरक्षणास आपला पाठिंबा असल्याचे म्हटले. मात्र, महिला आरक्षणाच्या आडून लोकसभा मतदारसंघ पुनर्रचना करण्याचा डाव असल्याची टीका विरोधी पक्षातील प्रमुख नेत्यांनी केली आहे. आता, राज ठाकरे यांनीही डिलिमिटेशनवर जोरदार टीका केली आहे. सत्तेसाठी केंद्र सरकारने या विधेयकामार्फत स्वतःकडे सत्तेचा अमरपट्टा राहील याची तरतूद करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे, असे ते म्हणाले.

# राहुल गांधींवर गुन्हा नोंदवा

## अलाहाबाद हायकोर्टाकडून चौकशीचे आदेश



**◆ लखनौ, १७ एप्रिल**
दुहेरी नागरिकत्वाच्या प्रकरणात काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना कायदेशीर अडचणींना सामोरे जावे लागू शकते. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ न्यायासनाने राहुल गांधी यांच्याविरोधात चौकशीचे आदेश दिले असून त्यानंतर त्यांच्यावर गुन्हा दाखल केला जाऊ शकतो.

अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ न्यायासनाने कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय रद्द करून या प्रकरणात एफआयआर नोंदवून चौकशी पुढे नेण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहे. सुनावणीदरम्यान दोन्ही पक्षांनी न्यायालयासमोर आपले युक्तिवाद सादर केले. प्रदीर्घ चर्चेनंतर, न्यायालयाने चौकशी आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. न्यायालयाने म्हटले की, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावरील दुहेरी नागरिकत्वाच्या आरोपांची चौकशी करणे आवश्यक आहे. हे संपूर्ण प्रकरण कर्नाटक भाजपा नेते विग्नेश शिशिर यांनी दाखल केलेल्या याचिकेतून सुरू झाले. शिशिर यांनी दावा केला होता की, राहुल गांधी यांच्याकडे भारतीय आणि ब्रिटिश दोन्ही देशांचे नागरिकत्व आहे. या आधारावर, त्यांनी रायबरेलीमध्ये एफआयआर दाखल करण्याची मागणी केली होती. (वृत्तसंस्था)

### समाज माध्यमांवर ६० दिवसांसाठी निर्बंध

**◆ जम्मू, १७ एप्रिल**
जम्मू जिल्ह्यात समाज माध्यमांच्या वापरावर ६० दिवसांसाठी निर्बंध घालण्यात आले. जिल्हा प्रशासनाने भडकावू, सांप्रदायिक आणि दिशाभूल करणारा कंटेंट पोस्ट, शेअर किंवा प्रसारित करण्यावर बंदी घातली आहे.

जिल्हाधिकारी डॉ. राकेश मिन्हास यांनी जारी केलेल्या आदेशानुसार, भडकावू, सांप्रदायिक आणि दिशाभूल करणारा कंटेंट पोस्ट, शेअर किंवा प्रसारित करण्यावर पुढील ६० दिवसांसाठी बंदी असेल. हा आदेश भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत जारी केला असून, सार्वजनिक शांतता आणि सांप्रदायिक ऐक्य राखण्यासाठी घेण्यात आला. प्रशासनाच्या मते, अलीकडील काळात समाज माध्यम प्लॅटफॉर्मचा वापर करून खोट्या, उत्तेजक आणि सांप्रदायिक भावना भडकावणाऱ्या पोस्ट मोठ्या प्रमाणावर पसरवल्या जात आहेत. यामुळे कायदा-सुव्यवस्था आणि सामाजिक सलोखा बिघडण्याचा धोका निर्माण झाला. तसेच सभांवरही बंदी घालण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

# युरेनियम सोपविण्यास इराण तयार : ट्रम्प

## करार होईपर्यंत होर्मुझमध्ये नाकाबंदी कायम

**◆ वॉशिंग्टन, १७ एप्रिल**
इराण आपल्याकडील समृद्ध युरेनियमचा साठा सोपवण्यास तयार आहे. इराणने पुढील २० वर्षांहून अधिक काळ अण्वस्त्रे विकसित न करण्याचे आश्वासन दिले असून, जवळपास सर्व अटी मान्य केल्याचा दावा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना केला. शांतता करार होईपर्यंत होर्मुझ जलमार्गात नाकाबंदी सुरूच राहणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले आहे. दुसरीकडे इराणने युरेनियमशी संबंधित ट्रम्प यांचा दावा फेटाळून लावला.



इराण आता अणुकार्यक्रमाबाबत मोठ्या कराराच्या उंबरठ्यावर आहे. इराणने पुढील २० वर्षांपर्यंतअण्वस्त्रे विकसित न करण्याचे आश्वासन दिले असून, अमेरिकेच्या जवळपास सर्व अटी मान्य केल्याची माहिती ट्रम्प यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली. संभाव्य करारावर इस्लामाबादमध्ये अंतिम शिक्कामोर्तब झाल्यास, आपण स्वतः तिथे उपस्थित राहू असेही त्यांनी सांगितले.

दुसरीकडे इराणच्या सरकारी प्रवक्त्याने ट्रम्प यांचा दावा फेटाळत म्हटले की, अण्वस्त्र प्रसारबंदी करारांतर्गत युरेनियम संवर्धन हा आपला वैध अधिकार आहे. युरेनियम आणि अण्वस्त्र विकास कार्यक्रमाशी तडजोड केली जाणार नाही. (वृत्तसंस्था)

### दोन्ही देश कराराच्या जवळ

**» व्हाईट हाऊसमध्ये पत्रकारांशी बोलताना ट्रम्प म्हणाले, इराण आपला समृद्ध युरेनियमचा साठा अमेरिकेला सोपवण्यासाठी तयार झाल्याने दोन्ही देश शांतता कराराच्या खूप जवळ आहेत. चर्चा खूप यशस्वीपणे सुरू आहे आणि कराराची शक्यता खूप जास्त आहे. करार झाल्यास तेलाचा पुरवठा सुरळीत सुरू होईल आणि होर्मुझची सामुद्रधुनी खुली केली जाईल.**

# होर्मुझ सर्वांसाठी खुली : अब्बास अराघची

**◆ तेहरान, १७ एप्रिल**
इस्रायल-लेबनॉन संघर्षविरामाच्या पृष्ठभूमीवर इराणने जागतिक व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला होर्मुझ सागरी मार्ग सुरक्षित वाहतुकीसाठी खुला करण्याची घोषणा केली आहे.

इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अराघची यांनी सांगितले की, संघर्षविरामाच्या काळापर्यंत सर्व व्यापारी जहाजांना विनाअडथळा आणि सुरक्षित प्रवासाची परवानगी देण्यात आली आहे. जहाज आणि तेल टँकरला इराणच्या पोर्ट्स आणि मॅरिटाइम विभागाने निर्धारित केलेल्या मार्गावरूनच प्रवास करावा लागेल. समुद्री व्यापार प्रभावित होऊ नये आणि जागतिक पुरवठा साखळी सुरळीत राहावा, यासाठी इराणने हा निर्णय घेतल्याचे अराघची यांनी सांगितले.

**होर्मुझ सुरक्षित करण्यास युरोप सज्ज**

युरोपीय मित्रराष्ट्र होर्मुझच्या सामुद्रधुनीतील सागरी मार्ग सुरक्षित करण्यास सक्षम आहे. बेल्जियम, नेदरलँड्स आणि फ्रान्ससह अनेक युरोपीय देशांकडे सुरुंग-निवारण क्षमता आहे, जी हा सामरिक जलमार्ग सुरक्षित करण्यास मदत करू शकते, असे फ्रान्सच्या संरक्षण मंत्री कॅथरीन वॉट्रिन यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# आसाराम सराईत गुन्हेगार; दिलासा देणे अशक्य

## गुजरात उच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण

**◆ अहमदाबाद, १७ एप्रिल**
गुजरात उच्च न्यायालयाने शुक्रवारी एक महत्त्वपूर्ण निर्णय दिला. मोटेरा भागातील आसारामच्या आश्रमाशी संबंधित दीर्घकाळ चाललेली कायदेशीर लढाई अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. गुजरात उच्च न्यायालयाने एका न्यायाधीशांच्या आदेशाला आव्हान देणारी आश्रमाची याचिका फेटाळली आहे. या निर्णयामुळे राज्य सरकारला कायदेशीर फायदा मिळाला आहे.

या प्रकरणात उच्च न्यायालयाने टिप्पणी केली की, आसाराम हा सराईत गुन्हेगार आहे. त्याने सातत्याने कायद्याचे उल्लंघन केल्यामुळे त्याला कोणताही दिलासा दिला जाऊ शकत नाही. या कठोर निरीक्षणासह उच्च न्यायालयाने आश्रमाने केलेले सर्व दावे फेटाळून लावले.


**जमिनीचा वापर पायाभूत सुविधांसाठी होणार**

सरकारी वकील जी. एच. विर्क यांनी न्यायालयासमोर युक्तिवाद केला की, मोटेरा भागातील आश्रमाची जमीन सार्वजनिक हितासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. राज्य सरकार ज्या राष्ट्रकुल खेळ आणि ऑलिम्पिकसारख्या जागतिक स्पर्धांचे नियोजन करत आहे, त्या पार्श्वभूमीवर भविष्यात या जमिनीचा वापर क्रीडा-संबंधित पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी केला जाईल.

५०,००० चौरस मीटरपेक्षा जास्त असलेली ही मौल्यवान जमीन आता सरकारला परत केली जाईल आणि तिचा वापर क्रीडा शहर विकसित करण्यासाठी केला जाईल. (वृत्तसंस्था)

# चंद्रपूर जिल्ह्यात प्राण्यांची दुर्मिळ जीवाश्मे

**जागतिक वारसा दिन विशेष** | **अश्मयुगीन अवजारेही सापडली**



**◆ चंद्रपूर, १७ एप्रिल**
महाराष्ट्रात पहिल्यांदाच वर्धा नदीच्या किनारी धानोरा, भोयेगाव पुलाजवळ बायसन, हरिण, डुक्कर व मानवी अल्प जीवाश्मे तसेच पाषाणयुगीन अवजारे सापडली असून, ही शेवटच्या हिमयुगीन, प्लेइस्टेसीन काळातील २० हजार वर्षांदरम्यान अतिशय नवीन प्राण्यांची जीवाश्मे असल्याची माहिती चंद्रपूरचे भूशास्त्र आणि पुरातत्त्व अभ्यासक सुरेश चोपणे यांनी दिली.

आजपर्यंत अशी जीवाश्मे महाराष्ट्रात आढळली नसल्याचा दावा चोपणे यांनी केला आहे. कमी प्रमाणात बायसन व हरणाचे हाड, मानवाच्या पाषाणयुगीन अवजारांसोबत काही मानवाची आणि प्राण्यांची हाडेही आढळली आहेत.

पाषाणयुगीन मानवांची अवजारेसुद्धा या प्राण्यांच्या जवळच आढळली असून, मानव त्यांची शिकार करीत होते, हे सिद्ध होते. २० हजार वर्षांदरम्यान जगात हिमयुग होते. त्यानंतर ते तापमानामुळे वितळले आणि प्रचंड महापूर आला. याच महापुरात विदर्भ आणि चंद्रपूरमधील सर्व प्राणी नदीत वाहून गेले आणि गाळात गाडले गेले. काही हजार वर्षांनंतर त्यांचे जीवाश्मात रूपांतर झाले. वर्धा नदीच्या काठावरील वरोडा आणि चंद्रपूर तालुक्यातच काही ठिकाणी नदीत वाहून आलेला गाळ, रेती आणि दगड आढळतात, अशी माहिती चोपणे यांनी दिली. (तभा वृत्तसेवा)

### २०० ते २० हजार वर्षांपर्यंतचे जीवाश्म

**» चंद्रपूर जिल्हा हा भूशास्त्र आणि जीवाश्मांच्या बाबतीत देशात सर्वाधिक महत्त्वाचा जिल्हा आणि भूशास्त्रीय संग्रहालय मानला जातो. २०० कोटी ते २० हजार वर्षांपर्यंतचे जीवाश्म आढळते. त्यातील १५० कोट्यवधी वर्षांचे स्ट्रोमॅटोलाईट, २० कोटी वर्षांचे वृक्ष आणि पानांचे जीवाश्म, ६ कोटी वर्षांची डायनासोर, वृक्ष, शंख-शिंपले आणि अगदी अलिकडील २० हजार वर्षांच्या हत्तीचे जीवाश्म आहेत. अलिकडील प्राण्यांचे जीवाश्म भारतात क्वचितच आढळली आहेत. देशात प्रथमच अशी जीवाश्म चंद्रपूर शहराजवळ सापडल्याचा दावा चोपणे यांनी केला आहे.**

# धर्मांतर प्रकरणात कुणालाही सोडणार नाही : फडणवीस




**◆ मुंबई, १७ एप्रिल**
नाशिकमधील धर्मांतर प्रकरण गंभीर असून, यात सहभागी असलेल्यांवर कठोर कारवाई केली जाईल. या मॉड्युलचे धागेदोरे कुठपर्यंत पोहोचले आहेत, याचा तपास आम्ही करणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

पत्रकारांशी बोलताना फडणवीस म्हणाले, एका मॉड्यूल अंतर्गत हिंदू नागरिकांचा छळ करण्यात आला. टीसीएस कंपनीने देखील कडक भूमिका घेतली असून, कुणालाही पाठीशी न घालण्याचे त्यांनी स्पष्ट केले. या मॉड्यूलचे धागेदोरे कुठपर्यंत पोहोचले आहेत, याचा तपास आम्ही करू. आम्ही केंद्रीय तपास यंत्रणांनाही या प्रकरणाची माहिती दिली आहे आणि आवश्यकतेप्रमाणे त्यांची मदतही घेतली जाईल. या प्रकरणात आतापर्यंत एकूण ९ जणांवर एफआयआर दाखल झाला आहे. यामध्ये दानिश शेख, तौसीफ अत्तार, रझा मेमन, शाहरुख कुरेशी, शफी शेख, आसिफ आफताब अन्सार आणि शाहरुख शेख यांच्यासह एका महिलेचा समावेश असून त्यांना अटक करण्यात आली आहे. निदा खान ही एकमेव आरोपी अद्याप पोलिसांच्या हाती लागलेली नाही. तिच्या पुणे येथील घराचीही तपासणी करण्यात आली, मात्र तिथे आढळली नाही. (वृत्तसंस्था)

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित



# एकाच रात्रीत ३ ऑर्केस्ट्रा बारवर पोलिसांचा छापा

- कोंडी येथील कसिनो, भोगाव येथील सुखसागर, बार्शी येथील सेंट्रो बारचा समावेश
- १ कोटी २२ लाखांचा मुद्देमाल जप्त
- ९१ जणांविरुध्द गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ एप्रिल-**

पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली विशेष पोलिस पथकाने एकाच रात्रीत ३ ऑर्केस्ट्रा बारवर छापा टाकला. यात कोंडी येथील कसिनो, भोगाव येथील सुखसागर तर बार्शी येथील सेंट्रो बारचा समावेश आहे. १ कोटी २२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या तीनही बारमधील एकूण ९१ जणांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले. कसिनो व सुखसागर या बारवर तालुका पोलिस ठाण्यात तर सेंट्रो बारवर बार्शी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

उत्तर सोलापूर तालुक्यातील कोंडी येथील कसिनो ऑर्केस्ट्रा बार येथे बारमालक प्रभाकर केशव काळे याचे संमत्तीने मॅनेजर अमोल शिवाजी चव्हाण, माधव सामल अधिकारी यांच्या सांगण्यानुसार ११ पिडीत महिला अश्लिल हावभाव करत नृत्य करताना तसेच २३ ग्राहक मिळून आले. सदर बारमधून लॅपटॉप, ॲम्प्लीफायर, साउंड बॉक्स, साउंड मिक्सर, रोख रक्कम व वाहने असा एकूण ४६ लाख ३१ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

भोगाव येथील सुखसागर ऑर्केस्ट्रा बार येथे बारमालक मिथुन सुरेश राठोड याचे संम्मतीने मॅनेजर वैभव मल्लिकार्जून शिवलगी याच्या सांगण्यानुसार ७ पिडीत महिला अश्लिल हावभाव करत नृत्य करताना तसेच १८ ग्राहक मिळून आले. या ठिकाणाहून लॅपटॉप, ॲम्प्लीफायर, १० साउंड बॉक्स, साउंड मिक्सर, रोख रक्कम व ९ वाहने असा एकूण १८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

बार्शी तालुक्यातील बळेवाडी येथील सेंट्रो ऑर्केस्ट्रा बार येथे युवराज अर्जुन बारंगुळे व समाधान प्रल्हाद पाटील याचे संम्मतीने मॅनेजर अमोल प्रल्हाद पाटील याच्या सांगण्यानुसार १८ पिडीत महिला अश्लिल हावभाव करत नृत्य करताना तसेच ९ ग्राहक मिळून आले. येथील साउंड सिस्टम, वाहने, मोबाईल व १ तलवार असा एकूण ५७ लाख ५१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलिस अधीक्षक प्रितम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली परीविक्षाधीन पोलिस उपअधीक्षक विशाल नवले, सहायक पोलिस निरीक्षक अनिल सनगल्ले, देवीदास कारंडे, पोलिस अंमलदार दशरथ गोरे, गणेश पाटील, श्रीदेवी परचंडे यांच्यासह दंगा पथकातील पुरुष व महिला अंमलदार यांनी ही कामगिरी बजावली.

Suyash
नवीन प्रवेश
- इ.१०वी बोर्ड परीक्षेला बसलेले विद्यार्थी
  ❖ ११वी सायन्स रेग्युलर (JEE,NEET,CET)
  ❖ ब्रीज कोर्स(फक्त एप्रिल व मे)
- १२वी सायन्स
- १०वी व्हेकेशन बॅच(एप्रिल/मे) (Science, Maths, English)
- मूलभूत शिक्षण,स्पर्धा परीक्षा (JEE,NEET,CET पूर्ण तयारी)
- शास्त्रज्ञ,शिक्षक,प्रोफेसर इत्यादीसाठी लागणारे पायाभूत ज्ञान, सर्व प्रॅक्टीकल्स व प्रोजेक्टसहित
- निवासी/अनिवासी/बस सुविधा


'सुयश'ची विद्यादान योजना
- आर्थिकदृष्टया दुर्बल मुलां-मुलींसाठी संपूर्ण शिक्षण मोफत व इतर सुविधा(अल्प शुल्क)
- इतर विद्यार्थ्यांसाठी शुल्कमध्ये २०-२५% स्कॉलरशिप


सुयश ज्युनिअर कॉलेज
एस.आर.पी कॅम्प समोर, विजापूर रोड, सोलापूर.
मोबा.७६२०७०९२३७, ९७३०७०१४०७,

प्रवेश चालू
CBSE/STATE BOARD
- CBSE Nursery ते ५वी, ७वी ते १०वी
- State Board(semi. Eng.) ५वी, ७वी ते १०वी
- विशेष गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी भविष्यातील NTS, MTS, NEET, JEE पूर्वतयारी. Foundation classes मोजक्याच जागा उपलब्ध आहेत. त्वरीत संपर्क साधावा.

सुयश गुरुकुल/सेंट्रल स्कूल(CBSE)
एस.आर.पी कॅम्प समोर, विजापूर रोड, सोलापूर.
मोबा.७६२०७०९२३७



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# देश 'त्यांना' माफ करणार नाही...

शेवटी ज्याची भीती होती, तेच झाले. देशातील ५० टक्के लोकसंख्येला म्हणजे मातृशक्तीला लोकसभा तसेच विधानसभांत ३३ टक्के आरक्षण देणारे १३१ वे घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत फेटाळले गेले. एका ऐतिहासिक परिवर्तनापासून देश वंचित राहिला. सुवर्णाक्षरांनी ज्या घटनेची इतिहासात नोंद झाली असती, ती घटना आता काळ्या अक्षरात नोंदवावी लागणार आहे. काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी या देशातील मातृशक्तीचा पुन्हा एकदा विश्वासघात केला, त्यांच्या स्वप्नांवर आपल्या क्षुद्र राजकीय महत्त्वाकांक्षेपायी नुसते पाणीच नव्हे तर काळे पाणी फेरले. देशातील नारीशक्तीला वंदन करण्यासाठी सरकारने या विधेयकाचे नाव 'नारीशक्ती वंदन विधेयक' असे ठेवले होते. पण काँग्रेसने महिलांना वंदन करणे तर दूर; थेट त्यांच्या पाठीत खंजीर खुपसला, असे अतिशय खेदाने म्हणावे लागते. तीन दशकांपूर्वी हे विधेयक फेटाळण्यात आले होते. आज त्याच इतिहासाची पुनरावृत्ती झाली. याची किंमत देशातील विरोधी पक्षांना चुकवावी लागणार आहे. हा देश त्यांना कधीच माफ करणार नाही. कारण या देशात महिलांचा अपमान झाला तर महाभारत घडते, असा इतिहास आहे. त्यामुळे पुन्हा एकदा देशात महाभारत घडणार आहे, महिलांच्या रोषाचा उद्रेक होणार आहे. महिलांना देशाचे भविष्य घडविण्याच्या प्रक्रियेत पूर्ण ताकदीने सहभागी होण्याचा न्याय्य हक्क नाकारण्यात आला. खरं म्हणजे काँग्रेसच्या काळात एक महिला म्हणजे इंदिरा गांधी देशाच्या पंतप्रधान होत्या. महिला असूनही देशातील महिलांना लोकसभा तसेच विधानसभांत ३३ टक्के आरक्षण देण्याची कल्पना त्यांना सुचली नाही; सुचली असेल तरी त्यांनी ती अंमलात आणली नाही.

संपुआ सरकारच्या १० वर्षांच्या काळात सोनिया गांधी पंतप्रधान नसल्या, तरी पंतप्रधानांपेक्षा कमीही नव्हत्या. 'सुपर पीएम' म्हणून त्या ओळखल्या जात होत्या, पण त्यांनीही महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याच्या दृष्टीने काहीच केले नाही. आपल्या पंतप्रधानांनी म्हणजे नरेंद्र मोदी यांनी लोकसभा आणि राज्य विधानसभांत महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याबाबतचे ऐतिहासिक असे विधेयक पारित करून घेतले. आता काँग्रेसने यासंदर्भातील तीन घटनादुरुस्ती विधेयकांना विरोध करीत आपल्या हाताने आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला आहे. विद्यमान लोकसभेच्या सदस्य संख्येतच महिलांना ३३ टक्के आरक्षण का दिले नाही, अशी विचारणा काँग्रेसच्या प्रियांका वढेरा करीत आहेत. पण केंद्रात २०१४ च्या आधी काँग्रेसचे सरकार असताना प्रियांका वढेरा यांनी असा प्रयत्न का केला नाही; तेव्हा आवाज का उठवला नाही, असे विचारायला हवे. आज देशातील महिलांचा आपल्याला कळवळा आल्याचे नाटक त्या करीत असल्या, तरी या देशातील महिलांना न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न देशात पहिल्यांदा भाजपाने आणि मोदी सरकारने केला, हे कोणाला नाकारता येणार नाही. त्यामुळे तेव्हा कुठे गेला होता, 'राधासुता तुझा धर्म'च्या चालीवर तेव्हा कुठे गेला होता, 'सोनियाकन्ये तुझा धर्म' असे त्यांना विचारायला पाहिजे. या देशातील महिलांना आरक्षण मिळू नये, अशी काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांची भूमिका सुरुवातीपासूनच दिसत होती. त्यामुळेच ते या घटनादुरुस्ती विधेयकाला कारण नसताना फाटे फोडत होते. ३३ टक्के महिला आरक्षण लागू करण्यासाठी लोकसभेची सदस्यसंख्या वाढविण्यासाठी आणि त्यातील ३३ टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यासाठी १३१ वे घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत सादर करण्यात आले होते. ३३ टक्के महिला आरक्षण लागू करण्यासाठी आधी जनगणना आणि नंतर मतदारसंघांची फेररचना म्हणजे परिसीमन आवश्यक आहे. २०११ नंतर देशात जनगणना झाली नाही. २०२१ मध्ये जनगणना होणार होती, पण कोरोनाच्या कारणामुळे ती होऊ शकली नाही. जनगणना न झाल्यामुळे मतदारसंघाचे परिसीमन होऊ शकत नाही. त्यामुळे ३३ टक्के महिला आरक्षणाची तातडीने अंमलबजावणी करता आली नसती. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपासून याची अंमलबजावणी करण्याची सरकारची भूमिका असल्यामुळे या मार्गातील कायदेशीर अडथळे दूर करण्यासाठी सरकारने तीन घटनादुरुस्ती विधेयके आणली. पण काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी तांत्रिक मुद्दे उपस्थित करीत सरकारला अपशकून करण्याचा प्रयत्न केला, असे म्हणावे लागते.

विरोधी पक्ष उपस्थित करीत असलेल्या सर्व आक्षेपांचे सरकारने स्पष्ट शब्दात निराकरण केले होते. विरोधी पक्षाने जाणीवपूर्वक या मुद्यावरून देशातील जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. वेड घेऊन पेडगावला जाणे अशी एक म्हण आहे. काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांचे आचरण त्यासारखेच आहे. लोकसभेत या विषयावर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केलेले भाषण पूर्णतः बेजबाबदारपणाचे होते, असे म्हणावे लागेल. 'ऑपरेशन सिंदूर'बाबत राहुल गांधी यांनी केलेले विधानही अतिशय आक्षेपार्ह होते. महिला आरक्षणाला आमचा विरोध नाही, पण परिसीमनाला विरोध असल्याची विरोधी पक्षांची भूमिका दुटप्पीपणाची होती. परिसीमनात लोकसंख्येच्या आधारावर उत्तर भारतातील लोकसभेच्या जागा वाढतील आणि दक्षिण भारतातील जागा कमी होतील, अशी भीती विरोधी पक्षांना भेडसावत आहे. त्याचे सरकारी पातळीवर निराकरण करण्यात आले होते. लोकसभेच्या जागा सरसकट ५० टक्क्यांनी वाढविण्याचा प्रस्ताव सरकारने या घटनादुरुस्ती विधेयकातून ठेवला होता, पण त्यानेही विरोधी पक्षांचे समाधान झाले नाही. मुळात मतदारसंघाच्या परिसीमनाबाबत विरोधी पक्षांनी उपस्थित केलेले आक्षेप अनाठायी आणि निराधार आहेत. ८१५ हा आकडा कुठून आणला, अशी निर्बुद्धपणाची विचारणा ते करीत होते. परिसीमनाच्या मुद्यावर कोणत्याही राज्यांशी भेदभाव होऊ देणार नाही, असा स्पष्ट निर्वाळा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला होता. गृहमंत्री अमित शाह यांनी तर दक्षिण भारतातील राज्यांच्या जागा कशा वाढणार आहेत, हे आकडेवारीनुसार सांगितले होते. दक्षिण भारतातील पाच राज्यांत लोकसभेच्या १२९ जागा आहेत; यात सरसकट ५० टक्क्यांनी वाढ होत त्या १९५ पर्यंत जाणार होत्या. महिला आरक्षणाचा राजकीय लाभ भाजपाला मिळेल, ही विरोधी पक्षांची खरी भीती होती. या मुद्यावरही मोदी यांनी आपली भूमिका स्पष्ट केली होती. महिला आरक्षणाच्या मुद्यावर मला राजकीय फायदा नको आहे, पाहिजे तर तुम्ही सर्व श्रेय घ्या; पण विधेयक पारित करायला सहकार्य करा, अशी कळकळीची विनंती मोदी यांनी केली होती. सरकारी खर्चाने देशातील सर्व वृत्तपत्रांत जाहिरात देतो आणि त्यांत मी तुमचे फोटो छापतो, असे म्हणत मोदी यांनी ब्लँक चेक विरोधी पक्षांना दिला होता. पण देशातील जनतेच्या विश्वासाच्या बँकेत दिवाळखोर ठरलेल्या विरोधी पक्षांची हा चेक वटवण्याची क्षमता नव्हती. खरं म्हणजे महिला आरक्षण विधेयक पारित होऊ नये, अशी देशातील समस्त विरोधी पक्षांची भूमिका होती, त्यामुळे ते यासंदर्भातील घटनादुरुस्ती विधेयकाला कारण नसताना विरोध करीत होते. विरोधी पक्षांमुळे आपला न्याय्य हक्क आणि अधिकार दुसऱ्यांदा नाकारण्यात आला, हे देशातील महिलांना समजले आहे. त्यामुळे आता त्या रणरागिणी झाल्याशिवाय राहणार नाहीत. २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाहिले आणि देशालाही दाखविले आहे. या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी महिलांना लोकसभा तसेच विधानसभांत ३३ टक्के वाटा मिळायला हवा होता. असे करत आम्ही या देशातील महिलांवर उपकार करत नाही, तर त्यांना त्याचा हक्क आणि अधिकार देत आहोत, ज्यापासून आतापर्यंत त्यांना जाणीवपूर्वक वंचित ठेवण्यात आले.

विरोधी पक्षांच्या असहकारामुळे २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत ३३ टक्के महिला आरक्षण लागू होणार नाही, यासाठी आता त्यांना २०३४ ची वाट पाहावी लागेल, असे दिसते. हे त्यांच्यासाठी अन्यायकारक होईल. विरोधी पक्षांनी किमान या मुद्यावर तरी राजकारण करायला नको होते. या विधेयकामुळे देशाचा चेहरामोहरा बदलणार होता; नव्या आणि विकसित भारताचा मार्ग प्रशस्त होणार होता, पण विरोधी पक्षांनी घोडचूक करून ठेवली. याची किंमत त्यांना येणाऱ्या काळात चुकवावी लागेल आणि इतिहास त्यांना कधीच माफ करणार नाही.

## यंगिस्तान


**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# शरद पवार जिंकल्याचा अभिनय का करताहेत?

राजकारणात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात, जी स्वतःला काळाच्या ओघातही अपराजित मानतात. त्यांच्याभोवती एक वलय निर्माण होते, ज्यात ते स्वतः आणि त्यांचे समर्थकही रमून जातात. महाराष्ट्राच्या राजकारणातील असेच एक नाव म्हणजे शरद पवार. त्यांच्या राजकीय कारकीर्दीकडे पाहताना, मला हॉलिवूडच्या 'कार्स ३' या चित्रपटातील लायटनिंग मॅकविन या नायकाची आठवण येते. मॅकविन हा एकेकाळी रेसिंग जगताचा सम्राट होता; पण बदलत्या काळानुसार आणि नव्या तंत्रज्ञानासमोर तो कसा हतबल झाला, हे चित्रपटात प्रभावीपणे दाखवले आहे. शरद पवारांच्या सद्यस्थितीशी या कथेची तुलना केल्यास, मॅकविनने घेतलेला योग्य निर्णय पवारांना का घेता आला नाही, हे स्पष्ट होते आणि त्यांची आजची राजकीय अवस्था ही त्यांच्याच चुकीच्या निर्णयांचे फलित आहे, हे अधोरेखित होते.

'कार्स ३' मध्ये लायटनिंग मॅकविन हा रेसिंगचा अनभिषिक्त सम्राट असतो. त्याने अनेक विजेतेपदे पटकाविलेली असतात. त्याचे चाहते त्याला अजूनही तरुण आणि अजिंक्य मानतात. त्याच्याभोवतीचे लोक त्याला याच भ्रमात ठेवतात. पण, रेसिंगच्या जगात जॅक्सन स्टॉर्मसारख्या नव्या पिढीच्या, अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज कारचा उदय होतो. स्टॉर्म मॅकविनला सहज हरवतो. मॅकविनला हे सत्य पचवणे कठीण जाते. त्याला जाणवते की, त्याचे जुने तंत्रज्ञान आणि अनुभव आता कालबाह्य झाले आहेत. तो नव्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण घेण्याचा प्रयत्न करतो, जिथे त्याला क्रूझ रामिरेझ भेटते. क्रूझ त्याला प्रशिक्षण देते. मॅकविनला हेही कळते की, क्रूझला स्वतःला रेसर बनायचे होते, पण तिचे स्वप्न अपुरे राहिले. अखेरच्या शर्यतीत मॅकविनला आपली चूक उमगते. तो क्रूझला आपली जागा देतो आणि क्रूझ ती शर्यत जिंकते. मॅकविन निवृत्त होतो, पण त्याचा वारसा क्रूझच्या रूपाने पुढे नेला जातो आणि मॅकविनची मानही उंचावली जाते. मॅकविनने योग्य वेळी योग्य निर्णय घेऊन आपला वारसा पुढे नेला आणि सन्मानाने निवृत्ती स्वीकारली.

शरद पवारांच्या राजकीय प्रवासाकडे पाहिले असता, मॅकविनच्या सुरुवातीच्या यशाची आणि अनुभवाची आठवण येते. अनेक दशके त्यांनी महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकारणात आपले वर्चस्व राखले. मॅकविनप्रमाणेच आता शरद पवारही एका अशा टप्प्यावर आले आहेत, जिथे त्यांना नव्या पिढीच्या आणि बदललेल्या राजकारणाच्या आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. नुकतीच त्यांनी राज्यसभेची शपथ घेतली, हे पाहता त्यांच्या मनात अजूनही राजकारणात सक्रिय राहण्याची तीव्र इच्छा असल्याचे दिसते.



या वयात आणि शारीरिक मर्यादा असताना ते किती प्रभावीपणे काम करू शकतील, हा प्रश्न केवळ विरोधकांनाच नाही तर त्यांच्या कार्यकर्त्यांनाही पडला आहे. ही त्यांची राजकीय हतबलता स्पष्टपणे दिसते. मॅकविनने जॅक्सन स्टॉर्मच्या रूपाने आलेल्या नव्या तंत्रज्ञानाला आणि नव्या पिढीला स्वीकारले, पण शरद पवारांच्या बाबतीत मात्र हे चित्र पूर्णपणे भिन्न आहे. त्यांच्या पक्षातील फुटीनंतर, अजित पवार गट आणि शरद पवार गट असे दोन गट निर्माण झाले. या फुटीमुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पूर्णपणे खिळखिळा झाला. या घटनेने हे स्पष्ट झाले की, शरद पवारांना एक सक्षम आणि एकसंध वारसदार निर्माण करण्यात पूर्णपणे अपयश आले आहे. आजही त्यांना स्वतःच पक्षाची धुरा सांभाळावी लागत आहे. त्यांचे वय आणि प्रकृती पाहिली तर हे एक मोठे आव्हान आहे. 'आपल्याच हाती पक्षाची धुरा असायला हवी' या अट्टाहासापोटी त्यांनी स्वतःचा पक्षच कमकुवत केला, अशी टीका त्यांच्यावर सातत्याने केली जाते. मॅकविनने क्रूझला संधी देऊन आपला वारसा पुढे नेला; पवारांना मात्र तसा निर्णय घेता आलेला नाही. त्यांनी आपल्याच कुटुंबातील सदस्यांना वारसदार म्हणून पुढे आणण्याचा प्रयत्न केला; त्यातही त्यांना यश आले नाही. उलट, पक्षाचीच वाताहत होत गेली.

या संपूर्ण परिस्थितीत देवेंद्र फडणवीस यांचा उदय आणि त्यांनी खेळलेले राजकीय डावपेच हे जॅक्सन स्टॉर्मच्या आगमनासारखेच आहेत. फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात आपले स्थान भक्कम केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने राज्यात मोठी ताकद मिळविली आहे. अजित पवारांना सोबत घेऊन त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पाडली आणि शरद पवारांना एकाकी पाडले. एक प्रकारे त्यांनी तेल लावलेला पैलवान शरद पवार यांना चेकमेटच केले. शरद पवारांना राज्यसभेची जागा देऊ करणे, हा फडणवीस यांच्या राजकीय चातुर्याचाच एक भाग होता, असे अनेक राजकीय विश्लेषक मानतात. यातून त्यांनी पवारांना एका विशिष्ट मर्यादेत ठेवण्याचा आणि त्यांचे राजकीय महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. कोल्हापूरचे संभाजीराजे छत्रपती यांना राष्ट्रपती नामनिर्देशित खासदारकी मिळाल्यावर, 'पूर्वी छत्रपती पेशव्यांची नेमणूक करायचे आणि पेशवे फडणवीसांची नेमणूक करायचे. आता फडणवीस छत्रपतींची नेमणूक करतात.' अशी खोचक टीका पवारांनी केली होती. पवारांनी फडणवीसांची जात काढली होती. मात्र आता त्याच फडणवीसांच्या कृपेने शरद पवार यांना खासदारकी मिळालीय, हे दुर्दैव म्हणावे की नियती?

वाचक हो, मॅकविनला जॅक्सन स्टॉर्मने हरवल्यानंतर त्याला नव्या तंत्रज्ञानाची गरज जाणवली; त्याचप्रमाणे पवारांनाही बदललेल्या राजकीय समीकरणांची आणि नव्या पिढीच्या राजकारणाची दखल घेणे आवश्यक होते. पण, त्यांनी जुन्याच शैलीत राजकारण सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे त्यांना अनेकदा अडचणींचा सामना करावा लागला आणि अखेरीस त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. राजकारणात योग्य वेळी निवृत्त होणे आणि सक्षम वारसदार निर्माण करणे हे अत्यंत महत्त्वाचे असते. मॅकविनने हे ओळखले आणि क्रूझला संधी दिली. यामुळे त्याचा वारसा पुढे गेला; त्याचे नावही अजरामर झाले. पण, शरद पवारांच्या बाबतीत, हा निर्णय त्यांनी अजूनही घेतलेला नाही. वारसदार न निवडणे आणि पक्षातील अंतर्गत कलह यामुळे पक्षाला मोठे नुकसान झाले. आज ते राज्यसभेत जाऊन 'जिंकल्याचा अभिनय' करीत असले, तरी वस्तुस्थिती वेगळी आहे. त्यांचा हा 'अभिनय' मराठी जनतेला पाहवत नाही. कारण त्यांना पवारांची हतबलता स्पष्ट दिसत आहे. एक काळ असा होता, जेव्हा शरद पवार हे राजकारणातील एक शक्तिशाली नेते होते, पण आज त्यांना एकाकी आणि पराभूत अवस्थेत पाहणे हे त्यांच्या चाहत्यांसाठी वेदनादायक आहे. देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना पूर्णपणे 'चेकमेट' केले आहे, हे आता स्पष्ट झाले आहे. शरद पवार हे ज्येष्ठ नेते आहेत, यात शंका नाही. पण, बदलत्या काळासोबत बदलणे आणि योग्य वेळी योग्य निर्णय घेणे हे राजकारणात तितकेच महत्त्वाचे असते. असो... शरद पवारांना राज्यसभेसाठी शुभेच्छा!

writerjayeshmestry@gmail.com

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# प्रेमाच्या नावाखाली छळलं जाणारं 'हिंदुत्व'


'धर्मो रक्षति रक्षितः' जर आपण धर्माचे रक्षण केले, तरच धर्म आपले रक्षण करेल. हे आपल्याला लहानपणापासून शिकवलं जातं, मात्र त्याकरिता दुसऱ्याच्या धर्मावर अतिक्रमक करायला कधीही शिकवलं नाही. नेमकं याउलट 'लव्ह जिहाद'ला प्रोत्साहन देणारी शिकवण मुस्लिम समाजात दिली जाते, ही बाब गंभीर धार्मिक तेढ वाढवणारी, विद्वेष पसरवणारी आहे. महाराष्ट्राच्या मातीत सध्या एक अशीच अस्वस्थ करणारी लाट पाहायला मिळत आहे. ही लाट प्रगतीची नाही, तर सामाजिक वीण विस्कटणाऱ्या एका सुनियोजित षडयंत्राची आहे; ज्याला आपण 'लव्ह जिहाद' म्हणून ओळखतो. त्याचे स्वरूप आता केवळ ग्रामीण भागापुरते मर्यादित राहिलेले नसून ते आयटी हब आणि सुशिक्षित वर्गापर्यंत पोहोचले आहे. अमरावती ते पालघर आणि नाशिक ते पुण्यातील आयटी कंपन्यांपर्यंत पसरलेली ही जाळी हिंदू समाजासाठी धोक्याची घंटा आहे.

### अमरावती-परतवाडा : ग्रामीण भागातील छळवणूक

विदर्भाचे प्रवेशद्वार मानल्या जाणाऱ्या अमरावती आणि अचलपूर-परतवाडा परिसरात गेल्या काही महिन्यांत 'लव्ह जिहाद'ची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. येथे प्रामुख्याने आर्थिकदृष्ट्या कमकुवत किंवा मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलींना लक्ष्य केले जात आहे. ओळखीचे रूपांतर मैत्रीत आणि मैत्रीचे लग्नाच्या आमिषात करून या मुलींचे धर्मांतर करण्याचा दबाव टाकला जातो. परतवाडा येथील अलिकडील घटना पाहता, हे स्पष्ट होते की, ही केवळ वैयक्तिक प्रकरणे नसून यामागे एक मोठी साखळी कार्यरत आहे, जी हिंदू मुलींना फूस लावून बाटवण्याचे काम करीत आहे.

### नाशिक-पुणे : 'कॉर्पोरेट' लव्ह जिहादचे नवे संकट

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, आता सुशिक्षित आणि स्वावलंबी तरुणीही या जाळ्यात अडकत आहेत. नाशिकच्या टीसीएस आणि पुण्याच्या इन्फोसिससारख्या नामांकित कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या तरुणींना 'टार्गेट' केले जात आहे. विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यात आयटी पार्क्समध्ये काम करणाऱ्या हिंदू मुलींना फसवण्यासाठी बनावट नावांचा आणि आधुनिक जीवनशैलीचा आधार घेतला जातो. नाशिकमध्येही आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांचे मानसिक शोषण केल्याच्या तक्रारी वाढत आहेत. नोकरीच्या मजबुरीचा फायदा घेत उच्चशिक्षित मुलींना अडवण्याचा हा नवा 'जिहाद'चा प्रयोग खरोखर धक्कादायक आहे. या चक्रव्यूहात अडकतात, तेव्हा समाजाच्या 'वैचारिक प्रगल्भतेवर' प्रश्नचिन्ह उभे राहते. हे गुन्हेगार केवळ अशिक्षित तरुण नसून ते



सुशिक्षित तरुणींच्या मानसिकतेचा अभ्यास करून त्यांना जाळ्यात ओढण्यात यशस्वी होत आहेत, ही चिंतेची बाब आहे.

'लव्ह जिहाद' हा केवळ दोन व्यक्तींमधील प्रेमाचा विषय उरलेला नाही. हे एका विशिष्ट विचारसरणीने हिंदू समाजाची लोकसंख्याशास्त्रीय रचना बदलण्यासाठी चालवलेले 'डेमोग्राफिक युद्ध' आहे. हिंदू मुलींना लक्ष्य करणे म्हणजे हिंदू कुटुंबाची पायाभरणी उद्ध्वस्त करणे होय. जेव्हा एक हिंदू मुलगी धर्मांतरित होते, तेव्हा केवळ एक व्यक्ती जात नाही, तर येणारी संपूर्ण पिढी हिंदू धर्मापासून दुरावली जाते. त्यामुळे धार्मिक स्वातंत्र्य संरक्षण कायदा अधिक प्रभावीपणे राबविणे गरजेचे आहे. मात्र, केवळ कायदा पुरेसा नाही. 'कुटुंब प्रबोधन' आणि 'धर्म शिक्षण' या माध्यमातून आपल्या मुलींना धर्माचे महत्त्व पटवून देणे हे प्रत्येक पालकाचे कर्तव्य आहे.'द केरळ स्टोरी' सारख्या चित्रपटांमधून जे वास्तव समोर आले, तेच वास्तव आज महाराष्ट्राच्या गल्लीबोळात आणि कॉर्पोरेट ऑफिसमध्ये पाहायला मिळत आहे. हे 'सॉफ्ट जिहाद'चे स्वरूप असून यात छुप्या पद्धतीने हिंदू संस्कृतीवर आघात केला जात आहे.

अमरावती, नाशिक, पुणे आणि पालघरमधील घटना या हिमनगाचे केवळ एक टोक आहेत. हिंदू समाजाने आता सावध होण्याची गरज आहे. आपल्या सणांचे, परंपरेचे आणि धर्माचे रक्षण करण्यासाठी केवळ घोषणा देऊन चालणार नाही, तर आपल्या घरापासून संरक्षणाची भिंत उभी करावी लागेल. 'लव्ह जिहाद'चे हे संकट परतवून लावण्यासाठी शासन, प्रशासन आणि हिंदू संघटनांनी एकत्रितपणे लढा देणे काळाची गरज आहे.

### नव्या पिढीला धोका : 'लिबरलिझम'च्या नावाखाली फसवणूक

आजची तरुणाई स्वतःला 'ग्लोबल' आणि 'लिबरल' समजते. प्रेम धर्म पाहत नाही या वाक्याखाली ही पिढी वास्तवाकडे डोळेझाक करत आहे. 'लव्ह जिहाद' हे केवळ शारीरिक शोषण नसून ते 'वैचारिक धर्मांतर' आहे. तरुणाईला हे समजून घ्यावे लागेल की, हा विषय केवळ दोन व्यक्तींमधील प्रेमाचा नसून एका संस्कृतीला संपवण्याच्या षडयंत्राचा भाग आहे. एकदा का मुलगी या जाळ्यात अडकली की तिची अस्मिता, तिची श्रद्धा आणि तिचे स्वातंत्र्य कायमचे हिरावून घेतले जाते. लव्ह जिहाद हे हिंदू समाजापुढील 'अदृश्य युद्ध' आहे. अमरावती ते मुंबई असा हा जो प्रवास सुरू आहे, तो हिंदू संस्कृतीची पाळेमुळे उखडण्यासाठी आहे. जर आज आपण आपल्या मुलींच्या आणि धर्माच्या रक्षणासाठी उभे राहिलो नाही, तर उद्याचे भविष्य अंधकारमय असेल. सुशिक्षितपणाचा अर्थ 'सावधपणा' असा व्हायला हवा, 'गाफीलपणा' नव्हे. हिंदुत्वाचा हा लढा घराघरांत पोहोचविणे, हाच यावरील एकमेव प्रभावी उपाय आहे.

### पुरोगाम्यांचे दांभिक मौन : हिंदू मुलींच्या बलिदानावर गप्प का?

आजची तरुणाई स्वतःला 'ग्लोबल' आणि 'लिबरल' समजते. पण हाच उदारमतवाद त्यांच्या जीवावर बेतत आहे. लव्ह जिहाद हे केवळ शारीरिक शोषण नसून ते 'वैचारिक धर्मांतर' आहे. यावर उपाय काय? राज्यात कुठेही छोटी घटना घडली की गळे काढणारी 'पुरोगामी' मंडळी या लव्ह जिहादच्या प्रकरणांवर मात्र मूग गिळून गप्प आहेत. हिंदू मुलींचे आयुष्य उद्ध्वस्त होत असताना या तथाकथित बुद्धिजीवींच्या 'अभिव्यक्ती स्वातंत्र्याला' आणि 'स्त्रीवादाला' नेमकी कोणती बाधा येते? अल्पसंख्यक मतांच्या राजकारणासाठी हिंदू मुलींचा बळी दिला जात असताना हे लोक मौन पाळून एका अर्थाने या गुन्हेगारांना मूक संमतीच देत आहेत. प्रेम वैयक्तिक असते असे गोंडस नाव देऊन या षडयंत्राचे समर्थन करणे, हा या पुरोगाम्यांचा नवा धंदा झाला आहे. मात्र, जेव्हा याच मुलींची सुटकेसमध्ये प्रेते मिळतात, तेव्हा हे लोक कोठे गायब होतात? हिंदू समाजाच्या विनाशावर आपला अजेंडा चालवणाऱ्या या टोळीचा बुरखा आता फाडण्याची वेळ आली आहे.

९२७०३३३८८६

## वेध

**विजय कुळकर्णी**

# बालविवाह रोखा!

भारतातील विकासाचा आलेख झपाट्याने उंचावत असताना, काही सामाजिक प्रश्न अजूनही आपल्या पायातील बेडी ठरत आहेत. त्यापैकीच एक म्हणजे बालविवाह. विज्ञान, शिक्षण, तंत्रज्ञान आणि कायद्याच्या प्रगतीच्या काळात ही प्रथा अनेक भागात अजूनही जिवंत आहे, ही वस्तुस्थिती केवळ खेदजनकच नसून चिंताजनक आहे. बालविवाह हा केवळ एका कुटुंबाचा निर्णय नसतो. तो संपूर्ण समाजाच्या मानसिकतेचा आरसा असतो. एका बाजूला आपण 'नवभारत', 'डिजिटल इंडिया', 'महिला सशक्तीकरण' यासारख्या संकल्पनांचा गौरव करतो. दुसऱ्या बाजूला मुलींचे बालपण हिरावून घेणाऱ्या प्रथांकडे दुर्लक्ष करतो. ग्रामीण भारतात आजही अनेक ठिकाणी मुलीच्या जन्मापासूनच तिच्या विवाहाची चिंता सुरू होते. शिक्षण, करीअर, स्वप्ने यापेक्षा विवाहाला अधिक महत्त्व दिले जाते. लवकर लग्न म्हणजे सुरक्षित भविष्य ही चुकीची धारणा अजूनही पक्की आहे. गरिबी, अशिक्षण आणि सामाजिक दबाव यांचा संगम यामुळे बालविवाहाला खतपाणी घातले जाते. पण, या सगळ्यांच्या पलीकडे जाऊन विचार करण्याची वेळ आली आहे.

हा प्रश्न मुलींच्या आरोग्यावर गंभीर परिणाम करतो. लहान वयात गर्भधारणा झाल्यास मातृ मृत्यूचा धोका वाढतो. बालकांचे आरोग्य धोक्यात येते. दुसरे म्हणजे, शिक्षणाचा मार्ग बंद होतो. शिक्षण ही प्रगतीची गुरुकिल्ली असताना, बालविवाह मुलींच्या हातातून ती किल्ली काढून घेतो. याहूनही गंभीर बाब म्हणजे मानसिक परिणाम. बालवयातच जबाबदाऱ्यांचा डोंगर उचलताना मुलींचे बालपण, स्वप्ने आणि आत्मविश्वास हरवतो. ती केवळ एक व्यक्ती म्हणून नव्हे, तर एक संपूर्ण पिढी म्हणून मागे पडते. २००६ चा बालविवाह प्रतिबंधक कायदा सांगतो की, अशा विवाहांना मान्यता नाही. परंतु, कायदे कागदावरच असतात. त्यांची खरी ताकद अंमलबजावणीत असते. दुर्दैवाने अनेक ठिकाणी ही अंमलबजावणी अपुरी पडते. सामाजिक दबाव आणि पारंपरिक विचारसरणी कायद्यावर मात करतात. प्रश्न असा निर्माण होतो की, उपाय काय? सर्वप्रथम, शिक्षण हा सर्वात प्रभावी उपाय आहे. विशेषतः मुलींचे शिक्षण वाढविणे ही काळाची गरज आहे. शिक्षित मुलगी स्वतःचे आयुष्यच बदलत नाही तर, ती संपूर्ण कुटुंब आणि समाज घडवते. दुसरे म्हणजे, जनजागृती. समाजात बालविवाहाचे दुष्परिणाम स्पष्टपणे पोहोचविणे गरजेचे आहे. केवळ सरकारी योजना किंवा घोषणांनी हा प्रश्न सुटणार नाही. समाजाच्या मानसिकतेत बदल आवश्यक आहे. तिसरे म्हणजे, आर्थिक सक्षमीकरण. गरीब कुटुंबांना आधार दिल्यास बालविवाहाची गरज कमी होऊ शकते. अनेकदा आर्थिक अडचणीमुळे पालक हा निर्णय घेतात.

माध्यमांची भूमिकाही येथे महत्त्वाची ठरते. वृत्तपत्रे, दूरदर्शन आणि सोशल मीडिया यांच्यामार्फत समाजाला जागृत करणे आवश्यक आहे. संपादकीय, लेख, चर्चासत्रे याद्वारे हा मुद्दा सतत जिवंत ठेवावा लागेल. तसेच स्थानिक प्रशासन, पोलिस आणि स्वयंसेवी संस्था यांनी अधिक सक्रिय भूमिका घ्यायला हवी. बालविवाह घडण्याआधीच तो थांबविणे ही खरी जबाबदारी आहे. परवा अकोला जिल्ह्यातील बाभुळगाव येथे जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या सतर्कतेमुळे होऊ घातलेला बालविवाह रोखण्यात आला. मुलीच्या पालकांकडून मुलीचा बालविवाह लावणार नाही, असे लेखी हमीपत्र घेण्यात आले. आजच्या युगात 'महिला सशक्तीकरण' हा शब्द केवळ घोषवाक्य म्हणून वापरण्यापेक्षा त्याचा खरा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. मुलींना शिक्षण, स्वातंत्र्य आणि संधी दिल्याशिवाय सशक्तीकरण शक्य नाही आणि हेच बालविवाहाच्या विरोधातील सर्वात मोठे शस्त्र आहे. आज मुली मुलांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावत आहेत. आता तर, केंद्र सरकारने महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचा प्रस्ताव संसदेत पारित केला आहे. बालविवाह ही समस्या केवळ कायद्याने संपणार नाही; ती समाजाच्या सामूहिक प्रयत्नांनीच संपेल. प्रत्येक पालक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ता आणि नागरिकाने याविरोधात ठाम भूमिका घेतली पाहिजे. शेवटी, एक गोष्ट स्पष्ट आहे, बालविवाह थांबविणे म्हणजे केवळ एका मुलीचे आयुष्य वाचविणे नाही तर देशाच्या भविष्यास सुरक्षित करणे आहे. त्याचबरोबर बालविवाह हे मुलींचे बालपण हिरावून घेते. कळी उमलण्याआधीच कुचकरली जाते. ज्या वयात 'गुड टच बॅड टच'चे ज्ञान नसते, त्या वयात गर्भधारणासारख्या गंभीर बाबीला तिला सामोरे जावे लागते. तिची शारीरिक व मानसिक वाढ पूर्णतः न झाल्याने अल्पवयातच विविध व्याधी, आजार जडतात. अनेकदा अशा अल्पवयीन मातांचा बाळंतपणाच्यावेळी दुर्दैवी मृत्यूदेखील होतो. तिचा काहीही दोष नसताना तिला असह्य यातना सहन कराव्या लागतात. याचाच विचार करून शासनाने मुलगी १८ वर्षांची झाल्याशिवाय तिचा विवाह करण्यास कायद्याने बंदी घातली आहे. तेव्हा, पालकांनी या कायद्याचे स्वतःहून पालन केले पाहिजे. कायद्याचे पालन न करणारे पालक आपल्या मुलींच्या जीवित्वाशी खेळत आहेत. तेव्हा याचा विचार करून पालकांनी आपल्या मुलींचा विवाह तिचे वय १८ वर्षांचे पूर्ण झाल्यानंतरच करून द्यावा, असे आवाहन यानिमित्ताने करावेसे वाटते.

८८०६००६१४९

## अक्षय्य तृतीयेचे महत्त्व

अक्षय्य तृतीया, ज्याला 'आखा तीज' असेही म्हटले जाते, हा सण वैशाख महिन्याच्या शुद्ध तृतीयेला साजरा केला जातो. हा दिवस हिंदू धर्मातील अत्यंत शुभ व महत्त्वाचा दिवस मानला जातो. 'अक्षय' म्हणजे कधीही संपुष्टात न येणारे, जे कायम टिकून राहते. या दिवशी केलेल्या दान, पुण्य, जप, तप, हवन, पूजन, व्रत यांचे फळ अक्षय म्हणजेच अविनाशी आणि सात जन्मांसाठी कल्याणकारक मानले जाते. याच दिवशी पितरांना पाणी पाजण्याकरिता मातीचे कुंभ दान करून उन्हाळ्यात तयार करण्यात आलेले कुरडया, पापड, शेवया, आंब्याचे पन्हे, आमरस याचा नैवेद्य देवाला आणि पितरांना दाखवूनच खायला सुरुवात केली जाते. याच दिवसापासून घड्यातले पाणी पिण्याकरिता वापरले जाते. हिंदू पुराणांनुसार, या दिवशी भगवान परशुरामाचा जन्म झाला. याच दिवशी वेद व्यासांनी आणि भगवान गणेशांनी भागवत पुराण लेखनास सुरुवात केली होती. काही कथांनुसार, श्रीकृष्णाने पांडव वनवासात असताना द्रौपदीला अक्षयपात्र दिले होते. अक्षय्य तृतीयेच्या दिवशीच श्रीकृष्णाला सुदामा भेटले आणि श्रीकृष्णाने सुदाम्याचे ब्राह्मण म्हणून पाद्य पूजन केले होते. म्हणून वैशाख महिन्यात ब्राह्मणांचे पाद्य पूजन (वसंत पूजा) वैदिक मंत्रजागर करण्याची प्रथा आहे. याच दिवशी पवित्र गंगा पृथ्वीवर अवतरली. अक्षय्य तृतीयेपासून वैशाख पौर्णिमेपर्यंत गंगा दशहरा पर्वकाळ म्हणून साजरा केला जातो. तसेच या दिवशी सोने-चांदी-धनसंपत्तीची देवता कुबेर हेही अवतरले. म्हणून या दिवशी सोने-नाणे विकत घेतल्यामुळे घरात भरभराट होते. याच मुहूर्तावर लग्न-मौंज केली जाते. या दिवशी सकाळी लवकर उठून स्नान करून देवपूजा केली जाते. गायींना चारा ब्राह्मणांना अन्नदान व वस्त्रदान केले जाते.

**शिरीष पटवर्धन गुरुजी**/नागपूर-९४२२११००१५

## धर्मांतर करायला भाग पाडणाऱ्यांना फाशीच द्या

ज्या प्रकारे हिंदू मुलींना फसवून त्यांच्यावर जोरजबरीने त्यांचे धर्मांतर करायला त्यांना भाग पाडत आहेत. क्रूरपणे नृसंश हत्या केल्याचेही प्रकार अनेकदा समोर आले आहे. भाजपा नेत्या देवयानी फरांदे यांनी अशा अपराध्यांचे राष्ट्रीयत्व रद्द करून त्यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी शासनाकडे मागणी केली आहे. केंद्र व राज्य सरकारने आता समग्र जनतेचा अधिक अंत न पाहता जबरी धर्मांतराचा, हिंदू मुलींवरील बलात्कार व क्रूर अत्याचाराचा कायमचा बीमोड करण्यासाठी फाशीच्या कडक शिक्षेसह कायदे अस्तित्वात नसल्यास असे कायदे पास करून त्यांना अविलंब अंमलात आणावे; तरच या जिहादी व जबरी धर्मांतर धुमाकुळाच्या नित्य घडत असलेल्या हैदोसाला आळा बसू शकेल. समग्र हिंदू समुदायानेही मिळमिळीत राहून व तटस्थपणे अशा रोज घडत असलेल्या अत्याचाराकडे नुसते पाहत न बसता सनदशीर मार्गाने केंद्र व राज्य सरकारांकडून त्वरित कारवाईसाठी प्रभावी आंदोलनात्मक पवित्रा घेण्याची वेळ आली आहे.

**ॲड. प्रकाश देशपांडे** /पुणे-७०५८९७५३७६

## वाचक पत्रे

## डीजे, लेसर बीम आणि मिरवणुका

आजकाल मोठ्या आवाजाचे, लेसर बीमचे फॅड विविध धर्मांच्या मिरवणुकीत, शोभायात्रा, विवाह समारंभात फारच वाढले आहे. या आवाजावर कोर्टाने किती डेसिबल हवा, याचे निर्देश दिले आहेत. जास्त आवाजाने हृदय व कान आणि लेसर बीमने डोळे क्षतिग्रस्त होतात. मोठा आवाज हा मोठा आवाजच आहे, कोणत्याही जाती-धर्माशी त्याला काय? कोर्टाने डेसिबलचा नियम ठरवला आहे. तो सगळ्यांनीच पाळावा. पोलिस प्रशासनाने पण यांवर कारवाई करावी. पण एकतर्फी कारवाई होते असा आरोप होतो आहे, जे अयोग्य आहे. याचा त्रास सामान्यांना, आजारी, वृद्ध, लहान बाळांना होतो; जो कोणत्याही धर्माचा असू शकतो.

**रवी वाघमारे** / नागपूर

## 'बेटी जगाओ, बेटी बचाओ'

नाशिक येथे घडलेल्या कार्पोरेट जिहादच्या घटनेमुळे सर्वत्र अस्वस्थता आणि असंतोष निर्माण झाला आहे. सरकारकडून हालचाली सुरू असल्या, तरी मूलभूत प्रश्न अनुत्तरितच आहे, तो म्हणजे मुली अशा सापळ्यात अडकतातच कशा? केंद्र सरकारच्या 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या उपक्रमामुळे मुली शिक्षणातच नाही तर उच्चशिक्षित झाल्या, करीअरमध्ये आणि विविध क्षेत्रांत अग्रस्थानी पोहोचल्या. आज त्या फायटर पायलटपासून प्रशासकीय अधिकाऱ्यांपर्यंत सर्वच ठिकाणी आपली छाप पाडत आहेत. मात्र, या प्रगतीसोबत त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर होत चालला आहे. उच्चशिक्षण असूनही जर मुली अशा घटनांना बळी पडत असतील, तर केवळ शिक्षण पुरेसे नाही, हे स्पष्ट होते. यासाठी त्यांना धर्मशिक्षण देणे, त्यानुसार धर्माचरण करण्यास प्रोत्साहित करणे आणि स्वतःच्या मूळ शक्तिरूपाची ओळख करून देण्याची आवश्यक आहे. तसेच, स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देऊन जागृत आणि आत्मनिर्भर करण्याची वेळ आली आहे. सरकारने आता 'बेटी जगाओ, बेटी बचाओ' उपक्रम हाती घ्यायला हवा असे वाटते. तरच अशा लव्ह जिहादसारख्या गंभीर प्रकारांना आळा बसेल.

**प्रांजली विजय ब्रह्मे**/नागपूर

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com/



# जुळे सोलापूर ब्रह्म संस्थेतर्फे रविवारी भगवान परशुराम पूजन

**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

येथील जुळे सोलापूर ब्रह्म बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे रविवार दिनांक १९ एप्रिल रोजी भगवान परशुराम जयंती साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्ताने जुळे सोलापुरात रविवारी दोन ठिकाणी भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येईल अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष डी. डी. कुलकर्णी यांनी दिली आहे. रविवार दिनांक १९ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता जुळे सोलापुरातील पाण्याच्या टाकी समोर भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येईल. तर सायंकाळी ५.३० वाजता इंदिरा नगरातील गणपती मंदिर येथे भगवान परशुराम यांच्या प्रतिमेच्या पूजनाचा कार्यक्रम होईल. या दोन्ही ठिकाणी होणाऱ्या कार्यक्रमास कोणत्याही प्रकारची वर्गणी आकारली जाणार नाही.


## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना या खरेदीपुर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि।। व सब डि।। सोलापूर पैकी ता-उत्तर सोलापूर येथील गाव खेड येथील शेतजमिन गट क व उपविभाग २७/१ प्लॉट नं. ८६ यासी एकूण क्षेत्र ०.९५.१६ चौ.मी. यांसी आकार ४ रु. ७६ पैसे असून सदर प्लॉट जागा व त्यातील दगड, माती व इतर तंदगभूत वस्तुसह व मालकी हक्क व वहिवाटीच्या सर्व हक्कासह.

वर नमुद प्लॉटजागा ही श्री. हर्षल संतोष तारळकर रा. विटा, जि. सांगली यांच्या मालकीची व कब्जे वहिवाटीची असून, त्यांनी आमचे अशिल श्री. दिलीप अर्जुन साठे, रा. वडाळा, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर यांना विक्री करण्याचे ठरवून तसा इसारापोटी काही रक्कम स्विकारुन, सदरची प्लॉटजागा ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याची हमी आमच्या अशिलास दिली आहे.

तरी वर नमुद प्लॉट जागेबाबत कोणाचाही व कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार, लिज, लिन, दान, कोर्ट केसेस, मृत्युपत्र, हस्तांतरण, साठेखत, खरेदीखत, पतसंस्थेचा व इतर खाजगी सावकाराचा बोजा, कुलमुखत्यारपत्र, पोटगी हक्क, वारसा हक्क इ. काही हितसंबंध असल्यास त्यांनी ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन आठ (०८) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर आपले हरकती नोंदवावी अन्यथा मुदतीनंतर आमचे अशिल कोणाचीही हरकत नाही असे समजून पुढील व्यवहार पुर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत आमच्या अशिलावर व प्लॉट जागेवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कोणाचेही नुकसान होऊ नये म्हणून ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली.
ता.१७/०४/२०२६

**सही/-**
**ॲड. एन.व्ही. चव्हाण**
**बी. कॉम., एलएल.बी**
**मो.नं.९३२५४९३०४४.**
**अशिलांतर्फे ॲडव्होकेट**

## ANGEL ONE LIMITED

**Regd. Off: 601, 6th Floor, ACKRUTI STAR, CENTRAL ROAD, MIDC, ANDHERI EAST, MUMBAI -400093**
**Centralized desk : 18001020 Email id : support@angelone.in**
**Member of : NSE / BSE / BSE REMISIER / MCX / MCX SX / NCDEX**
**Member IDs: NSE : 12798, BSE : 612, MCX : 12685,**
**NCDEX : 00220 SEBI Registration No: INZ000161534**

NOTICE

This is to inform all concerned that we have initiated the process of cancellation of registration of our below mentioned Authorised Person (AP) due to regulatory reasons/concerns.

| Name Of Authorised Person | Trade Name of AP | Address of AP | AP Registration No. |
|---|---|---|---|
| KOMAL PRAKASH SHINDE | KOMAL PRAKASH SHINDE | 82 , NORTH KASHA SOLAPUR NORTH, 413007 SOLAPUR MAHARASHTRA | **NSE : AP0397593921** |

Any person dealing with the above-mentioned Authorised Person henceforth shall do so at their own risk. **ANGEL ONE LTD.** shall not be liable for any dealings with the said entity post the issuance of this notice. Investors having any queries or concerns regarding this matter are requested to contact **ANGEL ONE LTD.** within **15 days** from the date of issuing this notice.

**For ANGEL ONE LTD**
**Sd/-,**
**Authorised Signatory**

**Date : 18.04.2026**
**Place : Maharashtra**

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## ई निविदा प्रकाशनाची सूचना

महानिर्मिती, औ.वि. केंद्र परळी– वै. कडून अनुभवी व नामांकित उत्पादक / पुरवठादार / कंत्राटदारा कडून खालील काम / वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी ई–निविदा मागविण्यात येत आहेत.

| ई–निविदा क्रमांक | विषय | अंदाजित रक्कम /बयाना रक्कम | ई–निविदा विक्रीचा कालावधी | ई–निविदा स्वीकृत (१२.०० पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| ई–निविदा क्र ३००००६७५१८ | वर्क ऑफ कोल पाइप हँगर्स अँड सपोर्टस रीपेयर अँड फिटिंग अॅज अँड व्हेन रीक्वायर्ड अॅट बीएम–२, यू–८,टीपीएस, परळी वै. | ५.०४ लाख ८५५०/– | १८.०४.२०२६ ते २५.०४.२०२६ | २६.०४.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७५३७ | प्रॉक्यूरमेंट ऑफ स्पेयर्स फॉर एचपी, आयपी, एलपी टर्बाइन अॅट टीएम–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ५४.०१ लाख ५७५१२/– | १८.०४.२०२६ ते २८.०४.२०२६ | २९.०४.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७५६१ | प्रॉक्यूरमेंट ऑफ स्पेयर्स फॉर एचपी/आयपी टर्बाइन स्टॉप अँड कंट्रोल वॉल्वज अँड इट्स सर्वोमोटर्स फॉर २५०मे.वॅट (केडब्ल्यूयू टर्बाइन) इन यू–७ सीओएच अॅट टीएम–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ५४.९८ लाख ५८४८५/– | १८.०४.२०२६ ते २८.०४.२०२६ | २९.०४.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७३१२ | वर्क ऑफ स्क्रू कॉम्प्रेसर ओवरहौलिंग ड्यूरिंग यू–७, सीओएच अॅट टीएम–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ३.३५ लाख ६८५३/– | १८.०४.२०२६ ते ०३.०५.२०२६ | ०४.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७४३५ | प्रॉक्यूरमेंट ऑफ फायर क्रेटे स्पेशल ग्रेड रिफॅक्टरी फॉर कास्टिंग वर्क ऑफ बॉटम अॅश हॉप्पर ड्यूरिंग यू–७ सीओएच अॅट एएचपी–१, टीपीएस, परळी वै. | १२.२७ लाख १५७७५/– | १८.०४.२०२६ ते ०३.०५.२०२६ | ०४.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७४४४ | प्रॉक्यूरमेंट ऑफ '६५एनबी ईक्वलाइझिंग वॉल्व असेम्ब्ली अँड स्पेयर पार्ट्स' फॉर ड्राय अॅश इव्हॅक्युएशन अँड कन्वेईंग सिस्टिम ड्यूरिंग एओएच अॅट एएचपी–१, टीपीएस, परळी वै. | २.८३ लाख ६३३४/– | १८.०४.२०२६ ते ०३.०५.२०२६ | ०४.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७४५९ | वर्क ऑफ रीपेयर ऑफ मेन हॉट एयर डक्ट पॅचिंग ए, बी अँड सी (लेफ्ट / राइट)/ कोल्ड एयर डक्ट पॅचिंग ड्यूरिंग एओएच ऑफ यू–७ अॅट बीएम–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | २.७३लाख ६२३७/– | १८.०४.२०२६ ते ०३.०५.२०२६ | ०४.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७४६० | वर्क ऑफ ईएसपी इनलेट डक्ट/आऊटलेट , एपीएच आऊटलेट डक्ट पॅचिंग सीडी साइड ड्यूरिंग ओवरहौल ऑफ यू–७ अॅट बीएम–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ३.०० लाख ६५०६/– | १८.०४.२०२६ ते ०३.०५.२०२६ | ०४.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७४८१ | प्रॉक्यूरमेंट ऑफ व्हेरियस साइज आइसोलेटिंग वॉल्वज फॉर अॅश इव्हॅक्युएशन अँड कन्वेईंग सिस्टिम ड्यूरिंग एओएच अॅट एएचपी–१, टीपीएस, परळी वै. | ८.३४ लाख ११८५०/– | १८.०४.२०२६ ते ०३.०५.२०२६ | ०४.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७५१४ | वर्क ऑफ ईएसपी इनलेट डक्ट/आऊटलेट , एपीएच आऊटलेट डक्ट पॅचिंग एबी साइड ड्यूरिंग ओवरहौल ऑफ यू–७ अॅट बीएम–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ३.०० लाख ६५०६/– | १८.०४.२०२६ ते ०३.०५.२०२६ | ०४.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७५२६ | प्रॉक्यूरमेंट ऑफ एपीएच ड्राइव स्पेयर्स अँड स्विव्हेल जाइंट फॉर एयर प्री–हीटर इन यू–६अँड७ अॅट बीएम–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ९.४४ लाख १२९४६/– | १८.०४.२०२६ ते ०३.०५.२०२६ | ०४.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७५३५ | प्रॉक्यूरमेंट ऑफ '२०० एनबी कप वॉल्व असेम्ब्ली अँड स्पेयर पार्ट्स' फॉर ड्राय अॅश कन्वेईंग सिस्टिम ड्यूरिंग एओएच अॅट एएचपी–१, टीपीएस, परळी वै. | २.९० लाख ६४०४/– | १८.०४.२०२६ ते ०३.०५.२०२६ | ०४.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७५३६ | प्रॉक्यूरमेंट ऑफ २०० एनबी ब्रांच सेग्रेगेशन वॉल्व असेम्ब्ली अँड स्पेयर्स पार्ट्स फॉर ड्राय अॅश इव्हॅक्युएशन सिस्टिम फॉर एओएच अॅट एएचपी–१, टीपीएस, परळी वै. | ४.६६ लाख ८१६०/– | १८.०४.२०२६ ते ०३.०५.२०२६ | ०४.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७५४२ | सप्लाय ऑफ क्रिटिकल ॲक्युमलेटर ऑफ एचपीसीव्हीज,आयपीसीव्हीज, एचपीबीपी, एलपीबीपी, वॉल्वज इन यू–७ सीओएच अॅट टीएम–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ११.८१ लाख १५३१५/– | १८.०४.२०२६ ते ०३.०५.२०२६ | ०४.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७४६५ | वर्क ऑफ ड्राय फ्लाय अॅश कन्वेईंग सिस्टिम १५०एनबी डोम वॉल्व असेम्ब्ली इन–सिटू रीपेरिंग अँड रिकंडिशनिंग अॅट एएचपी–८, टीपीएस, परळी वै. | ४.८३ लाख ८३३०/– | १८.०४.२०२६ ते ०९.०५.२०२६ | १०.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७५११ | वर्क ऑफ इन–सिटू रीपेयर , रिकंडिशनिंग अँड मशीनिंग ऑफ बाउल हब अँड स्क्रपर बॉक्स अलॉन्ग विथ मॉडिफीकेशन अँड इंस्टॉलेशन ऑफ असोसिएटेड स्पियर्स इन कोल मिल एक्सआरपी–९०३ अॅट बीएम–२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ११७.०० लाख १२०५००/– | १८.०४.२०२६ ते ०९.०५.२०२६ | १०.०५.२०२६ |

वरील तारीखेस ई–निविदा विक्री सुरू होण्याची वेळ ११:०० व ई–निविदा विक्री बंद होण्याची वेळ १६:००, निविदा किंमत व बयाना रक्कम ऑनलाइन पद्धतीने भरावयाची आहे.सर्व निविदा करिता निविदा किंमत रु. ११८०/– (जीएसटी सह) संपर्क व्यक्ती: मुख्य अभियंता, टीपीएस परळी–वैजनाथ. मेल आय डि: parlitpsrp@mahagenco.in, cegenparli@mahagenco.in अधिक माहितीसाठी आणि विक्रेता नोंदणीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्याः https://eprocurement.mahagenco.in, SRM help desk E-mail ID etendering.prl@mahagenco.in एस.आर.एम. मदत लाईन क्रमांक ८४११९७१५२५

**मुख्य अभियंता**

## PUBLIC NOTICE

**REGARDING LOSS OF DOCUMENTS**

This is to inform that the following original document has been lost at Vijapur Road near Gautam Nagar, Solapur, on 20/03/2026.

The present owner of the said property is Mr. Shabbir Ajmoddin Shaikh, who has lodged a Lost Document Report with Solapur City Police, Vijapur Naka Police Station, on 17/04/2026.

**Details of Lost Document:**

Sale Deed bearing Sr. No. 1270 dated 07/05/1993, executed between Mrs. Bebi Bharat Manjare and Mr. Jahiroddin Najiroddin Naikwadi, along with its Registration Receipt and Index II.

If any person finds the above document, they are requested to return it to the undersigned or contact immediately. The general public is hereby cautioned not to misuse the said document.

If any person has any claim or objection regarding the said document/property, they must inform in writing within 7 (seven) days from the date of publication of this notice, failing which it will be presumed that no such claim exists.

**Date: 17/04/2026**
**Place: Solapur**

**sd/-**
**Adv. Krishna Vijay Babare**
**(LL.B., LL.M.)**
**Plot No. 12, Jai Malhar Nagar,**
**Bale, Solapur Mo. 9168013333**

## जाहिर नोटीस

नि.दि. अपील. नं. १५१/२०२३
निशाण क्र. ३४

**सोलापूर येथील मे. जिल्हा न्यायाधीश सो यांचे न्यायालयात**
**(मा. श्री.पी.पी. राजवैद्य साहेब)**

**विमल ज्ञानोबा गायकवाड, वगैरे ४ - अपेलंट**
विरुध्द
**गिता संजीव खिलारे, वगैरे १३ - रिस्पोंडंट**
प्रति -
**८) पांडुरंग भागवत जानकर.**
रा. टाकळी सिकंदर, ता. मोहोळ, सोलापूर.

ज्याअर्थी उपरोक्त अपेलंट यांनी या न्यायालयात अपील दाखल केलेले आहे.

तुम्हाला याद्वारे ताकीद देण्यात येत आहे की, सदर अपीलाचे संदर्भात आपले म्हणणे मांडण्यासाठी दि. १९/०६/२०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता या न्यायालयात स्वतः अगर वकीलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला बोलावण्यात येत आहे.

सदर नोटीस प्रसिध्द होऊनही आपण गैरहजर राहील्यास तुमच्या गैरहजेरीत अपीलाची सुनावणी होऊन निर्णय दिला जाईल, याची दखल घ्यावी.

हे जाहीर नोटीस आज रोजी माझे सहीनिशी व शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे. दि. १३/०४/२०२६

**सही/-**
**लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**अधिक्षक**
**जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर.**

## जाहिर नोटीस

नि.दि.अपील. नं. १४५/२०२३
पु.ने.ता. १९/०६/२०२६ निशाण क्र. ४०

**सोलापूर येथील मे. जिल्हा न्यायाधीश सो यांचे न्यायालयात**
**(मा.श्री. पी.पी. राजवैद्य साहेब)**

**रामचंद्र संभाजी चव्हाण, वगैरे ४ - अपेलंट**
विरूध्द
**गिता संजीव खिलारे, वगैरे १६ - रिस्पाँडंट**
प्रति -
**१२) पांडुरंग भागवत जानकर.**
रा. टाकळी सिकंदर, ता. मोहोळ, सोलापूर.

ज्याअर्थी उपरोक्त अपेलंट यांनी या न्यायालयात अपील दाखल केलेले आहे. तुम्हाला याद्वारे ताकीद देण्यात येत आहे की, सदर अपीलाचे संदर्भात आपले म्हणणे मांडण्यासाठी दि. १९/०६/२०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता या न्यायालयात स्वतः अगर वकीलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला बोलावण्यात येत आहे.

सदर नोटीस प्रसिध्द होऊनही आपण गैरहजर राहील्यास तुमच्या गैरहजेरीत अपीलाची सुनावणी होऊन निर्णय दिला जाईल, याची दखल घ्यावी.

हे जाहीर नोटीस आज रोजी माझे सहीनिशी व शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे. दि. १३/०४/२०२६

**सही/-**
**लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**अधिक्षक**
**जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर.**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

शहर सोलापूर येथील तमाम जनतेस विशेषतः शहर सोलापूर येथील जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील मजरेवाडी येथील जुना सर्व्हे नं.२७३/१ नवीन सर्व्हे नं.१७/१ पैकी अंत्रोळीकर नगर भाग-१ मधील प्लॉट नं. ३८/पै याचे क्षेत्र ३.०१.५० आर.चौ.मी. अथवा ३०१.५० चौ.मी. अथवा ३२४४.१४ चौ. फुट इतके आहे. याची हद्द पुर्वपश्चिम - १८ मी. दक्षिणोत्तर - १६.७५ मी. अशी आहे. येणेप्रमाणे मिळकती जागा बेगराज घनशामदास तलरेजा रा. ३८, अंत्रोळीकर नगर भाग-१, कुमठा नाका, सोलापूर यांचे मालकी कब्जे वाहिवाटीचे होती व आहे. वरील नमूद मिळकत ही निर्वेध निजोखमी असल्याने व तसेच सदर वर नमूद मिळकतीचे मालकांनी तसा विश्वास दाखविल्याने आमचे अशिल यांनी वरील मिळकत मजरेवाडी सोलापूर हि मिळकत खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे सदरील मिळकतीवर इतर कोणाचीही, कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध, गहाण, दान, लिज, लीन, टाच, पोटगी, कोर्ट प्रकरण व इतर कायदेशीर हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी आपली हरकत नोंदवावी, त्यानंतर कोणाचीही, कसलीही प्रकारची तक्रार अथवा हरकत चालणार नाही, कोणाची फसवणूक, गैरसोय, नुकसान होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे दिनांक १६/०४/२०२६.

**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**सही/-**
**ॲड. धनश्री बी. कंदळे,**
**बी.एसी., एलएल.बी.,**
**१३०, सिध्देश्वर पेठ, कोर्ट लाईन,**
**गितांजली झेरॉक्स सेंटर, सोलापूर**
**मो.नं. ८६००३०४४३३**

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम जनतेस विशेषतः शहर बार्शी तालुका बार्शी पैकी बार्शी म्यु.पल हद्दीतील व आसपासचे परिसरातील जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी बार्शी म्यु. पल हद्दीतील मिळकत याचा गट नं. ५३७/२/२ या मिळकतीमधील माझे मालकीचा बिनशेती प्लॉट नं. २२, याचे क्षेत्रफळ १७४.२० आहे. याचा बिनशेती आकार रु. ११५-०० पैसे, यापैकी दक्षिण बाजुचा प्लॉट याचे क्षेत्रफळ ९५.२४ चौ.मी. आहे. याचे प्रत्यक्ष जागेवरील मोजमाप पूर्व बाजू मी. ६.७०, दक्षिण बाजू मी. १५.१५, पश्चिम बाजू मी. ६.७०, उत्तर बाजू मी. १३.२८ आहे. याची पाणी वागणुक पश्चिम बाजुचे रस्त्याने जाते व आहे. यासी चतुःसिमा :- पुर्वेस - प्लॉट नं. २१, पश्चिम - प्लॉट नं. २३, पश्चिमेस - ६ मी. रुंदीचा रस्ता, उत्तरेस - प्लॉट नं. २२ पैकी आजरोजी अलहिदा दस्ताने स्मिता सचिन उपरे यांना विक्री केलेला प्लॉट आहे. तसेच सदरची मिळकत ही मा. जिल्हाधिकार साहेब यांचेकडील बिनशेती आदेश क्र. मशा/१/कार्या-२/न.भू.२/एलएनए/एसआर/११/२०१२ सोलापूर दि . ०२/०८/२०१२ अन्वये बिनशेती एन.ए. झाली आहे.

येणेप्रमाणे वरील वर्णन केलेली मिळकत ही संतोष निवृत्ती चोरघडे, व श्री. कांता निवृत्ती चोरघडे दोघेही रा. खांडवी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांची मालकीची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची असून ७/१२ हक्कपत्रकी त्यांचे नावे दाखल असून त्यांनी सदर मिळकत त्यांचे कौटुंबिक व कायदेशीर गरजेपोटी आमचे पक्षकारास कायमखुष खरेदी देण्याचा ठराव केलेला आहे. खरेदी देणार यांनी सदर मिळकत हि निर्वेध, निजोखमी असल्याची खात्री आमचे पक्षकारास दिलेली आहे. तसेच त्यांनी सदरची मिळकत हि निर्वेध निजोखमी खरेदी देण्याचे मान्य केलेले आहे.

याही उपर सदर मिळतीबाबत कोणाचे कसलेही कायदेशीर अधिकार, हक्क, साटेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, कुळ वहिवाट, वहिवाटीचे अधिकार मालकी हक्क, वारसा, गहाणपट्टा, बटईपत्र, पोटगी, चोळी-बांगडी अथवा विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही स्वरूपाचे कायदेशीर हक्कअधिकार असल्यास त्यांनी खालील नमूद पत्तयावर योग्य त्या कागदपत्रानिशी व पुराव्यासह खालील नमूद पत्त्यावर हे जाहिर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून आठ (०७) दिवसात लेखी हरकत कळवावी. अन्यथा वरील नमूद मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आलेस आमचे पक्षकार हे सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी असल्याचे प्रामाणिकपणे गृहित धरून खरेदीदेणार यांचे बरोबर ठरलेल्या अटी व शर्तीप्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. ता. १७/०४/२०२६

**सही/-**
**ॲड. गणेश किसन हांडे**
**बी.ए., एलएल.बी.**
**ऑफीस पत्ता - हांडे गल्ली, कसबा पेठ,**
**बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**मो.नं. ७७७५०३७८८६**
**खरेदी घेणार तर्फे ॲडव्होकेट**

## लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर

**९४/२९ मंगल प्लाझा, पहिला मजला, जोडभावी पेठ, सोलापूर**

**''नमुना झेड''**
**नियम १०७ पोटनियम (११) (ड-१) पहा**
**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

ज्याअर्थी खाली सही करणार विशेष वसुली अधिकारी, लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या, सोलापुर ९४/२९ मंगल प्लाझा, पहिला मजला, जोडभावी पेठ, सोलापूर यांनी सदर पतसंस्थेच्या खालील दर्शविलेल्या धकवाकीदार कर्जदार व त्यांचे जामीनदार यांचेविरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ (१) अंतर्गत संस्थेने प्राप्त केलेल्या वसुली दाखल्यास अनुसरून कलम १५६ व नियम १०७ मधील तरतुदीस अनुसरून थकबाकीदार कर्जदारांना प्रथम मागणी नोटीस देऊन त्यांचाकडील थकबाकीची रक्कम भरण्याबाबत कळविलेले होते. परंतु थकबाकीदार कर्जदाराने रक्कम भरण्यास कसूर केल्याने त्यांच्या स्थावर मालमत्ता जप्त केल्या आहेत. या उपरी ऋणकोने त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे ऋणकोला या नोटीसीव्दारे त्यांच्या स्थावर मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा घेतल्याबाबत कळविण्यात येत आहे तसेच सर्व नागरिकांना देखील सूचित करण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या थकबाकीदार, कर्जदार यांच्या मालमत्तेवर प्रतिकात्मक ताबा नियम १९६१ मधील नियम १०७ (११) (ड-१) नुसार विशेष वसुली व विकी अधिकारी यांनी घेतला आहे.

विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे. सदर ताबा घेतलेल्या मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि जर असा व्यवहार केल्यास लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या, सोलापूर या संस्थेच्या बोजाची रक्कम आणि त्यावरील व्याज याला संबंधितांना अधीन रहावे लागेल.

**स्थावर मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव | जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन | क्षेत्राचे एकक हे.आर. चौ.मी | जप्ती आदेश दिनांक | प्रतिकात्मक ताबा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. चिडगुंपी योगीनाथ शिवानंद | मौजे हत्तुर, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं ९७ | १.०७.६९ | ०९/१२/२०२५ | ०७/०४/२०२६ |
| | | मौजे हत्तुर, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं ९८ | ०.९२.३० | | |
| | | मौजे हत्तुर, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं ९२ | १.०६.६६ | | |
| | | मौजे हत्तुर, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं ९९ | ०.९२.३० | | |
| | | मौजे हत्तुर, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं १०० | ०.९२.३० | | |
| | | मौजे हत्तुर, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं ९३ | ०.९२.३० | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं १०३ | ०.९२.३० | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं ३१ | १.०६.६६ | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं ९० | ०.९२.३० | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं ३० | ०.९२.३० | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं १०१ | १.०६.६६ | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं २९ | ०.९२.३० | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं ४२ | १.०६.६६ | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/ प्लॉट नं ०१ | २.९४.८५ | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं ४३ | ०.९२.३० | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं ८७ | ०.९२.३० | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं ४४ | ०.९२.३० | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं ८६ | ०.९२.३० | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं ८८ | ०.९२.३० | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/आरआर रोड | ३.४८.२६ | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं ८९ | ०.९२.३० | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं ९१ | १.०६.६६ | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं ११० | ०.९२.३० | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं ४५ | ०.९२.३० | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं ११४ | १.२१.९८ | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं १०९ | ०.९२.३० | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं ११३ | १.२१.९८ | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं १०७ | १.०६.६६ | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं १०८ | ०.९२.३० | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं १११ | १.१२.३७ | | |
| | | मौजे हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं ४३९/२/प्लॉट नं ११२ | १.६०.०० | | |
| २ | श्री. हणमंत जनार्धन शिंदे | मौजे अनवली ता. पंढरपूर जि. सोलापूर येथील गट नं ७१७ | ०.६१ | १०/०४/२०२४ | ३०/०७/२०२५ |
| | | मौजे अनवली ता. पंढरपूर जि. सोलापूर येथील ग्रामपंचायत मिळकत क्र. ९८३ | ६०० चौ.फु. बांधीव घरजागासह | २६/०३/२०२४ | ३०/०७/२०२५ |
| ३ | सौ. छाया नारायण शिंदे | मौजे अनवली ता. पंढरपूर जि. सोलापूर येथील गट नं ५९८/३ | ०.३५ | १०/०४/२०२४ | ३०/०७/२०२५ |
| | | मौजे अनवली ता. पंढरपूर जि. सोलापूर येथील ग्रामपंचायत मिळकत क्र. ४११ | ९०० चौ.फु. बांधीव घरजागासह | २६/०३/२०२४ | ३०/०७/२०२५ |

**स्थळ : सोलापूर**
**दि. १८/०४/२०२६**

(शिक्का)

**सही/-**
**श्री. प्रशांत तात्यासाहेब क्षिरसागर**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर**




## महत्त्वाचे

### राजस्थानच्या व्यवस्थापकाला १ लाख रुपयांचा दंड

**नवी दिल्ली** : बीसीसीआयच्या पीएमसीए नियमावलीचे उल्लंघन केल्याप्रकरणी राजस्थान रॉयल्सचे संघ व्यवस्थापक रोमी भिंदर यांना १ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या सामन्यादरम्यान, भिंदर हे डगआउटमध्ये (खेळाडूंच्या राखीव जागेत) मोबाईल फोन वापरताना दिसून आले होते. या घटनेबाबत बीसीसीआयच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने भिंदर यांच्याकडे स्पष्टीकरण मागितले होते. पीएमसीएचे नियम अत्यंत कडक असून, त्यांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे बीसीसीआयने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे. भविष्यात बीसीसीआयच्या नियमावलीचे अशा प्रकारे पुन्हा उल्लंघन न करण्याबाबत भिंदर यांना ताकीद देण्यात आली आहे. ■

### विनोद कांबळीच्या प्रकृतीबद्दल अफवा



**मुंबई** : भारताचा माजी क्रिकेटपटू विनोद कांबळीची पत्नी, अँड्रिया ह्युइटने कांबळीच्या गंभीर आरोग्य समस्यांविषयीचे वृत्त फेटाळून लावले आहे. अफवांनुसार, कांबळीच्या मेंदूत रक्ताची गाठ झाल्याने त्याच्या स्मरणशक्तीवर परिणाम होत होता. विनोद कांबळीची प्रकृती ठीक असून हे वृत्त खोटे आहे, असे अँड्रिया ह्युइटने स्पष्ट केले. मित्र आणि क्रिकेट जगतातील सदस्य कांबळीला भावनिक व आर्थिक पाठिंबा देत आहेत. कांबळी गत काही काळापासून आरोग्याच्या समस्यांना तोंड देत आहेत आणि अलीकडच्या काळात

# कॅमेरॉन ग्रीनची झंझावाती खेळी

### केकेआर सर्वबाद १८०




♦ **अहमदाबाद, १७ एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात शुक्रवारी नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुजरात टायटन्सविरुद्धच्या आयपीएल सामन्यात प्रारंभी घसरगुंडी उडाल्यानंतर कॅमेरोन ग्रीनच्या दमदार फलंदाजीच्या बळावर कोलकाता नाईट रायडर्सने (केकेआर) २० षटकांत १८० अशी आव्हानात्मक धावसंख्या उभारली. आता गुजरातसमोर विजयासाठी १८१ धावांचे लक्ष्य राहिले.

केकेआरचा कर्णधार अजिंक्य रहाणेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि आपल्या अंतिम एकादशमध्ये न्यूझीलंडचा यष्टिरक्षक-फलंदाज टिम सेफर्टच्या जागी त्याचा देशबांधव फिन ॲलनला स्थान दिले.

डावाच्या प्रारंभीच गुजरातच्या मोहम्मद सिराज व कॅगिसो रबाडाने जोरदार आक्रमण करीत केकेआरचे कंबरडे मोडले. पॉवरप्लेच्या अखेरीस केकेआरने ३७ धावांवर ३ गडी गमावले. आयपीएल २०२६ मधील ही सहा षटकांतील पाचवी सर्वात कमी धावसंख्या आहे.

मोहम्मद सिराजने सामन्याच्या चौथ्याच चेंडूवर अजिंक्य रहाणेला (०) रबाडाकडून झेलबाद केले. दुसऱ्या षटकाच्या अखेरच्या चेंडूवर रबाडाने अंगकृश रघुवंशीला बटलरकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. त्यानंतर रबाडाने टिम सेफर्ट (१९) फिलिप्सकडून झेलबाद केले.

त्यानंतर कॅमेरॉन ग्रीन व रोवमन पॉवेलने संयमाने फलंदाजी करत केकेआरचा डाव सावरला. दरम्यान, रबाडाने एका चेंडूवर कॅमेरॉन ग्रीनविरुद्ध पायचित झाल्याची जोरदार अपील केली, परंतु पंचांनी नाकारली. त्याचा लाभ घेत ग्रीनने आपले अर्धशतक साजरे केले. ग्रीनने पॉवेलसोबत चौथ्या गड्यासाठी ५५ धावांची भागीदारी केली.

अशोक शर्माच्या वेगवान माऱ्याला बळी पडण्यापूर्वी पॉवेलने २० चेंडूंत २ चौरकार व तेवढ्याच षट्कारांच्या मदतीने २७ धावा केल्या. त्यानंतर ग्रीनला साथ देण्यास आलेले अनुकूल रॉय (९) प्रसिध कृष्णाच्या, तर रिंकू सिंग (१) रबाडाच्या गोलंदाजीवर बटलरकडून झेलबाद झाले. तोपर्यंत केकेआरने १५.१ षटकांत ६ बाद १४८ धावांपर्यंत मजल मारली होती.

कॅमेरॉन ग्रीनने एका टोकावरून खंबीरपणे फलंदाजी करीत सहकाऱ्यांच्या मदतीने वैयक्तिक शतकाकडे व संघाची धावसंख्या वाढविण्याचा प्रयत्न करीत होता, मात्र अशोक शर्माने रमणदीप सिंगच्या (१७) रूपाने आपला दुसरा बळी मिळविला, तर मोहम्मद सिराजने सुनील नरेनच्या (०) रुपाने आपला दुसरा बळी घेतला. नंतर झटपट धाव काढण्याच्या नादात कार्तिक त्यागी (६) धावबाद झाला. रसिख खानच्या अखेरच्या चेंडूवर कॅमेरॉन ग्रीन बटलरकडून झेलबाद झाला व याबरोबरच केकेआरचा डाव २० षटकांत १८० धावांत आटोपला. ग्रीनने ५५ चेंडूंत ७ चौकार व ४ षट्कारांसह ७९ धावांची दिमाखदार खेळी केली.

गुजरात टायटन्सकडून कॅगिसो रबाडाने ३ बळी, मोहम्मद सिराज व अशोक शर्माने प्रत्येकी २ बळी, तर प्रसिध कृष्णा व रसिखानने प्रत्येकी एक बळी टिपला. ◂(वृत्तसंस्था)

# प्रफुल्ल हिंगे, साकिबच्या कामगिरीकडे लक्ष

### संतुलित हैदराबादची गाठ चेन्नईशी



साकिब हुसेन व प्रफुल्ल हिंगे

♦ **हैदराबाद, १७ एप्रिल**

प्रफुल हिंगे व साकिब हुसेन या दोन रोमांचक युवा वेगवान गोलंदाजांना संधी दिल्यानंतर, एक संतुलित संघ म्हणून सनरायझर्स हैदराबाद शनिवारी येथे चेन्नई सुपर किंग्स (सीएसके) विरुद्धच्या सामन्यात नव्या आत्मविश्वासाने मैदानात उतरणार आहे.

अनुभवी गोलंदाज हर्षल पटेल व जयदेव उनाडकटच्या जागी संघात स्थान मिळालेल्या या दोन नवख्या गोलंदाजांनी आपल्या कामगिरीचा त्वरित प्रभाव पाडला. या दोघांनाही यापूर्वी आंतरराष्ट्रीय सामन्यांचा अनुभव नाही, त्यांनी राजस्थान रॉयल्सला पहिल्या तीन षटकांतच ५ बाद ९ अशा दयनीय स्थितीत आणले व या हंगामातील त्यांचा पहिला पराभव निश्चित केला.

२४ वर्षीय विदर्भचा वेगवान गोलंदाज हिंगे हा या सामन्यातील सर्वात लक्षवेधी गोलंदाज ठरला. आपल्या पहिल्या दोन भेदक षटकांमध्ये त्याने ध्रुव जुरेल, लुहान-द्रे प्रिटोरियस व कर्णधार रियान पराग यांचा समावेश असलेली रॉयल्सची अव्वल फळी उद्ध्वस्त केली. त्याने ३४ धावांत ४ बळी घेत आपली गोलंदाजी संपवली.

बॅक-ऑफ-अ-लेन्थ (मागील टप्प्यावरून) चेंडू टाकून उसळी मिळवण्यात हिंगे प्रभावी ठरला; तर बिहारचा २१ वर्षीय, यापूर्वी फारशी चर्चा नसलेला आणि कोलकाता नाईट रायडर्सकडून दुर्लक्षित झालेला साकिब हुसेन यानेही आपल्या पदार्पणाच्या सामन्यात त्याला उत्तम साथ दिली.

या दोन युवा गोलंदाजांच्या उदयामुळे सनरायझर्स हैदराबादच्या वेगवान गोलंदाजीला बळकटी मिळाली आहे. तसेच, अभिषेक शर्मा, ट्रॅव्हिस हेड, ईशान किशन व हेनरिक क्लासेन यांसारख्या फलंदाजीची प्रचंड ताकद असलेल्या या संघाला यामुळे अधिक चांगला समतोल प्राप्त झाला आहे.

**गायकवाडवर दबाव टाकणार**

हिंगे व हुसेन या जोडीचे लक्ष आता सीएसकेचा कर्णधार ऋतुराज गायकवाड याच्यावर अधिक दबाव टाकण्यावर असेल. या हंगामात धावा काढण्यासाठी ऋतुराजला संघर्ष करावा लागत आहे. आतापर्यंत खेळलेल्या पाच डावांमध्ये त्याची सर्वोच्च धावसंख्या केवळ २८ इतकीच आहे.

संजू सॅमसनने पुन्हा एकदा आपला टी-२० विश्वचषकातील फॉर्म गवसल्याचे संकेत दिले आहेत. दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध त्याने नाबाद शतक ठोकले, आणि त्यानंतर कोलकाता नाईट रायडर्सविरुद्धच्या विजयात ४८ धावांची महत्त्वपूर्ण खेळी साकारली.

सीएसके युवा खेळाडू आयुष म्हात्रे याला वरच्या क्रमांकावर बढती देण्याचा विचार करू शकतो. आयुषने आपल्या मागील चार डावांमध्ये दोन अर्धशतके झळकावून सर्वांना प्रभावित केले.सलग तीन पराभवांसह वाईट सुरुवातीनंतर पाच वेळच्या विजेत्या सीएसके संघाने सलग दोन विजय मिळवून जोरदार पुनरागमन केले आहे. सीएसके अजूनही महेंद्र सिंह धोनीशिवाय खेळत आहे. धोनी मुंबईतील पुढील सामन्यासाठी तंदुरुस्त होण्याची अपेक्षा आहे. ◂(वृत्तसंस्था)

# खेलो इंडिया आर्चरी केंद्र सोलापूर जिल्हा निवड चाचणी २८ एप्रिलला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल -**

क्रीडा व युवक सेवा, संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी जिल्हा क्रीडा संकुल येथे खेलो इंडीया आर्चरी केंद्र स्थापना करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरचे केंद्र जिल्हा क्रीडा संकुल कुमठानाका सोलापूर येथे सरु करण्यात येत आहे. या आर्चरी प्रशिक्षण केंद्रात खेळाडूंना मोफत मार्गदर्शन मिळणार आहे. या आर्चरी प्रशिक्षण केंद्रात खेळाडूंना प्रवेशासाठी निवड चाचणी २८ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता आयोजित केली आहे. यासाठी (२१ वर्षाखालील मुले /मुली) खेळाडूचा जन्म हा १ जानेवारी २००५ अथवा त्यानंतरचा असावा. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शाळा, महाविद्यालय व क्रीडा मंडळांनी आपले विहित नमुण्यातील खेळाडूंचे प्रवेश अर्ज/नोंदणी करावी.याकरिता सोबत खेळाडू आधार कार्ड, १० वी बोर्ड सर्टिफिकेट, जन्म प्रमाणपत्र, बोनाफाईड प्रमाणपत्र व आर्चरी, या खेळाचे जिल्हा,विभाग व राज्य अथवा मान्यता प्राप्त संघटनेचे प्रमाणपत्र जोडून २४ एप्रिल २०२६ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कुमठा नाका सोलापूर येथे सादर करावेत किंवा dsosolapur1gmail. com या मेलवर पाठविण्यात यावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केलेले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे कार्यासन अधिकारी श दत्तात्रय वरकड ७२११५५२५२ तसेच दिपक चिकणे ८१४९००१७१८ यांच्याशी संपर्क साधावा. सबधिंत निवड चाचणीमध्ये सहभागी होणा-या खेळाडूंना कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च अथवा भोजन खर्च देण्यात येणार नाही, यांची खेळाडूनी नोंद घ्यावी.

# सोलापूरची विजयी घौडदौड सुरु, जालन्यावर विजय

### १६ वर्षाखालील क्रिकेट: कर्णधार संदेश गाडेचे शानदार शतक; श्रवण माळी 'मॅन ऑफ द मॅच'



संदेश गाडे



श्रवण माळी



आदित्य माने



फरहान सय्यद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल -**

पुणे येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या १६ वर्षाखालील साखळी क्रिकेट स्पर्धेत सोलापूरच्या संघाने आपली चमक दाखवत जालना जिल्हा संघावर पहिल्या डावातील ६५ धावांच्या आघाडीवर विजय मिळवला. या विजयासह सोलापूरने महत्त्वाचे तीन गुण आपल्या खात्यात जमा केले आहेत. सोलापूरने सलग दुसरा विजय नोंदविला आहे. सोलापूरचा कर्णधार संदेश गाडे याने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. संदेशने मैदानावर चौफेर फटकेबाजी करत १४ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने १०१ धावांचे दिमाखदार शतक ठोकले. त्याला आदित्य माने याने अवघ्या ४५ चेंडूत ६५ धावांची आक्रमक साथ दिली. सार्थक कन्ना (३३) आणि मयंक पात्रे (३४) यांच्या उपयुक्त योगदानामुळे सोलापूरचा पहिला डाव २८६ धावांवर मर्यादित राहिला. जालनाकडून अबू सय्यदने सर्वाधिक ४ बळी घेतले.

**सोलापूरच्या गोलंदाजांचा मारा**

प्रत्युत्तरात फलंदाजीला उतरलेल्या जालना संघाचा पहिला डाव सोलापूरच्या अचूक माऱ्यासमोर अवघ्या १२८ धावांत आटोपला. सोलापूरकडून ऋग्वेद पाटील आणि फरहान सय्यद यांनी प्रत्येकी ३ बळी घेतले, तर श्रवण माळीने २ बळी मिळवत जालन्याची कंबरडी मोडली. पहिल्या डावात मोठी आघाडी मिळाल्याने सोलापूरने जालन्याला 'फॉलोऑन' दिला. दुसऱ्या डावात जालन्याने सावध खेळ करत ६ बाद १८८ धावा केल्या. मात्र, खेळ संपला तेव्हा सोलापूरला पहिल्या डावातील ६५ धावांच्या आघाडीच्या जोरावर विजयी घोषित करण्यात आले.

दोन्ही डावात सातत्यपूर्ण गोलंदाजी करत महत्त्वाचे गडी बाद करणाऱ्या सोलापूरच्या श्रवण माळीला 'सामनावीर' पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

# क्रीडा सवलत गुण प्रस्तावासाठी २० एप्रिलपर्यंत मुदतवाढ

### स्टेट बोर्डाच्या १० वी, १२ वीच्या खेळाडू विद्यार्थ्यांसाठी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेला बसलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाची बातमी आहे. या विद्यार्थ्यांचे क्रीडा सवलतीचे गुण मिळवण्यासाठीचे प्रस्ताव ऑनलाइन सादर करण्यास आता २० एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात असल्याचे

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने सर्व विभागांना कळविले आहे. यापूर्वीची अंतिम तारीख १५ एप्रिल २०२६ अशी होती.

राज्य मंडळाच्या ८ एप्रिल २०२६ च्या पत्रानुसार ही मुदतवाढ देण्यात आली आहे. संबंधित खेळाडू विद्यार्थ्यांनी आपले प्रस्ताव ऑनलाइन पद्धतीने विहित मुदतीत सादर करणे आवश्यक आहे. प्राप्त अर्जांची छाननी करून ते पुढील कार्यवाहीसाठी मुदतीत सादर करण्याचे निर्देश विभागीय सचिव यांनी जिल्हा



क्रीडाधिकाऱ्यांना दिले आहेत.

या निर्णयामुळे तांत्रिक कारणास्तव किंवा अन्य कारणांमुळे अर्ज करू न शकलेल्या अनेक खेळाडू विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, त्यांना परीक्षेतील हक्काचे क्रीडा सवलत गुण मिळवण्याची शेवटची संधी उपलब्ध झाली आहे.

# सोलापूरच्या रणरागिणींची विजयी घोडदौड

## कोल्हापूर आणि पुण्यावर दिमाखदार विजय

**सोलापूर, दि. १७ एप्रिल -**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या महिला वरिष्ठ गटाच्या सुपर लीग क्रिकेट स्पर्धेत सोलापूरच्या संघाने आपली विजयाची लय कायम राखली आहे.


गुरुवारी आणि शुक्रवारी झालेल्या सलग दोन सामन्यांत सोलापूरने अनुक्रमे रिक्रिएशन पुणे आणि कोल्हापूर संघाचा पराभव करून स्पर्धेत वर्चस्व निर्माण केले. या दोन्ही विजयांत अष्टपैलू साक्षी वाघमोडे हिने चकाकणारी कामगिरी केली. तिला आर्या उमाप व प्रतिभा माशाळे यांनी साथ दिली

**कोल्हापूरवर ४ गडी राखून मात**

शुक्रवारी झालेल्या चुरशीच्या लढतीत सोलापूरने कोल्हापूरचा ४ गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना कोल्हापूरचा संघ ४९.१ षटकांत २०१ धावांवर सर्वबाद झाला. कोल्हापूरच्या अनुजा पाटीलने ५४ धावांची खेळी केली, मात्र सोलापूरच्या साक्षी वाघमोडेने ३७ धावांत ३ बळी घेत त्यांना रोखले.



साक्षी वाघमोडे



आर्या उमाप



प्रतिभा माशाळे

२०२ धावांचे आव्हान सोलापूरने ४०.५ षटकांत ६ गड्यांच्या मोबदल्यात यशस्वीरीत्या पूर्ण केले. सलामीवीर आर्या उमापने ९४ चेंडूंत १४ चौकारांसह ८५ धावांची धडाकेबाज खेळी केली, तर साक्षी वाघमोडेने फलंदाजीतही चमक दाखवत ४७ धावा जोडल्या. अष्टपैलू कामगिरीबद्दल साक्षीला 'सामनावीर' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**पुण्याला १२० धावांनी नमवले**

पुणे येथेच गुरुवारी झालेल्या सामन्यात सोलापूरने रिक्रिएशन पुणे संघाचा १२० धावांनी धुव्वा उडवला. सोलापूरने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ५० षटकांत ४ बाद २५८ धावांचा डोंगर उभा केला. यामध्ये साक्षी वाघमोडे (८७ धावा) आणि प्रतिभा माशाळे (७० धावा) यांनी शतकी भागीदारी करत भक्कम पाया रचला. आर्या उमाप (३२) आणि गौरी पाटील (२७) यांनीही मोलाची साथ दिली.

प्रत्युत्तरादाखल पुण्याचा संघ अवघ्या १५८ धावांत गारद झाला. सोलापूरच्या भक्ती पवारने ३, तर साक्षी वाघमोडे आणि स्नेहा शिंदे यांनी प्रत्येकी २ बळी घेऊन पुण्याच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. सोलापूर महिला संघाच्या या यशाबद्दल सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष दिलीपराव माने, चेअरमन रणजितसिंह मोहिते पाटील, व्हाईस चेअरमन श्रीकांत मोरे, संयुक्त सचिव धैर्यशील मोहिते पाटील आणि चंद्रकांत रेबूरसू, खजिनदार संतोष बडवे व इतर पदाधिकाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### वक्तृत्व स्पर्धेत जिजामाता प्रशालेचे यश

**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद सोलापूर आयोजित संस्कृती सातपुते जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती सोलापूर व उत्तर सोलापूर पंचायत समिती सभापती बोराडे यांच्या संकल्पनेतून सामाजिक समता सप्ताहांगर्त शालेय वक्तृत्व स्पर्धेत जिजामाता प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी स्नेहल शिंदे, आम्रपाली कांबळे, प्रांजली पवार, साक्षी देशपांडे, कल्याणी वाघमारे, आरती कांबळे यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमास पंचायत समिती उत्तर सोलापूरचे गटशिक्षणाधिकारी अवचल महाडिक विस्तार अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली बापूराव जमादार आणि विस्तार अधिकारी शिंदे केंद्र प्रमुख खोबरे, वाघमोडे, लतिफ तांबोळी यांच्या नियोजनाखाली विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ व सचिवा शिल्पा ठोकळ, मुख्याध्यापक उदय जाधव यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. स्पर्धेसाठी सारंग दशरथ पाटील यांनी परिश्रम घेतले.




### शहाजी पवार यांच्या वाढदिवसानिमित्त १ हजार वह्या व पेनचे वाटप

**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

कारंबा (ता. उत्तर सोलापूर. भारतीय जनता पार्टी यांच्यावतीने प्रदेश कार्यकारणी सदस्य शहाजीराजे पवार तसेच सोलापूर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तथा सभापती अर्थ व बांधकाम इंद्रजीत पवार यांची निवड झाल्याबद्दल तसेच वाढदिवसासाठी हार तुरे नारळ फेटे न आणता गोरगरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य तसेच शेतकऱ्यांना शेती अवजारे देण्यासाठी आवाहन केले असता कारंबा (ता. उत्तर सोलापूर) येथील भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी १००० वह्या व पेन देऊन वाढदिवसानिमित्त व निवड झाल्याबद्दल सन्मान केला. कार्यक्रमासाठी भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष विनायक सुतार, महादेव जाधव, भागवत कत्ते, महेश पेंडपाले, सरपंच तुकाराम चव्हाण, दत्तात्रय पवार, बळीराम भोरे, अनुरथ गुंड, शहाजी गायकवाड, शरीफ सय्यद, सत्तर शेख, अल्लू शेख, अतुल रोकडे, बाबुराव पाटील, प्रशांत जगताप, अमोल सुतार, जावेद शेख, मशाक शेख, संजय आदाटे, महिबूब शेख, मोईन शेख, अनिल सुतार, हरिहर सुतार, दगडू आदाटे, समर्थ सुतार, वेदांत सुतार, अनिल सुतार, अरुण सुरवसे, सचिन आदाटे, बबलू निचळ, राम माने, राम तोडकर, बाळू अदाटे, राजू कदम, मोहन जाधव उपस्थित होते



### आधुनिक भारताच्या उभारणीत डॉ. आंबेडकरांचे योगदान : प्रा. चंदनशिवे

**बार्शी, दि. १७ एप्रिल-**

जगातील आदर्श भारतीय राजघटना निर्माण करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आधुनिक भारताची उभारणी केली, असे प्रतिपादन प्रा. महेंद्र चंदनशिवे यांनी केले. येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्यावतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अब्दुल शेख होते. याप्रसंगी उपप्राचार्य रविंद्र वायकर, कला समन्वयक डॉ. बिरा पारसे, प्रबंधक प्रमोद जाधव, उत्सव समिती चेअरमन डॉ. शशिकांत शिंदे उपस्थित होते. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. अब्दुल शेख यांनी केले. प्रास्ताविक डॉ. शशिकांत शिंदे यांनी, सूत्रसंचालन डॉ. राहुल पालके यांनी, तर आभार प्रा. समाधान लोंढे यांनी मानले.

### पैशाच्या व्यवहारातून गरोदर महिलेस लाथाबुक्क्यांनी मारहाण

**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

पैशाच्या व्यवहारातून एका गरोदर महिलेस पाच-सहा जणांनी मिळून लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना महाराणा प्रताप झोपडपट्टी कुमठा नाका येथे घडली. रुपाली सुनील धनेवाले (वय-२६, रा.महाराणा झोपडपट्टी, सोलापूर) असे मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे. ती आठ महिन्यांची गरोदर असून आज दुपारी राहत्या घरासमोर असताना तिला पैशाच्या व्यवहारातून कृष्णा बिलोरीवाले, अजय बिलोरीवाले व इतर चार जणांनी मिळून लाथाबुक्क्याने मारहाण केली. नातेवाईक दीपा धनेवाली यांनी जखमी महिलेला उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

## निधन वृत्त...

### शंकर झोळ



**जेऊर दि.१७ एप्रिल-**

वाशिंबे (ता. करमाळा) येथील प्रगतशील व प्रयोगशील शेतकरी शंकर निवृत्ती झोळ (वय ६४) यांचे बुधवार, दि. १५ रोजी पहाटे अल्पशा आजाराने त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुलगे, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे.पत्रकार सुयोग झोळ व शैलेश झोळ यांचे ते वडील तर मकाई कारखान्याचे संचालक गणेश झोळ, किशोर झोळ, संग्राम झोळ यांचे चूलते होते.



# पाणीप्रकल्पावरून राजकीय वातावरण तापले

- भाजपच्या दोन्ही आमदार देशमुख यांनी विचारला आयुक्तांना जाब
- अजेंड्यातील इंग्रजी भाषेतील प्रस्तावामुळे व्यक्त केला संताप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ एप्रिल-**

महानगरपालिकेच्या २० एप्रिल रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत १४०० कोटींच्या पाणीपुरवठा योजनेचा विषय अजेंड्यावर आला असून, भांडवली मूल्य आधारित कर प्रणालीच्या मुद्द्यावरून शहरात राजकीय वातावरण तापले आहे. भाजपचे आमदार विजयकुमार देशमुख व सुभाष देशमुख यांनी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांची भेट घेऊन प्रशासनाला जाब विचारत आक्रमक भूमिका घेतली.

शुक्रवारी दुपारी महापौर विनायक कोंड्याल व सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी पत्रकार परिषद घेत प्रकल्प मंजुरीनंतर कोणतीही करवाढ केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले. नागरिकांमध्ये संभ्रम पसरू नये, यासाठी सत्ताधाऱ्यांनी आपली भूमिका मांडली. त्यानंतर तासाभरात दोन्ही आमदार देशमुख यांनी आयुक्तांची भेट घेतली. अजेंड्यातील विषय इंग्रजीत का दिला, मराठीत का नाही, असा सवाल उपस्थित केला.

स्थानिक भाषेचा सन्मान राखण्याची गरज विजय देशमुख यांनी व्यक्त केली. तसेच भांडवली मूल्य आधारित कर प्रणाली लागू करू नये, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. त्यावर आमदार देशमुख यांनी प्रत्येक वेळी चुका होतात. तुमच्या सोयीसाठी ते रिटायर झाले असतानाही कामावर ठेवले आहे, असे सांगितले. आ. सुभाष देशमुख यांनीही या प्रकल्पातील ५०० कोटींची वाढ कशी झाली, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत नगरसेवकांना विश्वासात घेतले नसल्याचा आरोप केला. दरम्यान, आयुक्त ओम्बासे यांनी अंतिम निर्णय सभागृहाचाच असल्याचे स्पष्ट केले. सत्ताधाऱ्यांकडून करवाढ नसल्याचे आश्वासन आणि त्याच पक्षातील आमदारांचा विरोध यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. आता २० एप्रिलच्या सभेत नेमका काय निर्णय होतो, याकडे सोलापूरकरांचे लक्ष लागले आहे.

# पिस्तूलसह अवैध शस्त्रसाठा आढळला

**५ महिन्यांत ८ पिस्तूल जप्त; गुन्हेगारीला कोणाचे संरक्षण?**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.१७ एप्रिल-**

बार्शी तालुक्यात अवैध शस्त्रसाठ्याचा वाढता धोका पुन्हा एकदा समोर आला असून, बार्शी तालुका ग्रामीण पोलिसांनी केलेल्या कारवाईत पिस्टलसह घातक शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. मात्र, गेल्या पाच महिन्यांत बार्शी शहर व तालुका ग्रामीण पोलीस हद्दीत तब्बल ८ पिस्तूल सापडल्याने कायदा व सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

बार्शी तालुका पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३, ४, २५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. १७ एप्रिल २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास, शेंद्री शिवारातील हॉटेल स्वामिनीसमोर पोलिसांनी सापळा रचून, ऋषिकेश रामेश्वर टिंगरे (वय २२ रा. शेंद्री, ता. बार्शी व तुषार रणजीत शिंदे (वय १७, रा.वांगरवाडी, ता. बार्शी) या दोघांना ताब्यात घेतले आहे.




या कारवाईत आरोपींकडून एक लोखंडी पिस्टल, तलवार आणि तीन कोयते असा घातक शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. तसेच नंबर नसलेली मोटारसायकलही जप्त करण्यात आली आहे. संबंधित आरोपींविरुद्ध बेकायदेशीररित्या शस्त्रे बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गेल्या काही महिन्यांत बार्शी शहर व बार्शी तालुका ग्रामीण पोलीस हद्दीत सातत्याने पिस्तूल सापडण्याच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अवघ्या पाच महिन्यांत ८ पिस्तूल सापडणे ही अत्यंत धोकादायक बाब मानली जात आहे.

# विशेष शिबिरातून हद्दवाढ भागातील गुंठेवारी प्रकरणांना मिळाली गती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

सोलापूर महानगरपालिकेच्या पुढाकारातून हद्दवाढ क्षेत्रातील गुंठेवारी प्रकरणे व नोटरी नोंदणी प्रक्रियेला गती देण्यासाठी विशेष शिबिरांची मालिका सुरू करण्यात आली. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी १६ ते ३० एप्रिल दरम्यान प्रभागनिहाय शिबिरे आयोजित करण्याचे आदेश दिले आहेत.

या उपक्रमांतर्गत १६ एप्रिल रोजी प्रभाग क्रमांक १९ मधील नीलम नगर परिसरातील नवदुर्गा देवस्थान येथे पहिले शिबिर पार पडले. भाग १९ च्या नगरसेविका कविता गज्जम, कलावती गदगे, नगरसेवक व्यंकटेश कोंडी, बसवराज केंगनाळकर यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी शिबिरस्थळाला भेट दिली. या शिबिरात ३५० नोटरी धारक मिळकतदारांनी अर्ज सादर केले. सातबारा उताऱ्यावर नोंदी असलेल्या मिळकतधारकांनी गुंठेवारी अंतर्गत मोजणीसाठी प्रस्ताव सादर करावेत, असेही सांगण्यात आले. मात्र, या परिसरातून गुंठेवारी मोजणीसाठी भूमी अभिलेख विभागाकडे अद्याप अर्ज प्राप्त झालेले नाहीत. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, भूमी अभिलेख विभाग तसेच महानगरपालिकेच्या नगररचना विभागातील सहाय्यक अभियंते शकील शेख, महेश क्षीरसागर, आनंद जोशी, प्रभाग अभियंता प्रमोद गोविंदवार आणि इतर अधिकारी-कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

या शिबिरांद्वारे प्रत्येक प्रभागात मिळकत धारकांकडून आवश्यक अर्ज व कागदपत्रे स्वीकारली जाणार असून, चुकलेले मुद्रांक शुल्क भरण्यासाठीचे अर्ज मुद्रांक विभागाकडे तर गुंठेवारी मोजणीसाठीचे अर्ज भूमी अभिलेख विभागाकडे तत्काळ पाठविण्याची कार्यवाही शिबिरस्थळीच केली जाणार आहे. अर्जदारांची माहिती व संपर्क क्रमांक नोंदवून प्रकरणांचा पुढील पाठपुरावा देखील करण्यात येणार आहे.

# बहिणीची छेडछाड करणाऱ्यांना जाब विचारल्याने भावाला मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१७ एप्रिल-**

बार्शी शहरात बहिणीला छेडछाड करणाऱ्या युवकांना जाब विचारण्यासाठी गेलेल्या तरुणावर कोयता, दांडका व पाईपने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आयान सरदार पठाण (वय १८, रा. मलीक चौक, परांडा रोड, बार्शी) हा आपल्या कुटुंबासह वास्तव्यास असून शिक्षण घेत आहे. त्याचे वडील परदेशात चालक म्हणून काम करत असून त्यांच्या उत्पन्नावर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. दि. १५ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास



आयान आपली बहिण मुस्कान हिला साईसंजीवनी हॉस्पिटल येथून कामावरून घरी घेऊन येत असताना, तिने ४२२ परिसरातील काही युवकांनी आपली छेडछाड केल्याची माहिती दिली. संबंधित युवक मारुती मंदिरासमोर उभे असल्याचे समजताच आयान त्यांना जाब विचारण्यासाठी सायंकाळी ७.३० वाजता तेथे गेला. यावेळी आरोपी रेहान काझी, राहील काझी, आयान सय्यद व अशरफ शेख यांनी आयानला शिवीगाळ करत मारहाण सुरु केली. साहील काझी याने त्याला पकडून ठेवले असताना रेहान काझी याने कोयत्याने डाव्या कानामागे वार केला. तसेच आयान सय्यद याने प्लॅस्टिकच्या पाईपने गालावर, तर अशरफ शेख याने लाकडी दांडक्याने चेहरा व पाठीवर मारहाण केली. राहील काझी यानेही पाईपने मारहाण केली. या हल्लयात जखमी झालेला आयान कसाबसा स्वतःचा बचाव करत तेथून पळून गेला. त्यानंतर तो आपल्या आईसह बार्शी शहर पोलीस ठाण्यात आला.

पोलिसांनी त्याला उपचारासाठी पाठवले असता त्याने ग्रामीण रुग्णालय, बार्शी येथे उपचार घेतले. यानंतर आयान पठाण याने संबंधित चारही आरोपींविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# सोनसाखळी चोर जेरबंद; ४ तोळे सोने जप्त

**आणखी तीन गुन्ह्यांची कबुली**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १७ एप्रिल-**

पंढरपूर शहरात महिलांच्या गळ्यातील सोनसाखळ्या हिसकावणाऱ्या चोरट्याला शहर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक करून त्याच्याकडून सुमारे ६ लाख ५ हजार रुपये किंमतीचे सोने जप्त केले आहे. या कारवाईत अंदाजे ४ तोळे ३ ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र हस्तगत करण्यात आले असून आरोपीने आणखी तीन गुन्ह्यांची कबुली दिली आहे.

आण्णा दशरथ लाडे (वय ३४, रा. सुपली, ता. पंढरपूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. ग्रामीण भागातून शहरात येऊन रेकी करत महिलांना लक्ष्य करण्याची त्याची पद्धत असल्याचे तपासात समोर आले आहे. इसबावी भागातील विसावा मंदिर परिसरात फिर्यादी व तिची आई दर्शन करून घरी परतत असताना नवशक्ती चौकात हा प्रकार घडला होता. काळ्या रंगाच्या मोटारसायकलवर हेल्मेट घालून आलेल्या आरोपीने फिर्यादीच्या गळ्यातील मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून पळ काढला होता. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, २९ मार्च रोजी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पथक पेट्रोलिंग करत असताना सरगम चौकात संशयित व्यक्ती आल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली असता संबंधित इसम मोटारसायकलवरून पळण्याचा प्रयत्न करू लागला. मात्र पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले. चौकशीदरम्यान त्याने गुन्ह्याची कबुली दिली. आरोपीकडून चोरीस गेलेले मंगळसूत्र तसेच गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे. पुढील चौकशीत त्याने शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत आणखी तीन चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिल्याने या प्रकरणाला गांभीर्य प्राप्त झाले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रीतमकुमार यावलकर, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे आणि पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गुन्हे प्रकटीकरण शाखेचे उपनिरीक्षक नितीन जगताप व त्यांच्या पथकाने ही यशस्वी कामगिरी बजावली. पंढरपूर शहरात वाढत्या सोनसाखळी चोरीच्या घटनांवर या कारवाईमुळे आळा बसण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# बार्शीत महिलेचा विनयभंग

**बार्शी, दि. १७ एप्रिल-**

बार्शी तालुक्यात एका ३१ वर्षीय महिलेचा विनयभंग करुन तिला व तिच्या पतीला जीवे मारण्याची धमकी दिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पीडित महिलेच्या फिर्यादीवरुन धनाजी नवले याच्याविरुद्ध बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. १६ एप्रिल रोजी दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास संबंधित महिला आपल्या घराबाहेर पाणी टाकण्यासाठी आली असता, संशयित आरोपी धनाजी नवले हा दुचाकीवरुन तेथे आला. त्याने महिलेचा हात धरुन ओढाओढी करत 'तू मला आवडतेस' असे म्हणत अश्लील वर्तन केले. महिलेने आरडाओरडा केल्यावर आरोपीने तिला व तिच्या पतीला जीवे मारण्याची धमकी दिली. तू ओरडलीस तर तुला आणि तुझ्या नवऱ्याला संपवून टाकीन, अशी धमकी देत त्याने महिलेला जबरदस्तीने ओढले. या झटापटीत महिलेची साडी फाटून तिचा विनयभंग झाला. दरम्यान, महिलेची जाऊ व मुले घटनास्थळी धावून आल्याचे पाहताच आरोपी तेथून दुचाकीवरुन पसार झाला. घटनेनंतर महिलेने आपल्या पतीला फोनवरुन माहिती दिली.

पती घरी आल्यानंतर त्यांनी तत्काळ बार्शी तालुका पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. पोलिसांनी या प्रकरणी धनाजी प्रताप नवले याच्याविरुद्ध विनयभंग व धमकावल्याच्या कलमान्वये गुन्हा नोंदवला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# आषाढीतील वारकरी व पूरग्रस्तांची सेवा स्मरणात राहिल : जंगम

**नूतन सीईओ कुशल जैन यांचे स्वागत तर जंगम यांना निरोप**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ एप्रिल-**

जिल्ह्यात आषाढी यात्रेत वारकरी यांचेसाठी केलेली सेवा व पुरग्रस्तासाठी केलेले काम स्मरणात राहिलें असे मत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी व्यक्त केले. सोलापूर सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती झाल्याबद्दल जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात निरोप समारंभ व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांची सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा स्वागत समारंभाचे आयोजन करणेत आले होते.

जिल्हा परिषदच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दिपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांचे हस्ते सिईओ जंगम व त्यांचे सुविद्य पत्नी डॉ. तेजस्वीनी जंगम यांचा सत्कार करून गणरायाची मूर्ती भेट दिली. तर नुतन



सिईओ कुशल जैन यांना श्री विठ्ठल रूक्मिणी मातेची मुर्ती देऊन स्वागत करण्यात आले. या प्रसंगी ग्रामीण विकास यंत्रणा विभागाचे प्रकल्प संचालक चंद्रकांत जगताप, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत भुजबळ, प्रमुख उपस्थित होते. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी, शिक्षणाधिकारी कादर शेख, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, डॉ. एस पी माने, लिपिक वर्गीय संघटनेचे अध्यक्ष अविनाश गोडसे, गणेश हुच्चे, संजय गौडगाव, मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे अध्यक्ष जवंजाळ, शिक्षक संघटनेचे रणजित थिटे, संतोष निळ यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्तविक जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी केले. याप्रसंगी प्रशासन अधिकारी अविनाश गोडसे, डॉ. एस पी माने, दयानंद परिचारक, गिरीष जाधव, सुधाकर माने-देशमुख, रणजित घोडके, अरूण क्षिरसागर, लेखा विभाग कर्मचारी संघटनेचे वतीने योगेश हब्बु, उमेश खंडागळे यांनू तर मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे अध्यक्ष जवंजाळ तसेच प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने म. ज. मोरे, सरचिटणीस श्रीकांत दळवी यांनी संघटनेचे वतीने नूतन सीईओ कुशल जैन व पिंपरी चिचंवड महानगर पालिकेचे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांचा सत्कार केला.

### सीईओ जंगम यांची बदली वेदनादायी : उपाध्यक्ष पवार



सीईओ कुलदीप जंगम यांची झालेली बदली वेदनादायी आहे. त्यांचे समवेत नुकतीच कामास सुरूवात केली होती. त्यांनी विविध उपक्रम समजावून सांगितले. या मध्ये माझे वैयक्तीक नुकसान झाले आहे. असे मत उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी व्यक्त केले.

### सीईओ जंगम यांचे पथदर्शी कामे पुढे चालू ठेवू : नूतन सीईओ कुशल जैन

सोलापूर जिल्हा भौगोलिक दृष्ट्या मोठा जिल्हा आहे. सिईओ कुलदीप यांनी राबविलेले पथदर्शी मार्गीने कामांची वाटचाल सुरू ठेवू, असे मत नूतन सीईओ कुशल जैन यांनी व्यक्त केले.

### कुलदीप जंगम देवमाणूस : अध्यक्ष वैद्य



जिल्हा परिषदेत काम करीत असताना शांत, संयमी असलेले कुलदीप जंगम हे देवमाणुस आहेत. असे मत जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दिपक वैद्य यांनी व्यक्त केले. चांगला सिईओ म्हणून त्यांची कारकिर्द स्मरणात राहिल असेही अध्यक्ष वैद्य यांनी सांगितले.

# दररोज पाणीपुरवठ्यासाठी १४०० कोटींचा प्रकल्प; कोणतीही करवाढ होणार नाही

## महापौर विनायक कोंड्याल यांच्यासह पदाधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण

## आयुक्तांनी तातडीने विषय पाठविल्याने अजेंड्यावर घेतला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

सोलापूर शहराला दररोज पाणीपुरवठा करण्याच्या उद्देशातून १४०० कोटी रुपयांच्या प्रकल्पाचा विषय महापालिका आयुक्तांनी तातडीने पाठविल्याने हा विषय अजेंड्यावर (विषय पत्रिकेत) घेतला आहे. या संदर्भात भाजपच्या पार्टी मीटिंगमध्ये आवश्यक तो निर्णय घेण्यात येणार आहे. करवाढी संदर्भात समज-गैरसमज निर्माण केला जात आहे. या प्रकल्पाच्या मंजुरीनंतर शहरवासीयांवर कोणताही कर अथवा दरवाढीचा बोजा पडणार नाही. इतर माध्यमातून महापालिका उत्पन्न वाढविणार आहे, असे स्पष्टीकरण महापौर विनायक कोंड्याल यांनी आज पत्रकार परिषदेत दिले. महापौर कार्यालयात महापौर विनायक कोंड्याल, सभागृह नेते नरेंद्र काळे, शहराध्यक्षा तथा नगरसेविका रोहिणी तडवळकर यांनी तातडीने पत्रकार परिषद घेऊन महत्त्वाकांक्षी अशा १४०० कोटींच्या पाणीपुरवठा योजना प्रकल्पासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली. यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते उपस्थित होत्या.

महापौर कोंड्याल पुढे म्हणाले, सोलापूर शहराला दररोज पाणीपुरवठा करण्यासाठी चौदाशे कोटीच्या प्रकल्प मंजूर झाला आहे तो विषय सोलापूर महापालिका सभेपुढे आला आहे शासनाकडे पाठविण्यासाठी महापालिका आयुक्तांनी तातडीने हा विषय मंजुरीसाठी सभेपुढे



पाठविला आहे. यामुळे हा विषय अजेंड्यावर यावर घेण्यात आला आहे मात्र या संदर्भात भांडवली मूल्य आधारित कर प्रणाली अथवा कर व दरवाढीचा समज - गैरसमज निर्माण झाला आहे. हा विषय मंजूर करत असताना सोलापूर शहरवासीयांवर कोणत्याही प्रकारचा कर अथवा दरवाढीचा बोजा पडणार नाही. कोणतीही कर वाढ अथवा दरवाढ होणार नाही. कोणत्याही अटी शर्तींना मान्यता देत असताना ०.१ ते ०.५ दर ठरविणे सोपे नाही. त्यासाठी अभ्यास करण्यात येणार असून त्यासाठी वेळ मागवून घेत आहोत. कोणत्याही स्थितीत कर वाढ करण्यात येणार नाही, अशी आमची ठाम भूमिका आहे.

मित्रा व जागतिक बँकेच्या अधिकाऱ्यांच्या सूचनेप्रमाणे सोलापूर शहरातील अंतर्गत जल वितरण व्यवस्था सुधारणा करण्याच्या कामासाठी अंदाजे १३७८.४२ कोटी इतक्या प्रकल्प अहवालास तांत्रिक मान्यता देण्यासाठी सादर करण्यास तसेच प्रकल्पामध्ये आवश्यकतेनुसार

**पत्रकार परिषदेतील ठळक मुद्दे**

- महापालिका उत्पन्न वाढविण्यासाठी तज्ञ समिती नेमण्याचा विचार
- खुल्या जागा भाडे आणि बीओटी प्रकल्पा द्वारे उत्पन्न वाढविणार
- मनपा कर वसुली ९० टक्के पर्यंत करण्याचे टार्गेट
- मनपा हिस्सा भरण्यासाठी कोणतीही कर वाढ होणार नाही
- पार्टी मीटिंगमध्ये या विषयावर चर्चाअंती निर्णय
- बीओटीचे अर्धवट प्रकल्प मार्गी लावणार

शासनाच्या मार्गदर्शनाप्रमाणे प्रकल्प खर्चामध्ये होणाऱ्या वाढ/कपातील मान्यता देण्यास आणि शासनाने निर्धारित केलेल्या वित्तीय आकृतीबंधानुसार सुचविलेल्या प्रमुख सुधारणा उपाय आणि सेवा परिणाम प्राधान्याने राबविण्यात यासाठी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे. त्यासाठी महापालिका आयुक्तांनी सर्वसाधारण सभेकडे मान्यतेस्तव हा प्रस्ताव पाठविला आहे. त्यासाठी हा विषय अजेंड्यावर घेण्यात आला आहे.

या प्रकल्पासाठी जागतिक बँक ६८९.२१ कोटी रुपये (५० टक्के) रक्कम कर्ज देणार आहे. केंद्र शासन २५ टक्के म्हणजेच ३४४.६१ कोटी रुपये अनुदान देणार आहे. सोलापूर महापालिका हिस्सा ३४४.६१ कोटी रुपये राहणार आहे. त्यासाठी महापालिका २०० कोटी रुपयांचे बाँड उभारणार आहे. तर उर्वरित दीडशे कोटी रुपये हे महापालिका स्तरावर बीओटीच्या जागा विकसित करून त्याचबरोबर कर वसुलीची टक्केवारी वाढविण्याबरोबरच इतर उत्पन्न वाढीचे स्त्रोत वापरात आणणार आहे. सोलापूर महापालिकेची मेजर गाळे असून त्या ठिकाणी पोट भाडेकरी ठेवले आहेत. ते मूळ मालक महापालिकेपेक्षा अधिक भाडे घेतात. त्याकडेही प्राधान्याने लक्ष देऊन नियमाप्रमाणे भाडे आकारणी केली जाणार आहे. महापालिकेच्या मोक्याच्या ठिकाणच्या कोट्यावधीच्या जागा मधून मिळणारे भाडे, बीओटी तत्त्वावरील जागांमधील उत्पन्न , विकसित करण्यासाठी दिलेल्या जागा आणि त्याचे उत्पन्न तसेच शहरातील नाम मात्र भाड्याने दिलेल्या समाज मंदिरे याद्वारे उत्पन्न वाढविण्यात येणार आहे.

पुणे व पिंपरी चिंचवड महापालिका श्रीमंत कशी झाली याचा अभ्यास करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने बीओटी तत्त्वांवर जागा देऊन उत्पन्न वाढविण्यात येणार आहे. या प्रकल्प मंजुरीमुळे कोणतीही करवाढ होणार नाही. याउलट महापालिकेकडे उत्पन्नाचे अनेक स्त्रोत्र आहेत. त्या माध्यमातून महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यावर प्राधान्याने भर दिला जाणार आहे. रविवार, दि.१९ एप्रिल रोजी पालकमंत्री जयकुमार गोरे हे सोलापुरात येणार आहेत. त्यावेळी या विषयासंदर्भात त्यांच्याशी चर्चा करून योग्य तो निर्णय घेण्यात येणार आहे. त्याचबरोबर स्थानिक लोकप्रतिनिधींशीही या विषयावर चर्चा करण्यात येणार आहे. पुरवणी अजेंडा निघाल्यानंतर पार्टी मीटिंग होत असते आणि यामध्ये या विषयासंदर्भात चर्चा करूनच पुढील आवश्यक तो निर्णय घेण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, प्रस्तावाच्या विरोधात भाजप अंतर्गत सह्याची मोहीम सुरू आहे का? या प्रश्नाच्या उत्तरात बोलताना महापौर विनायक कोंड्याल आणि सभागृह येथे नरेंद्र काळे म्हणाले, कोणाचाही दबाव नाही अथवा कोणाचीही सह्याची मोहीम घेण्यात आली नाही. नियमाप्रमाणे पार्टी मीटिंगमध्ये कोणत्याही विषयावर निर्णय होतो. याची सर्व सदस्यांना कल्पना आहे.

### मित्राचे भांडण सोडवण्यास आले असता मारहाण

**सोलापूर, दि.१७ एप्रिल-**

मित्राचे भांडण सोडवण्यासाठी आलेल्या मित्राला फायटर आणि हातातील कड्याने मारहाण केल्याची घटना गुरुवारी रात्री १० वाजेच्या सुमारास येथील शासकीय रुग्णालय पाठीमागील सिद्धार्थ चौकाजवळ घडली. अक्षय मनोज पत्तेवाले(वय २२ रा.सिद्धार्थ चौक) असे जखमी तरुणाचे नाव आहे. भांडण सोडवीत असताना त्याला राज बाडीवाले लड्डू बाडीवाले आणि इतर दोघांनी मिळून त्याला मारहाण केली. त्याला उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### मोटरसायकलच्या धडकेने पादचारी जखमी

**सोलापूर, दि.१७ एप्रिल-**

सातरस्ता परिसरातील बीएसएनएल टॉवर जवळ रस्ता ओलांडीत असताना दुचाकी धडकल्याने राजशेखर पुंडलिक उंबराणी (वय ४२ रा.यत्नाळ ता.दक्षिण सोलापूर) हे जखमी झाले. हा अपघात गुरुवारी रात्री नऊ वाजेच्या सुमारास घडला.त्यांना उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### महिलेने रॉकेल ओतून घेतले पेटवून

**सोलापूर, दि.१७ एप्रिल-**

मानसिक तणावातून एका ४५ वर्षीय विवाहित महिलेने राहत्या घरात अंगावर रॉकेल ओतून पेटवून घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील मद्रे येथे आज शुक्रवारी पहाटे १ वाजण्याच्या सुमारास घडली. महादेवी भारत चौगुले (रा.मद्रे) असे पेटवून घेतलेल्या विवाहितेचे नाव आहे. यात भाजून जखमी झाल्याने तिला उपचारासाठी पती भारत यांनी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

# सोलापूर-हैद्राबाद विमानसेवेची दमदार सुरुवात; पहिल्याच दिवशी उत्साहाचा जल्लोष

## विद्यार्थ्यांना पहिल्या विमानप्रवासाची संधी, प्रवाशांचे स्वागत मिठाई व केक कापून

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ एप्रिल-**

सोलापूर ते हैद्राबाद ही विमानसेवा फ्लाय ९१ यांच्या माध्यमातून अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात सुरू झाली. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार ठरताना सोलापूरकरांनी मोठ्या आनंदात या सेवेला स्वागत केले. या उद्घाटन सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे राऊंड टेबल इंडिया, सोलापूर शाखेच्या वतीने सावळेश्वर येथील न्यु समता प्रशालेतील ७ मुली, ३ मुले आणि एका शिक्षकांना त्यांच्या आयुष्यातील पहिल्या विमानप्रवासाचा अनोखा अनुभव करून देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि उत्सुकता हा क्षण अधिक संस्मरणीय ठरला.



सोलापूर-हैद्राबाद प्रवास करणाऱ्या सर्व प्रवाशांना मिष्टी मिठाई पार्क चौक, यांच्या वतीने नाश्त्या व मिठाई चे हँपर वाटप करण्यात आले.

सोलापूर विकास मंचच्या वतीने हा उपक्रम राबवण्यात आला, ज्यामुळे प्रवाशांचा प्रवास अधिक आनंददायी झाला. सोलापूर विकास मंचने सोलापूरातुन नागरी विमानसेवेच्या सुरूवातीसाठी घेतलेली अथक मेहनत आता प्रत्यक्षात उतरत असून विविध शहरात विमानसेवा सुरू होत आहे, शहराच्या विकासाच्या दिशेने हा एक मोठा टप्पा मानला जात आहे.

यावेळी फ्लाय ९१च्या वतीने प्रवाश्यांना बोर्डिंग पास वाटुन आणि केक कापुन विमानसेवेचे औपचारिक स्वागत करण्यात आले. कार्यक्रमास सोलापूर विकास मंचचे सदस्य केतन शहा, मनोज क्षीरसागर, योगीन गुर्जर, विजय कुंदन जाधव, हेमल शहा, सोलापूर हायफ्लायर्स राऊंड टेबल इंडिया ३०९ सोलापूर शाखेचे तरंग शहा, अभिषेखा झंवर, नितेश सकलेचा, पुष्कराज कोठारी, रोहित राठी, पंकज सचदेव, अश्विन मुंदडा, फ्लाय ९१चे एअरपोर्ट मॅनेजर राजेश्वर रंणसुभे व सोलापूर विमानतळ प्राधिकरणाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# मेन्यूकार्डवर ‘चीज ॲनालॉग’चा उल्लेख बंधनकारक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ एप्रिल-**

जिल्ह्यातील सर्व रेस्टॉरंट, हॉटेल्स, केटरर्स आणि फास्ट फूड विक्रेत्यांनी अन्नपदार्थ तयार करताना ‘चीज ॲनालॉग’चा वापर केल्यास त्याचा स्पष्ट उल्लेख मेन्यूकार्ड किंवा इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्डवर करणे आता बंधनकारक करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासनाने याबाबत सूचना जारी करत ग्राहकांना अन्नातील घटकांची पारदर्शक माहिती मिळावी यावर भर दिला आहे.

अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ च्या कलम १८ (२) (श) नुसार ग्राहकांना ते जे अन्न खातात त्यातील घटकांची अचूक माहिती मिळणे आवश्यक आहे. तसेच अन्न सुरक्षा व मानके (लेबलिंग व प्रदर्शन) नियम २०२० मधील नियमानुसार अन्न व्यवसायिकांनी अन्नातील पोषणमूल्ये, घटकपदार्थ आणि आवश्यक आरोग्य संदेश प्रदर्शित करणे बंधनकारक आहे.

‘चीज ॲनालॉग’चा पुरवठा किंवा विक्री करताना उत्पादनाच्या खऱ्या स्वरूपाचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक असून, ते ‘पनीर’ म्हणून विक्री करणे दिशाभूल करणारे ठरणार आहे. विक्री बिलावरही ‘चीज ॲनालॉग’ असा उल्लेख असणे आवश्यक आहे.

सदर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अन्न उत्पादक, पुरवठादार आणि विक्रेत्यांवर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. त्यामुळे सर्व संबंधित आस्थापनांनी नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनचे सहायक आयुक्त सी.ए. देसाई यांनी केले आहे.

# सेवेचे व्रत जपणारे सेवावृत्ती: गोविंद सोमानी व सुमन सोमानी

नांदेड येथील गोविंद सोमानी व सौ. सुमन सोमानी हे मूळतः शहरी जीवन जगणारे, सुस्थितीत व्यवसाय असलेले कुटुंब. नांदेड शहरात गोविंद सोमानी यांचा होलसेल प्लायवूड व ग्लास विक्रीचा मोठा व्यवसाय असून त्यांचे नाव शहरात मानाचे आहे. कुटुंबात तीन मुले, एक मुलगी व सहा नातवंडे असा मोठा परिवार आहे. माहेश्वरी समाजात राहून त्यांनी सामाजिक कार्याची परंपरा जपली.

गोविंदजींचे वडील कन्हैयालाल सोमानी यांच्याकडूनच त्यांना सेवाभावी संस्कारांची देणगी मिळाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी असलेला संपर्क, तसेच विविध कार्यकर्त्यांशी आलेली ओळख यामुळे त्यांच्या मनात समाजकार्याची बीजे रोवली गेली. नांदेडमधील संघ कार्यकर्ते राजेश्वरजी कमतलवार व पूर्णवेळ कार्यकर्ते रावसाहेब कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनातून त्यांना यमगरवाडी प्रकल्पाची माहिती मिळाली आणि तेथील कार्याने ते प्रेरित झाले.

व्यवसायाचा मोठा व्याप आणि कुटुंबाची जबाबदारी असूनही, समाजासाठी काहीतरी करण्याच्या भावनेतून त्यांनी एक मोठा निर्णय घेतला. परिवाराशी चर्चा करून, मुलांच्या संमतीने त्यांनी धाराशिव जिल्ह्यातील यमगरवाडी येथे पूर्णवेळ सेवावृत्ती म्हणून जाण्याचा निर्धार केला. भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानचे कार्यवाह विवेक अयाचित यांनीही त्यांना प्रेरणा देऊन या कार्यात सहभागी करून घेतले.

गेल्या तीन वर्षांपासून गोविंद सोमानी व सुमन सोमानी हे यमगरवाडी प्रकल्पात पूर्णवेळ सेवा देत आहेत. शहरातील जीवन सोडून, भटक्या-विमुक्त समाजातील मुलांमध्ये राहून त्यांनी एक वेगळेच जीवन अनुभवले. या समाजाची परिस्थिती, त्यांच्या अडचणी आणि त्यांच्या जीवनातील



वास्तव याची जाणीव झाल्यानंतर त्यांनी आपल्या सेवेला अधिक समर्पित केले.



गोविंद सोमानी यांनी विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, चांगल्या सवयी आणि शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. विशेषतः अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्यांवर त्यांनी अधिक लक्ष केंद्रित केले. विद्यार्थ्यांमध्ये बचतीची सवय रुजवण्यासाठी त्यांनी शाळेत बचत बँक आणि ग्राहक भांडार सुरू केले. या उपक्रमांचे व्यवस्थापन विद्यार्थी स्वतः करत असल्याने त्यांच्यात जबाबदारीची भावना विकसित झाली आहे. विद्यार्थ्यांच्या छोट्या-छोट्या गरजांपासून ते त्यांच्या भावनिक आधारापर्यंत, सोमानी काका सदैव त्यांच्या सोबत राहिले. त्यामुळेच विद्यार्थी व कर्मचारी त्यांना प्रेमाने सोमानी काका म्हणून ओळखतात. सुमन सोमानी यांनी मुलींमध्ये शिस्त, संस्कार आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी मोलाचे कार्य केले.

या सेवाकाळात त्यांनी अनेक विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना भेट देऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष उद्धवराव काळे, उपाध्यक्ष डॉ. अभय शहापूरकर, कार्यवाह विवेक अयाचित तसेच इतर सहकाऱ्यांकडूनही त्यांना प्रेरणा मिळाली. या काळात त्यांच्या नातवंडांची आठवण त्यांना वारंवार येत राहिली. नातवंडेही त्यांना घरी येण्याची विनंती करत असत. मात्र, सेवेला दिलेले वचन पूर्ण करण्यासाठी त्यांनी तीन वर्षे अखंडपणे कार्य केले. आज त्यांच्या या सेवाव्रताला तीन वर्षे पूर्ण झाली आहेत. आता ते सेवावृत्ती थांबवत असले तरी, भटक्या-विमुक्त समाजासाठी पुढेही काहीतरी करण्याची त्यांची प्रामाणिक इच्छा आहे. शहरी सुखसोयींचा त्याग करून, दुर्गम भागात जाऊन समाजासाठी काम करणे ही खरोखरच दुर्मिळ व प्रेरणादायी गोष्ट आहे. गोविंद सोमानी व सुमन सोमानी यांचे कार्य समाजासाठी आदर्शवत असून, त्यांच्या सेवाभावी वृत्तीला मनापासून सलाम.

**-विठ्ठल म्हेत्रे, मुख्याध्यापक,**
**एकलव्य विद्या संकुल, यमगरवाडी,**
**ता.तुळजापूर, जि.धाराशिव.**

# मोहोळचे ग्रामदैवत नागनाथ महाराजांच्या यात्रेस प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि १७ एप्रिल-**

मोहोळचे ग्रामदैवत सद्गुरु नागनाथ महाराजांच्या यात्रेस शुक्रवारी दि. १७ एप्रिल रोजी प्रारंभ झाला असून मंदिरात श्री पारंपारिक पद्धतीने व संत मंडळीच्या अभंग गायनाने अभिषेक करण्यात आला. यावेळी सुगंधित तैल स्नान घालून पंचामृताचा अभिषेक करण्यात आला. तेल लावण्याच्या कार्यक्रमानंतर बाशिंग बांधून राजेंद्र बुवा खर्गे महाराजांना कंकण बांधण्यात आले.

त्यानंतर पारंपारिक व यात्रा मार्गावरून खर्गे महाराजाची संवाद्य मिरवणूक आणि संत मंडळीच्या अभंग गायनाने काढण्यात आली. या मार्गावरील सर्व देवतास लिंबाच्या फाट्याच्या माळा घालून खडीसाखर व गुळाचा नैवेद्य दाखवून आरती करून देवतास आवाहन करण्यात आले. यामध्ये विठ्ठल मंदिर, जगदंबा मंदिर, महादेव मंदिर, खर्गतीर्थ म्हसोबा, काकडे पार, जुनी वेस, मंगीचा धोंडा या मंदिराचा समावेश होता. सर्व देवतास यात्रेस येऊन यात्रा निर्विघ्न पणे पार पाडावी अशी प्रार्थना करण्यात येते. शेवटी श्रीच्या मंदिरात महाआरती व हेग्रसवंशज अरुण काका मोहोळकर यांच्या घरी तयार करण्यात आलेल्या प्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास देशमुख, देशपांडे, गायकवाड, मोहोळकर, स्वामी, खर्गे, शेटे, वाले, कुर्डे, गावडे बारगजे, काकडे, काळे, दाईंगडे, सुतार, तोडकरी, घोंगडे, आदलिंगे, मोहोळकर उपस्थित होते.



### सम्राट चौकात दगड फेकून मारल्याने मुलगा जखमी

**सोलापूर, दि.१७ एप्रिल-**

ज्यूस गाडीवाल्याने दगड फेकून मारल्याने फझल शब्बीर शेख (वय १३, रा.गुळवंची, ता.उत्तर सोलापूर) हा मुलगा जखमी झाला. ही घटना आज शुक्रवारी सकाळी १०वा च्या सुमारास सम्राट चौकातील श्राविका शाळेजवळ घडली. फजल हा शाळेजवळील ज्यूस गाडी समोर थांबला होता. त्यावेळी कोणीतरी ज्यूसवाल्याची छेड काढली होती. तेव्हा त्याने दगड भिरकावून मारला. तो दगड डोक्यात लागल्याने फजल हा जखमी झाला. त्याला उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. ● मुख्य संपादक : प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. E-mail starunbharatgmail.com. ● Websate:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by DILIP SHIVMURTI DULANGE Printed at SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.Publised at TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 | RNI No. MAHMAR/2023/86468
● CHIEF GROUP EDITOR : DILIP YASHWANT PETHE ● CHIEF EDITOR : PRASHANT VASANTRAO MANE

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## तहसीलदारांवरील हल्ला; निषेधार्थ कामबंद आंदोलन



### अवैध वाळू प्रकरणावर कारवाईदरम्यान प्रकार; कर्मचाऱ्यांची संतप्त प्रतिक्रिया

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१७ एप्रिल -**

परंडा तहसीलचे कर्तव्यदक्ष तहसीलदार निलेश काकडे यांच्यावर दि.१५ एप्रिल रोजी सायंकाळी झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ तहसील कार्यालयातील सर्व कर्मचारी संघटनेने कामबंद आंदोलन सुरू केले आहे. याबाबतचे लेखी निवेदन तहसीलदारांना सादर करण्यात आले.

निवेदनानुसार, दि.१५ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता अवैध वाळू उत्खननाबाबत मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे कारवाईसाठी जात असताना योगेश परमेश्वर मेटकरी (रा. पिठापुरी, ता. परंडा) व अन्य एका इसमाने तहसील कार्यालयाच्या आवारात येऊन तहसीलदारांची गाडी अडवली. त्यांनी आरडाओरडा, शिवीगाळ करत गाडीच्या काचा ठोठावून दहशत निर्माण केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तहसीलदारांनी परिस्थिती शांत करण्याचा प्रयत्न केला असता संबंधित आरोपीने हुज्जत घालत त्यांच्या अंगावर धावून गेल्याचेही निवेदनात म्हटले आहे. या घटनेची नोंद परंडा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. यापूर्वीही संबंधित आरोपीने दोन वर्षांपूर्वी ग्राम महसूल अधिकाऱ्यावर प्राणघातक हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर अशा प्रवृत्तीच्या व्यक्तींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी कर्मचाऱ्यांनी केली आहे. निवेदनावर तहसीलदार निलेश काकडे, नायब तहसीलदार पूजा गोरे, नायब तहसीलदार पेषकार, मंडळ अधिकारी पवार यांच्यासह सुमारे ४५ कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**प्रशासनावर प्रश्नचिन्ह**

परंडा तालुक्यात अवैध वाळू उपसा मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याची चर्चा असून रातोरात नदीपात्रातून वाळूची चोरी होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. महसूल प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचेही बोलले जात आहे. सध्या केवळ करंजा येथील वाळू घाट सुरू असून इतर घाट बंद असल्याची माहिती आहे. बोटीच्या सहाय्याने वाळू उपसण्यासाठी परवानगी नसल्यामुळे वाळू माफियांकडून दबाव टाकला जात असल्याचेही समजते.

## संक्षिप्त वृत्त...



### जयप्रकाश विद्यालयास शिक्षक आ. विक्रम काळे यांची सदिच्छा भेट

**धाराशिव, दि.१७ एप्रिल -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी शिक्षकांशी विविध प्रश्नांवर चर्चा करत त्यांच्या अडचणी समजून घेत त्या सोडविण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष दादा कोळगे, रामदास आण्णा कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, शिवकन्या साळुंके, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### कानेगाव येथे ३२ मुलींचे एचपीव्ही लसीकरण

**लोहारा, दि.१७ एप्रिल -**

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास व जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. कुलदीप मिटकरी यांच्या मार्गदर्शनाखाली ८ मार्चपासून जिल्ह्यात एचपीव्ही लसीकरण मोहीम सुरू आहे. या अंतर्गत लोहारा तालुक्यातील कानेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात १६ एप्रिलपर्यंत एकूण ३२ लाभार्थ्यांचे लसीकरण करण्यात आले. यामध्ये लोहारा खू. ११, मोघा खू. ७, मोघा बु. ६, आर्णी ४, कानेगाव २, नागूर १ व मार्डी १ मुलींचा समावेश आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र कानेगाव येथे दररोज लसीकरण सत्र आयोजित करण्यात येत असून, आशा व आरोग्य कर्मचाऱ्यांनी १४ वर्ष पूर्ण व १५ वर्षांखालील मुलींना लसीकरणासाठी आणावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### वैजनाथ घोडके यांना 'डॉक्टरेट ऑफ सायन्स' सन्मान

**तुळजापूर, दि.१७ एप्रिल -**




श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य वैजनाथ घोडके यांना शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल युनिव्हर्सिटी ऑफ सेंट्रल अमेरिका यांच्याकडून 'डॉक्टरेट ऑफ सायन्स' ही मानद पदवी प्रदान करण्यात आली. डॉ.एस. राधाकृष्णन रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेंटर यांच्या शिफारशीनुसार त्यांच्या कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले प्रयत्न व संस्थेच्या प्रगतीतील योगदानाची नोंद घेऊन हा सन्मान बहाल करण्यात आला. या प्रसंगी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार व तहसीलदार माया माने यांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.


### बोरामणी येथे लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळा २० एप्रिलला

**इटकळ, दि.१७ एप्रिल -**

बोरामणी येथे सोमवार दि.२० एप्रिल रोजी श्री लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे.



लाल हनुमान मंदिरात सुरू असलेल्या श्री संत एकनाथ महाराज लिखित 'भावार्थ रामायण' ग्रंथातील युद्धकांडाच्या पारायणातून हा सोहळा सायं. ६ वाजता सुरू होऊन मंगळवार दि.२१ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजता समाप्त होणार आहे. या दरम्यान ७ अध्याय व ११३५ ओव्यांचे वाचन-निरूपण रात्रभर होणार आहे. समारोपानंतर महाआरती व महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार असून परिसरातील रामभक्तांनी उपस्थित राहून रामकथेचा लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रामस्थांनी केले आहे.



### नरेंद्र रडे यांचा सत्कार

**भूम, दि.१७ एप्रिल -**

कार्यकारी अभियंता नरेंद्र रडे यांच्या शुक्रवारी दि.१७ रोजी महावितरण कार्यालय भूम येथे पंचायत समिती सदस्य बाळासाहेब खरवडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी शरद चोरमले, उप विभागीय कार्यकारी अभियंता लक्ष्मण शिंदे, मुकुंद ढगे आदी उपस्थित होते. यावेळी महावितरण कार्यालय ईट येथील ३३ केव्ही केंद्र अंतर्गत डोकेवाडी, गिरवली, सोंन्नेवाडी, अंजनसोडा, पांढरेवाडी, झेंडेवाडीसह गावातील दुरुस्तीची कामे तात्काळ मार्गी लावावे याबाबत चर्चा करण्यात आली.

# आता फार्मर आयडीशिवाय खत नाही; एॅग्रीस्टॅक योजनेमुळे पारदर्शकता वाढणार

### भूम तालुक्यात ४४ हजारांहून अधिक शेतकऱ्यांची नोंदणी पूर्ण...




> फार्मर आयडीमुळे खत वितरणात पारदर्शकता वाढणार असून शेतकऱ्यांना थेट लाभ मिळेल. गैरप्रकारांना पूर्णपणे आळा बसेल.
> - **अतुल ढवळे**, तालुका कृषी अधिकारी

**महावीर जालन**
**भूम, दि.१७ एप्रिल -**

तालुक्यातील शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या अनुदानित रासायनिक खतांच्या वितरणात पारदर्शकता आणण्यासाठी तसेच लिंकिंग, गैरप्रकार आणि काळाबाजार रोखण्यासाठी एॅग्रीस्टॅक योजनेअंतर्गत फार्मर आयडी अनिवार्य करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभ थेट व योग्य पद्धतीने मिळणार आहे.

शासनाच्या या नव्या प्रणालीमुळे प्रत्येक शेतकऱ्याची डिजिटल ओळख निश्चित होणार असून खत वितरणाचा संपूर्ण मागोवा घेणे शक्य होणार आहे. यामुळे दुबार नोंदी, चुकीचा वापर आणि मध्यस्थांमार्फत होणाऱ्या फसवणुकीवर नियंत्रण येणार आहे. शेतकऱ्यांच्या नोंदणीकृत क्षेत्र व पिकांच्या गरजेनुसारच खत वितरण करण्यात येणार असल्याने प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंतच अनुदान पोहोचेल.

अनुदानित खत खरेदीसाठी फार्मर आयडी अनिवार्य करण्यात येणार असून खरेदीवेळी आयडी स्कॅन करून पडताळणी केली जाणार आहे. हा नियम टप्प्याटप्प्याने लागू करण्यात येणार असून लवकरच सर्व खत वितरण केंद्रांवर सक्ती होण्याची शक्यता आहे.

डिजिटल प्रणालीमुळे प्रत्येक व्यवहाराची नोंद होणार असल्याने बनावट नोंदी, लिंकिंग व काळा बाजारावर आळा बसणार आहे. यामुळे खत वितरण अधिक नियोजनबद्ध व पारदर्शक होणार आहे.

भूम तालुक्यात आतापर्यंत ४४ हजार २७१ शेतकऱ्यांचे फार्मर आयडी तयार झाले असून उर्वरित शेतकऱ्यांची नोंदणी सुरू असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

**कुठे आणि कसा काढायचा फार्मर आयडी?**

फार्मर आयडीसाठी तलाठी कार्यालय, सीएससी केंद्र किंवा कृषी विभाग कार्यालयात आधार कार्ड, सातबारा उतारा व मोबाईल क्रमांकासह नोंदणी करता येते. या प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांना अनुदान थेट त्यांच्या खात्यात मिळणार असून मध्यस्थांची भूमिका कमी होणार आहे.

## ईट परिसरात महावितरण कर्मचाऱ्यांची अखंड सेवा; नागरिकांकडून कौतुक

### उन्हाच्या तडाख्यातही १७ गावांचा वीजपुरवठा सुरळीत



**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१७ एप्रिल -**

ग्रामीण भागात काही वेळ वीजपुरवठा खंडित झाला तरी नागरिकांची गैरसोय होते. विशेषतः सध्या उन्हाच्या तीव्रतेमुळे पंखा, कुलर, टीव्ही यांसारख्या उपकरणांवरच लोकांचा दिवस अवलंबून असल्याने वीज ही अत्यावश्यक बाब बनली आहे.

अशा परिस्थितीत ईट येथील महावितरण कर्मचाऱ्यांनी अखंड सेवा देत वीजपुरवठा सुरळीत ठेवला असून त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

ईट येथील महावितरणचे प्रभारी कनिष्ठ अभियंता मुकुंद ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली वायरमन बंडप्पा सास्तुरे, जगदीश शिंदे, देवीचंद फरतडे यांच्यासह इतर कर्मचारी दिवस-रात्र कार्यरत आहेत. उन्ह, वारा, पाऊस किंवा वादळ अशा कोणत्याही परिस्थितीत तांत्रिक बिघाड तात्काळ दुरुस्त करून वीजपुरवठा सुरळीत करण्याचे काम ते करत आहेत.

ईट परिसरातील गाव, वाड्या-वस्त्यांमध्ये कुठेही बिघाड झाल्यास महावितरणचे कर्मचारी तत्काळ पोहोचून काही वेळातच वीजपुरवठा पूर्ववत करतात. अपुऱ्या मनुष्यबळावरही हे कर्मचारी १७ गावांचा कारभार सांभाळत आहेत. परिसरात थ्री-फेजचे सुमारे २६० तर सिंगल-फेजचे ६८ ट्रान्सफॉर्मर कार्यरत असून १० लाईनमन त्यांच्या देखभालीची जबाबदारी सांभाळत आहेत.

कोविड काळातही या कर्मचाऱ्यांनी आपली सेवा अखंड सुरू ठेवली होती. रात्री-अपरात्रीही गावकऱ्यांना अंधारात राहू न देता वीजपुरवठा सुरू ठेवण्यासाठी ते तत्पर असतात. त्यामुळे नागरिकांकडून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

ईट येथील बार डीपी, भोकर डीपी व दवाखाना डीपीवरील २५ क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर काढून त्या ठिकाणी १०० क्षमतेचे नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आले आहेत. जिल्हा परिषद सदस्या शुभांगी देशमुख व राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील देशमुख यांनी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. या बदलामुळे गावठाण फीडर मजबूत झाला असून वीजपुरवठा अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

महावितरण कार्यालय ईट येथील प्रभारी कनिष्ठ अभियंता मुकुंद ढगे यांच्या नेतृत्वाखाली बंडप्पा सास्तुरे, जगदीश शिंदे, देवीचंद फरतडे, दीपक सोंन्रे, बप्पा बहिर, सिद्धेश्वर खांडेकर, जाधव, कोकाटे, रोमन, भालशांक, सर्फराज काझी आदी १० लाईनमन मिळून १७ गावांचा वीजपुरवठा सुरळीत ठेवण्याचे काम करत आहेत.

## नळदुर्गला काँग्रेसचे जिल्हाध्यक्षपद मिळणार?

### अशोक जगदाळे रेसमध्ये...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१७ एप्रिल -**



काँग्रेस पक्षाच्या धाराशिव जिल्हाध्यक्ष निवडीची प्रक्रिया सुरू असून नळदुर्गचे नेते अशोक जगदाळे हे या पदासाठी इच्छुकांमध्ये अग्रस्थानी असल्याने शहरात उत्सुकता वाढली आहे.

आजवर नळदुर्गला कोणत्याही प्रमुख राष्ट्रीय पक्षाचे जिल्हाध्यक्षपद मिळाले नसल्याने यंदा ही संधी मिळणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जिल्हाध्यक्षपदासाठी सुमारे १२ इच्छुक असून पक्षाची केंद्रीय टीम जिल्ह्यात तळ ठोकून आहे. एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या धाराशिव जिल्ह्यात सध्या पक्षाची स्थिती कमकुवत झाली आहे. अशा परिस्थितीत सर्व कार्यकर्त्यांना एकत्र घेऊन पक्षाला बळ देणारे नेतृत्व आवश्यक असल्याची चर्चा आहे.

अशोक जगदाळे यांनी विधानसभा व विधानपरिषद निवडणुका लढविल्या असून त्यांचा जनसंपर्क दांडगा मानला जातो. नळदुर्ग नगरपालिकेत त्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे २० पैकी ९ नगरसेवक निवडून आले आहेत.

त्यामुळे पक्षश्रेष्ठींनी जगदाळे यांची जिल्हाध्यक्षपदी निवड करावी, अशी मागणी कार्यकर्त्यांतून होत आहे.

## वीज समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी अ‍ॅड. अजित गुंड यांचे उपमुख्यमंत्र्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ एप्रिल -**

पाडोळी (आ.) येथील अनियमित वीजपुरवठा व ट्रान्सफॉर्मर बिघाडाच्या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी रूपामाता फाऊंडेशनच्या वतीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन देण्यात आले.

पुण्यपुरस्कार कार्यक्रमानिमित्त धाराशिव येथे आलेल्या उपमुख्यमंत्र्यांची भेट घेऊन अ‍ॅड. अजित गुंड-पाटील यांनी ग्रामस्थांच्या अडचणी मांडल्या. गावात वारंवार वीज खंडित होत असून विशेषतः रात्रीच्या वेळी दीर्घकाळ वीज नसल्याने नागरिकांचे हाल होत आहेत.

वीजपुरवठा खंडित राहिल्यामुळे पाणीटंचाई निर्माण झाली असून, कमी दाबामुळे घरगुती व शेती उपकरणांवर परिणाम होत असल्याची तक्रार करण्यात आली. ट्रान्सफॉर्मरमधील बिघाड तात्काळ दूर करून नियमित वीजपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

या समस्यांकडे दुर्लक्ष झाल्यास महावितरणविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

### अक्षरा हंगरगेकर हिचे सीबीएसई बोर्ड परीक्षेत सुयश

**तुळजापूर, दि.१७ एप्रिल -**

येथील माजी नगरसेवक अमर हंगरगेकर यांची कन्या अक्षरा अमर (दाजी) हंगरगेकर हिने दहावी सीबीएसई बोर्ड परीक्षामध्ये ९३.६% गुण मिळवले.



अक्षरा हिने धाराशिव येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये शिक्षण घेतले आहे. तिच्या या यशाबद्दल तिचे तुळजाईनगरीतून अभिनंदाचा वर्षाव होत आहे.

## एनएच-६५ वरील येणेगुर पुलाची आ. स्वामींकडून पाहणी

### भगदाड दुरुस्तीसह अपूर्ण कामे तात्काळ पूर्ण करण्याच्या सूचना...



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१७ एप्रिल -**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वरील येणेगुर (ता. उमरगा) येथे पुलावर भगदाड पडल्याची तक्रार नागरिकांनी केल्यानंतर आमदार प्रवीण स्वामी यांनी घटनास्थळी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी त्यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या प्रकल्प संचालक कासार यांना तात्काळ दुरुस्तीचे आदेश दिले. पुलावरील भगदाड लवकरात लवकर भरून सुरक्षित वाहतूक सुरू करण्यावर भर देण्यात आला. तसेच महामार्गावरील अपूर्ण राहिलेली कामे-विशेषतः सर्व्हिस रोड तसेच राज्यमार्गांना जोडणारे रस्ते-ही कामे प्राधान्याने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. नागरिकांच्या सुरक्षेसाठी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

स्थानिक नागरिकांनीही या पाहणीदरम्यान समस्या मांडत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

# तेर येथील संत गोरोबा काका मंदिरासाठी ३ कोटींचा निधी मंजूर

### ओव्हरी बांधकामासह विकासकामांना गती; भाविकांसाठी सुविधा वाढणार : आ. राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.१७ एप्रिल -**

तेर येथील संतश्रेष्ठ संत गोरोबा काका यांच्या समाधी मंदिरातील ओव्हरीच्या कामांसाठी तब्बल ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली. या निधीमुळे मंदिराच्या सौंदर्यात भर पडणार असून दरवर्षी येणाऱ्या लाखो वारकरी व भाविकांसाठी आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होणार आहेत.

महायुती सरकारतर्फे मंजूर करण्यात आलेल्या या निधीतून मंदिराच्या मूळ रचनेला साजेशी विकासकामे हाती घेतली जाणार आहेत. मंदिराच्या पूर्व बाजूस सुमारे २ कोटी रुपये खर्चून ओव्हरीचे बांधकाम करण्यात येणार असून वारी व उत्सवाच्या काळात भाविकांसाठी ही जागा विश्रांती व भजनासाठी उपयुक्त ठरणार आहे.

यासोबतच ऐतिहासिक वारशाचे जतन करण्याच्या दृष्टीने नगारखाना उभारणी व स्टोन क्लेडिंगची कामेही केली जाणार आहेत. या कामांसाठी स्वतंत्रपणे १ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून त्यामुळे मंदिराला प्राचीन व भव्य स्वरूप प्राप्त होणार आहे.



राज्याच्या ग्राम विकास विभागाने दि.१५ एप्रिल रोजी यासंदर्भातील शासन निर्णय जाहीर केला असून ऑक्टोबर २०२५ मध्ये झालेल्या राज्य निकष समितीच्या बैठकीत या प्रस्तावास तांत्रिक मान्यता मिळाली होती. या तीर्थक्षेत्राचा 'ब' वर्ग यात्रास्थळ योजनेत समावेश करून निधी मिळवण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता.

या विकासकामांमुळे तेर हे गाव केवळ धार्मिक स्थळ न राहता सुसज्ज पर्यटन केंद्र म्हणून विकसित होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. या निधीसाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे आभार मानण्यात आले आहेत.

दरम्यान, तेर येथील कोट टेकडी परिसरात उत्खननावर आधारित जिवंत प्रात्यक्षिक प्रयोगशाळा उभारण्यासाठी १३.३८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच प्राचीन तीर्थकुंड विकासासाठी ५.११ कोटी आणि बौद्ध स्तूप विकासासाठी २.२१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

तसेच कै. रामलिंगप्पा लामतुरे शासकीय वस्तुसंग्रहालयात सुमारे २४ हजार ७६६ पुरातन अवशेषांचा मौल्यवान संग्रह असून या संग्रहालयाच्या नव्या इमारतीचे बांधकाम अंतिम टप्प्यात आले आहे.

लवकरच येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे संग्रहालय उभे राहणार असून तेरच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वैभवात आणखी भर पडणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

# परिस्थितीवर मात करत प्रिया शिवपुजेनी गाठल यशाचं शिखर




**तभा वृत्तसेवा**

**जळकोट दि. १८ एप्रिल :** कोरोना संकटातही अभ्यासाची अखंड धडपड; ग्रामीण भागातून एमबीबीएस पदवीत उल्लेखनीय यश

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारी यशोगाथा म्हणजे जळकोटची नात प्रिया श्र्वेता शिवसांब शिवपूजे हिची. पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेज, आमरावती येथे नुकत्याच पार पडलेल्या एमबीबीएस बॅच २०२० च्या पदवीदान समारंभात प्रियाने मानाची वैद्यकीय पदवी गोल्ड मेडलसह संपादन करत आपल्या जिद्दीचा ठसा उमटविला.

लहानपणापासूनच शिक्षणाची प्रबळ आवड असलेल्या प्रियाने चौथीमध्ये शिष्यवृत्ती मिळवून आपल्या शैक्षणिक प्रवासाची भक्कम पायाभरणी केली तिचे प्राथमिक शिक्षण सनराईज इंग्लिश स्कूल,नरसी येथे झाले, तर माध्यमिक शिक्षण किड्स किंगडम विद्यालय, नांदेड येथे पूर्ण केले. कोरोना यां सारख्या संसर्गजन्य महामारीच्या कठीण काळात अनेक ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शिक्षण विस्कळीत झाले असताना, प्रियाने मात्र परिस्थितीवर मात करत अभ्यासात सातत्य ठेवले. या जिद्दीच्या जोरा वर तिने ६०० गुणांसह उत्तीर्ण होत वैद्यकीय क्षेत्रातील(एमबीबीएस)ला प्रवेश मिळवला, अखेर एमबीबीएस पदवी गोल्ड मेडलसह मिळवून कुटुंब व परिसराचे नाव उज्ज्वल केले.प्रियाचे हे यश केवळ वैयक्तिक नाही, तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण आहे. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी जिद्द ,चिकाटी, मेहनत आणि ध्येयाप्रती निष्ठा असेल, तर यश निश्र्िचत मिळते.याचे जिवंत उदाहरण म्हणजे प्रिया शिवपूजे तिच्या या यशामुळे उद्याच्या तरुणाईला एक नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# वृध्द दाम्पत्याचे बॅगमधील ३० तोळ्यांचे दागिने चोरले

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर दि. १८ एप्रिल :** एसटी बसने लातूर येथून उदगीरकडे जाणाऱ्या वृद्ध दाम्पत्याचे बॅगमध्ये ठेवलेले ३० तोळ्यांचे दागिने बावलगाव पाटी (ता. चाकूर) येथे अज्ञात चोरट्याने चोरल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात उदगीर ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणासंदर्भात पोलिसांनी सांगितले, ६८ वर्षीय फिर्यादी विलास वीराप्पा उमाटे (रा. वलांडी, ता. देवणी) हे मंगळवारी दुपारी त्यांच्या पत्नीसह बसने लातूर येथून उदगीरकडे प्रवास करीत होते.

प्रवासादरम्यान दुपारी एक ते अडीच वाजण्याच्या सुमारास बावलगाव पाटी येथे बस आली असताना त्यांच्या बॅगेमध्ये ठेवलेले सोन्याचे पोहे हार, मिनी गंठण, लॉकेट, नेकलेस, अंगठी, झुमके, कानातील पत्त्या, मणी- मंगळसूत्र असे विविध प्रकारचे एकूण २६ तोळे ७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व ४ तोळ्यांचे चांदीचे वाळे असे जवळपास ३० तोळ्यांचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे.

## मिरवणुकीत नाचण्याच्या कारणावरून मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर दि. १८ एप्रिल :** मंगळवारी (दि. १४) रात्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त निघालेल्या मिरवणुकीत नाचण्याच्या कारणावरून आरोपींनी संगणमत करून फिर्यादीस चाकूने मारून जखमी केले. या प्रकरणी उदगीर शहर पोलिसात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# जिल्हा रूग्णालयाचा १७ वर्षांनंतर होतोय भूमीपुजन सोहळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. १७ एप्रिल :** लातूर, दि. १६: राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत लातूर येथील १०० खाटांच्या नवीन जिल्हा रुग्णालय इमारतीचे बांधकाम करण्यात येणार असून, या नवीन वास्तूचा भूमिपूजन समारंभ शनिवार, १८ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता आयोजित करण्यात आला आहे. नांदेड रोडवरील कृषि महाविद्यालय परिसरात हा कार्यक्रम होणार असल्याची माहिती आरोग्य विभागातर्फे देण्यात आली आहे.

नवीन वास्तूचे भूमिपूजन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील राहणार आहेत. या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर उपस्थित राहणार आहेत, सार्वजनिक आरोग्य, पाणीपुरवठा व महिला बालविकास राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

याप्रसंगी विधानपरिषदेतील मुख्य प्रतोद आमदार विक्रम काळे, जि.प. अध्यक्षा उषाताई पाटील, खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार सतीश चव्हाण, आमदार अमित विलासराव देशमुख, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड, महापौर जयश्री सोनकांबळे, लातूर पंचायत समिती सभापती श्रीकांत बैले आणि महाराणा प्रतापनगरच्या सरपंच संगिता पतंगे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना आणि मनपा आयुक्त मानसी मीना यांसह विविध विभागांचे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्याच्या आरोग्य व्यवस्थेला बळकटी देणाऱ्या या महत्त्वपूर्ण सोहळ्याला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप ढेले आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे,यांनी केले आहे.

# फुले,डॉ.- आंबेडकर यांच्या विचारांचा अंगीकार केल्यास प्रगत व सशक्त भारताची निर्मिती डॉ. जाधव

तभा वृत्तसेवा

चाकूर दि. १७ एप्रिल : पदव्युत्तर कृषि व्यवसाय व्यवस्थापन संस्था,चाकूर येथे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती अत्यंत उत्साहपूर्ण, प्रेरणादायी व सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देणाऱ्या वातावरणात साजरी करण्यात आली.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत पदव्युत्तर कृषि व्यवसाय व्यवस्थापन संस्था, चाकूर येथे जयंतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक समता, शिक्षणाचे महत्त्व, संविधानिक मूल्ये आणि राष्ट्रीय एकात्मता याबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अधिष्ठाता डॉ. संतोष कांबळे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी महाविद्यालय, रेणापूर येथील मराठी भाषा विभाग प्रमुख प्रा. डॉ. जयद्रथ जाधव हे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

डॉ. ज्योती झिरमिरे यांनी प्रभावी प्रास्ताविक सादर करत कार्यक्रमाचा हेतू स्पष्ट केला. त्यांनी महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा आजच्या तरुण पिढीवर होणारा सकारात्मक प्रभाव अधोरेखित केला आणि अशा कार्यक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण होत असल्याचे नमूद केले.प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. जयद्रथ जाधव यांनी आपल्या भाषणात महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा सखोल परामर्श घेतला. त्यांनी सांगितले की, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचे, वंचितांचे आणि समाजातील सर्व घटकांचे कैवारी होते. त्यांनी केवळ विचार मांडले नाहीत, तर प्रत्यक्ष कृतीतून सामाजिक परिवर्तन घडवून आणले, असे प्रतिपादन प्रमुख पाहुणे डॉ. जयद्रथ जाधव यांनी केले.

कार्यक्रमात बोलताना डॉ. जाधव यांनी आपल्या अभ्यासपूर्ण, प्रभावी आणि विचारप्रवर्तक भाषणातून महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा सखोल व सर्वंकष परामर्श घेतला. त्यांनी स्पष्ट केले की, या दोन्ही महामानवांनी शिक्षण, समता, स्वाभिमान, बंधुता आणि मानवतावाद या मूल्यांची भक्कम पायाभरणी करून भारतीय समाजाला नवी दिशा दिली.

# सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी जनक पवार



**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर दि. १८ एप्रिल :** महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी संघटनेच्या रेणापूर तालुकाध्यक्षपदी जनक पवारी यांची जिल्हाध्यक्ष पांडुरंग पवार यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत नुकतीच निवड करण्यात आली.


याशिवाय कार्याध्यक्षपदी हिरामण साळी, कोषाध्यक्षपदी चंद्रकांत दरोडे, उपाध्यक्षपदी उत्तम राठोड व प्रमोद कुलकर्णी, सहकोषाध्यक्षपदी भानुदास दुड्डे व शेषेराव बिराजदार, सहसचिवपदी रमेश शेळके व श्यामराव घोडके यांची निवड करण्यात आली. संघटक म्हणून भाऊसाहेब रायनुळे व लिंबराज इंगळे, महिला प्रतिनिधी म्हणून दैवशाला सब्बनवाड व राउबाई थगनर यांची निवड झाली. तसेच सल्लागारपदी किशनराव जाधव व नानासाहेब जाधव, तर मार्गदर्शक म्हणून मुकुंद माने व मारुती सूर्यवंशी यांची निवड करण्यात आली. या निवडीबद्दल जिल्हाध्यक्ष पांडुरंग पवार, जिल्हा कार्याध्यक्ष लक्ष्मण दावणकर, जिल्हा सरचिटणीस युवराज घंटे, जिल्हा कोषाध्यक्ष बालाजी येळीकर, लातूर तालुकाध्यक्ष अल्लाबक्ष शेख, सचिव रवी शिंदे, प्रल्हाद चित्ते, बिभीषण झेंडे आदींनी नव्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

# उदगीरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर दि. १८ एप्रिल :** : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार तथा बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त उदगीर शहर व परीसरात विविध उपक्रम राबवून मंगळवार दि. १४ एप्रिल रोजी त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. सकाळी शहरात विश्र्वशांती बुद्धविहार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, नालंदा बुद्ध विहार, अशोकनगर, गांधीनगर, निडेबन वेस सह तालुक्यातील ग्रामपंचायती, शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, विविध सामाजिक संघटना, शाळा, महाविद्यालये, समाज मंदिरे आदी ठिकाणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. तळवेस,

या जयंतीनिमित्ताने ध्वजारोहण, पंचशील, त्रिशरण व बुद्धवंदना घेण्यात आली. अनेक ठिकाणी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. उदगीर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून नागरिकांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी भन्ते ना गसेन बोधी, माजी आ. गोविंद केंद्रे, उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन भातलंवडे, तहसीलदार राम बोरगावकर, नगराध्यक्षा स्वाती हुडे, उपनगराध्यक्षा शीतल शिंदे, मुख्याधिकारी सोमनाथ जाधव तसेच पालिकेचे विविध विषयांचे सभापती, सर्व नगरसेवक, नगरसेविका, जि.प. सदस्य मुकेश भालेराव, डॉ. दीपक सोमवंशी, पंचायत समिती सदस्य आणि शहर पोलीस निरीक्षक दिलीप गाडे, देविदास कांबळे सह विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, कार्यकर्ते, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समितीचे पदाधिकारी, महिला, युवक-युवती, आंबेडकरप्रेमी उपस्थित राहून स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, भारतीय घटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन केले. सायंकाळच्या सुमारास शहरातील विविध जयंती मंडळांच्या मिरवणुका निघाल्या. यावेळी भीमा तुझ्या जन्मामुळे उध्दारीली कोटी कोटी कुळे... म्हणत हजारों जनसागराच्या उपस्थितीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ च्या जयंतीनिमित्त त्यांच्या तैलचित्रांची




मिरवणूक काढून आंबेडकरप्रेमी नागरिकांनी अभिवादन नागरिक असे केले. उदगीर शहरातील विविध भागांतून मिरवणुका अत्यंत लक्षवेधी होत्या. भीम गीतांसह जय भीमच्या घोषणांनी शहर दुमदुमले होते. शहरातील जयंती मंडळांनी डॉ. बाबासाहेबांना अनोख्या पद्धतीने सामाजिक उपक्रमांचे आयोजन करीत अभिवादन केले. यावेळी मोठ्या प्रमाणात समाजबांधव उपस्थित होते. यावेळी तरुणांसह महिला व तरुणीनींही बाबासाहेबांच्या जयंती उत्सवात हिरीरीने सहभाग नोंदवत जयंती उत्सवाचा आनंद द्विगुणीत केला.

मिरवणुकीत अनेक मंडळांनी सामाजिक व शैक्षणिक प्रबोधनात्मक तसेच अंधश्रद्धा निर्मुलन देखाव्यांचे सादरीकरण केले. मिरवणूक मार्गात येथील विविध सामाजिक संस्थांकडून पाणी, सरबत, खिचडी वाटप करण्यात आले. मिरवणूक मार्गावर विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटनांनी स्वागतकक्ष उभारून जयंती मिरवणुकीचे स्वागत केले तर मुक्तावार चौकात सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्यावतीने मिरवणुकीतील जयंती मंडळाचे स्वागत करण्यात आले. या व्यासपीठावर प्रशासकीय अधिकारी तथा विविध पक्षांचे पदाधिकारी, सार्वजनिक जयंती महोत्सवाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

**सोलापूर तरूण भारत नियमित वाचा**

# विविध पदावर निवड निवड झालेल्या झालेल्या ३६ विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार



**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर दि. १८ एप्रिल :** अहमदपूर महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर येथे करिअर कट्टा हा एक नाविन्यपूर्ण उपक्रम गेल्या वर्षीपासून सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील तसेच पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना पोलीस, मिलिटरी व अन्य पदांच्या भरतीबाबत लागणारे प्रशिक्षण वर्ग सुरू केले आहेत. यात पहिल्याच वर्षात घवघवित यश संपादन करून तब्बल ३६ विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या पदावर निवड झाली आहे. महाराष्ट्र पोलीस, बॉर्डर सिक्युरिटी फोर्स, अग्निवीर, नॅशनल डिफेक्टिव्ह फोर्स, यासारख्या भरतीमध्ये महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी यशस्वी झालेले आहेत. त्यांचा महाविद्यालयाला सार्थ अभिमान आहे. यामध्ये श्र्वेता करे, अंकिता जाधव (पुणे शहर पोलीस), ओमकार चारोळे व श्रद्धा चारोळे, समीर शेख (पिंपरी चिंचवड पोलीस), पल्लवी जाधव (नांदेड जिल्हा पोलीस), आरिफ शेख, सौरभ नरहरी (नांदेड पोलीस), अजय बडगिरे (छत्रपती संभाजीनगर पोलीस), राहुल बडगिरे व अमन हडगेकर (पुणे शहर पोलीस), मंगेश संपते (चंद्रपूर पोलीस), प्रतिज्ञा गायकवाड (लातूर जिल्हा पोलीस), प्रसाद गंगथडे (नवी मुंबई पोलीस) त्याचबरोबर प्रवीण पोले, नागेश केंद्रे, विठ्ठल राठोड, निवृत्ती गुट्टेवार हे विद्यार्थी टिटोरियल आर्मी कमांडो मध्ये भरती झाले आहेत. तसेच एन. डी. एफ. मध्ये जाधव शुभम शिवाजी, कांबळे सुधीर बाबुराव, केंद्रे अजय माधव, केंद्रे विजय माधव, कच्छवे रोहन गोविंद, शेख सोहेल बडेसाब ,मुकनर कमलेश सूर्यकांत, पवार सूर्यकांत सीताराम, नारायण बाबुराव चिलकरवार, ओम चव्हाण हे विद्यार्थी भरती झाले आहेत. तसेच अग्नीवीर मध्ये चिलकरवार नंदकुमार, शिवभक्त राजेंद्र, मुंडे संभाजी, संविधान ढवळे, घुगे चंद्रकांत, कच्छवे सिद्धेश्र्वर, मुंडे धनाजी हे विद्यार्थी भरती झालेले आहेत. यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विचार विकास मंडळ व महात्मा गांधी महाविद्यालय परिवारातर्फे सत्कार करून त्यांची अहमदपूर शहरातून भव्य रॅली काढण्यात आली. महात्मा गांधी महाविद्यालयातील करियर कट्टा अंतर्गत विनामूल्य प्रशिक्षण व मार्गदर्शन वर्ग सुरू करण्यात आलेले आहेत. यामध्ये ४०० मीटर धावणे, १०० मीटर धावणे, गोळा फेक साठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. ही व्यवस्था विद्यार्थ्यांकरिता वेगळी व विद्यार्थिनी करिता वेगळी करण्यात आलेली असून, वनरक्षक, तलाठी, ग्रामसेवक, आरोग्य सेवक, एस. आर. पी .एफ. अशा अनेक स्पर्धा परीक्षांची तयारी महाविद्यालयामध्ये करून घेतली जाते. यामध्ये अनेक विद्यार्थी सहभागी झालेले असून पूर्ण अहमदपूर तालुक्यातील अनेक विद्यार्थी याचा फायदा घेत आहेत. यावर्षी महाविद्यालयातील ३६ विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून यशस्वी झाल्यानंतर महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा महाविद्यालयात सत्कार करून भव्य मिरवणूक भव्य मिरवणूक काढण्यात आली. याप्रसंगी विचार विकास मंडळाचे अध्यक्ष ड. किशनराव बेंडकुळे, सचिव अँड पी. डी. कदम, उपाध्यक्ष विजयकुमार देशमुख, उपाध्यक्ष युवराज पाटील, सहसचिव अँड वसंतराव फड, सहसचिव सुरेशराव देशमुख, कोषाध्यक्ष रामचंद्रराव शेळके, विचार विकास मंडळाचे सर्व सन्माननीय पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार तसेच महाविद्यालयातील अनेक प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. महाविद्यालयातील प्रभारी क्रीडा संचालक तथा सिनेट सदस्य प्रा. डॉ. विनोद माने, तसेच एन.सी.सी. विभाग प्रमुख प्रा. जी. व्ही .ताटे यांनी विद्यार्थ्यांना भरतीच्या संबंधाने विशेष मार्गदर्शन केले. तसेच प्रा. पांडुरंग अर्जुन व प्रा. डी. डी . कदम, शिक्षकेतर कर्मचारी श्री अभिजीत कदम, विशाल सोनकांबळे, अजय जाधव, यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत.

# रस्ता मागणीसाठी तहसील कार्यालया समोर आमरण उपोषण

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट दि. १८ एप्रिल :** जागतिक स्तरावर जगातील चौथी आर्थिक महासत्ता म्हणूण नुकतेच स्थान प्राप्त करणारे आणि जागतीक पातळीवर तिसरी महासत्ता म्हणून स्वतःला सिद्ध करण्यासाठी सतत धडपडत असताना दुसरीकडे मात्र देशातीलच आपल्या नागरीकाना आपल्या गावी जाण्यासासाठी साधा रस्ता नाही ? पक्का रस्ताची तर गोष्टच वेगळी आहे .सस्ता जाण्या येण्यासाठी मिळावे म्हणून रावजी तांडा येथील नागरीक , रस्त्यासाठी उपाशीपोटी उन्हा तान्हात धडपडावे लागत आहे .आपला देश चंद्रांच्या दक्षिण ध्रुवावर पोहचल्यांच प्रत्येक भारतीयच्या मनामध्ये स्वाभिमान आणि गर्व आहे पण मात्र या उलटची एक बाजू पाहिली तर आजही खोड्यातील वाडी वस्ती , तांडयातील गावापर्यंत रस्ता पोहचलेल नाही हे आपल दुदैवच म्हणाव लागेल .

भारतीय स्वातंत्र्याचा नुकताच मोठ्या दिमाखात आझादी का अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. देशाला ७५ वर्ष पूर्ण होऊन गेली. मेरी माटी मेरा देश म्हणत देशातील प्रत्येक वेगवेगळ्या भागातील माती दिल्लीत पोहचली , हर घर तिरंगा फडकला मात्र जळकोट तालुक्यातील रावजी तांड्यात रस्ता काही पोहचलाच नाही .

अजूनही जळकोट तालुक्यातील मोजे आतनूर गावातील रावजी तांडा येथे येण्या व जाण्यासाठी मूलभूत रस्ताच उपलब्द नाही .एकीकडे देश महामार्गाने चकचकाक होत आहे , शहरे , महानगराचा झगमगाट तर वाडी वस्तीत , तांडयात राहणाऱ्या या सामान्य गरीब माणसाला रस्त्यासाठी आपले काम धंदा , शेती व्यवसाय , मंजूरी सोडून उपाशीपोटी तहसिल कार्यालया समोर बसावे लागत आहे . हे फार मोठी विसगती आणि दुदैव आहे. शासन आणि प्रशासन याचे अपयशच म्हणावे लागेल.

अशा दुर्लक्षित दुर्गम अविकसित भागाकडे लक्ष देणार कोण ? यांचा वाली कोण आहे हे देवच जाणे ? असा प्रश्न सबंध गावकऱ्यांच्या मनामध्ये निर्माण होत आहे. आम्ही तांड्यावर जन्म घेऊन काय पाप केल आहे. अशी खदखद प्रत्येकाच्या मनामध्ये व्यक्त होत आहे .

या मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी फक्त मतदाना पुरतेच गावात येतात आश्र्वासनाची खैरात करतात , वेळ प्रसंगी अमिषाची खैरात वाटप करतात आम्हा सारख्या गोरगरीब जनतेला भुलथाप मारून , आश्र्वासनाचे गाजर दाखवून मते मिळवून निवडून येतात .त्यानंतर मात्र आमच्या समस्या आमच्या अडचणी याकडे कुठल्याही पुढारी नेत्याची ढूकूनही नजर आमच्या कडे राहत नाही . बोलत नाही , भेटत नाही , गावकडे पाहत सुद्धा नाही मतदान झाल्यानंतर मात्र तुम्हाला काय समस्या आहे असे कोणीही साधे विचारपूसही केली जात नाही.

रावजी तांडा अतनूर या परिसरामध्ये आज पर्यंत तांडयाला जाण्यासाठी कुठलाच रस्ता उपलब्ध नाही. या गावातील गोरगरीब जनतेला मुख्य गावाशी जोडण्यासाठी कुठलाच रस्ता नसल्या कारणाने या गावातील मंजूरदार शेतकरी ,शेतमजूर , कामगार , गरोदर महिला आजारी तथा बिमार पडले असता किंवा एखादी स्त्री गरोदर प्रस्तुतीसाठी नेण्यासाठी शासकीय वाहन किंवा खाजगी वाहन रस्ताच उपलब्द नसल्यामुळे तांड्यापर्यंत पोहोचू शकत नाही अशा वेळेस अशा महिलांना धोकादायक परिस्थितीमध्ये खांद्यावर उचलून एकतर जळकोट शहरात



, किंवा अतनूर सारख्या प्राथमिक आरोग्य केंद्रापर्यंत पोहोचवणे होत नाही .

मागील वर्षी पण जळकोट तहसील कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारा समोर दिनांक २३ जून २०२५ पासून अमरण उपोषणाला गावकरी बसलेले होते. यावेळी रस्ता तयार करून देण्यात येईल असे आश्र्वासनाचे गाजर दाखवण्यात आले होते .

मागील आकरा महिण्या पासून रस्ता तांडा वाशियांना उपलब्द करून देण्यात आले नसल्या कारणाने आज दि १५ एप्रिल २०२६ रोजी पुन्हा एकदा गावकऱ्यानी उमरण उपोषणाचे हत्यास उपसले आहे. या उपोषणाकडे आतातरी प्रशासन आणि शासनाचे डोळे उघडील का आणि या गोर गरीब मंजुरदार यांच्या रस्त्यासाठीच्या मागणीकडे लक्ष देतील का ? आणि ऐन पावसाळ्याच्या तोडावर तांडा वाशीयांना रस्ता करून देतील का ? हेच पाहणं उचित ठरेल .या उपोषण कर्त्यामध्ये मधूकर रामराव चव्हाण , संग्राम श्रीरंग घुमाडे , प्रकाश किशन राठोड , बाबू रामराव राठोड , गोविंद प्रसराम राठोड , संजय लोभा राठोड सुभाष भिकाजी राठोड , , गणेश लालू जाधव , शंकर बाबू चव्हाण , मधुकर रामराव चव्हाण , बालाजी प्रकाश राठोड , गुंडेराव , माधव तुकाराम राठोड , पिंटू माधव जाधव , शंकर लालू जाधव , विजय , सौ प्रयागबाई गुंडेराव राठोड आदी महिला पुरुष निवेदनावर स्वाक्षरी असून , जोपर्यंत रस्ता प्रशासनाच्या वतीने करून दिला जाणार नाही तोपर्यत सर्व गावकरी आमरण उपोषणा पासून तसुभरही हटणार नसल्याचे सांगितले आहे .या अमरण उपोषणाला पूर्ण गावकरी महिला पुरुष यांनी पाठीबा दिला आहे .

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## समीर पाटील यांची बामुक्टा कार्यकारिणीवर निवड



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१७ एप्रिल -**

बालाघाट शिक्षण संस्था नळदुर्ग संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नळदुर्ग येथील डॉ. समीर भिमराव पाटील (बाभळगांवकर) यांची बामुक्टा (इचणउढ) तालुका कार्यकारिणीवर, तर यशवंतराव चव्हाण महाविद्यालय तुळजापूर येथील उपप्राचार्य डॉ. प्रविण शहाजी भाले यांची जिल्हा कार्यकारिणीवर निवड झाली आहे.

या निवडीमुळे तुळजापूर तालुका व धाराशिव जिल्ह्यातील महाविद्यालयीन शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांना मार्ग मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. धाराशिव येथे झालेल्या कार्यक्रमास डॉ. संजय कोरेकर, डॉ. अंकुश कदम, डॉ. शिवाजी घोडके, डॉ. हंसराज जाधव, डॉ. लक्ष्मण थिटे, डॉ. तुळशिदास दबडे आदी उपस्थित होते.



# ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणाला 'उमेद'चा बळकट हात

### धाराशिवमध्ये 'मिनी सरस' प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद...

### हजारो महिला 'लखपती दीदी'...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ एप्रिल -**

जिल्ह्यातील ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या 'उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान' अंतर्गत विविध उपक्रमांमुळे महिलांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडत आहे. बचतगटांच्या माध्यमातून महिलांना आर्थिक स्वावलंबनाची नवी दिशा मिळत असून त्या आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करत आहेत.

जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गत जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन मिनी सरस चे आयोजन लेडीज क्लब मैदान, धाराशिव येथे दि. २४ ते २८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत करण्यात आले होते. या प्रदर्शनात स्वयं सहायता समूहातील महिला भगिनींनी तयार केलेल्या दर्जेदार उत्पादनांसाठी सुमारे १०० स्टॉल्स उभारण्यात आले होते. तसेच, ग्रामीण चवीच्या विविध खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी विशेष फूड कोर्टही उभारण्यात आले होते, ज्याला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



जिल्ह्यात एकूण १५ हजार ३८० स्वयं सहायता समूहांची स्थापना झाली असून सुमारे दीड लाख कुटुंबे या अभियानाशी जोडली गेली आहेत. याशिवाय ८०३ ग्रामसंघ, ५५ प्रभागसंघ, ५२१ महिला उत्पादक गट आणि ११ शेतकरी उत्पादक कंपन्यांची स्थापना करण्यात आली आहे. या माध्यमातून महिलांना आर्थिक बळाबरोबरच आत्मविश्वासही मिळाला आहे.

'उमेद' अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे जिल्ह्यात तब्बल ९९ हजार २७६ महिला लखपती दीदी बनल्या आहेत. बचत, कर्ज सुविधा, लघुउद्योग आणि कौशल्य विकासाच्या संधींमुळे महिलांच्या जीवनमानात आमूलाग्र बदल झाला आहे. पूर्वी घरापुरत्या मर्यादित असलेल्या महिला आता व्यवसाय, विपणन आणि निर्णय प्रक्रियेत सक्रिय भूमिका बजावत आहेत.

दरम्यान, जिल्हा नियोजन समिती अंतर्गत पर्यटनाला चालना देण्यासाठी टुरिस्ट बस प्रकल्प राबविण्यात येत असून यासाठी ७६ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून दोन १७ सीटर एसी अर्बनिया बसेस खरेदी करण्यात आल्या आहेत.

हा प्रकल्प तुळजापूर केंद्रित असून भाविकांसाठी विशेष टुरिस्ट पॅकेज तयार करण्यात आले आहे.

तुळजापूर-नळदुर्ग-अक्कलकोट-पंढरपूर तसेच तुळजापूर-तेर-येरमाळा-सरमकुंडी-सोनारी-परंडा असे दोन पर्यटन मार्ग निश्चित करण्यात आले आहेत. या प्रकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे तो पूर्णपणे महिलांद्वारे चालविण्यात येणार असून महिला गाईडचीही व्यवस्था करण्यात आली आहे. निवास, भोजन व दर्शन व्यवस्थेसारख्या सेवाही महिला बचतगटांमार्फत पुरविल्या जाणार आहेत.



या सर्व उपक्रमांमुळे ग्रामीण महिलांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होत असून त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक स्थितीत लक्षणीय सुधारणा होत आहे. बचतगटांच्या माध्यमातून महिलांनी केवळ स्वतःचेच नव्हे, तर संपूर्ण कुटुंब व समाजाचे जीवनमान उंचावण्यास महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

त्यामुळे ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणात बचतगटांची भूमिका अत्यंत मोलाची ठरत आहे.

## तेर येथे संत गोरोबा काका यात्रा महोत्सव भक्तिभावात संपन्न

**तेर, दि.१७ एप्रिल -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथे संत परीक्षक गोरोबा काका यांच्या वार्षिक यात्रा महोत्सव व पुण्यतिथी सोहळ्याचा मुख्य काल्याचा कार्यक्रम नृसिंह मंदिरात भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

**पालखी छबिना, कीर्तन व गोपाळकाला सोहळ्याने वातावरण भारावले...**

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या तेर येथील संत गोरोबा काका यांच्या यात्रा सोहळ्याला दि. १२ एप्रिल रोजी उत्साहात प्रारंभ झाला होता. दि. १६ एप्रिल रोजी गोरोबा काकांच्या पालखीची छबिना मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीनंतर पालखी मुख्य काल्याच्या कार्यक्रमासाठी नृसिंह मंदिरात आणण्यात आली.

या वेळी ह.भ.प. भाऊसाहेब महाराज गोसावी (पंढरपूर), ह.भ.प. शंकर महाराज थोबडे (वाशी) व ह.भ.प. महेश महाराज भोरे (तेर) यांच्या मधुर वाणीतील कीर्तनाने भाविक मंत्रमुग्ध झाले. नृसिंह मंदिरात काल्याचे हजेरी कीर्तन संपन्न झाले.

त्यानंतर पारंपरिक गोपाळकाला करण्यात आला. संध्याकाळी मंदिर परिसरात जंगी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी संजीवन समाधी सोहळ्याची सांगता उत्साहात करण्यात आली.

मुख्य काल्याच्या कार्यक्रमानिमित्त नृसिंह मूर्तीला उटी लावून अलंकार परिधान करण्यात आले होते. मंदिर परिसरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती.

दरम्यान, पालखी मार्गावर तेर ग्रामस्थांच्या वतीने वारकरी व भाविकांसाठी थंड पेय, लिंबू सरबत व रसनाची व्यवस्था करण्यात आली होती. या सेवाभावी उपक्रमामुळे भाविकांनी समाधान व्यक्त केले.

# सोनारीतील श्री काळभैरवनाथ रथोत्सव संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१७ एप्रिल -**



अखंड महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश व कर्नाटकातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र सोनारी येथील श्री काळभैरवनाथ रथोत्सव दि. १५ रोजी मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडला.

**भाविकांच्या जयघोषात रथाची भव्य मिरवणूक; गुलाल-खोबऱ्याची उधळण**

कंडारीच्या कावड व मानाच्या पालखीचे सुमारे दुपारी १ वाजता मंदिर परिसरात आगमन झाले. यानंतर देवास पाण्याची धार घालण्यात आली. दुपारी २ वाजता श्री काळभैरवनाथाची महाआरती पार पडली. त्यानंतर मुख्य रथोत्सवाला सुरुवात झाली.

मंदिराचे मुख्य पुजारी धुपबत्ती घेऊन पुढे निघाले. त्यांच्या मागोमाग सांगोल्याची काठी, देवाचा हत्ती, घोडा, कंडारीची मानाची पालखी आणि श्रीनाथांचा रथ अशा पारंपरिक वाद्यांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. भाविकांनी गुलाल व खोबऱ्याची उधळण करत जयघोष केला, त्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरंगात न्हाऊन निघाला. ही मिरवणूक मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारातून बाजारपेठ, मुख्य मार्ग, लहुबाई चौक, कंडारी फाटा, रेस्ट हाऊस मार्गे फिरून पुन्हा मुख्यद्वारातून मंदिरासमोर येऊन विसावली. या दरम्यान दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

मानाच्या काठ्या व कावडी रथ मार्गावर रथाला भेट देण्यासाठी ठिकठिकाणी थांबल्या होत्या. गुलाल आणि खोबऱ्याच्या उधळणीमुळे भाविक अक्षरशः भक्तिभावात रंगून गेले होते.

# गॅस एजन्सीचा मनमानी कारभार उघड; ग्राहक संतप्त

### ऑनलाईन 'डिलिव्हरी' दाखवूनही प्रत्यक्षात सिलेंडर नाही...

### काळाबाजाराचा संशय...

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१७ एप्रिल -**

तालुक्यातील ईट येथील 'सिद्धिविनायक भारत गॅस' एजन्सीच्या कथित अनागोंदी व मनमानी कारभारामुळे ग्राहकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. गॅसची ऑनलाईन बुकिंग केल्यानंतर मोबाईलवर सिलेंडर डिलिव्हर झाल्याचे संदेश येत असले, तरी प्रत्यक्षात ग्राहकांना गॅस मिळत नसल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

या प्रकारामुळे गॅस सिलेंडरच्या काळाबाजाराचा संशय व्यक्त केला जात असून, यासंदर्भात नागेवाडी (ता. भूम) येथील शेतकरी विश्वास मोहन गपाट यांनी तहसीलदारांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

नागेवाडी येथील ग्राहकांनी नियमानुसार गॅस बुकिंग केले. काहींना ३ एप्रिल रोजीच सिलेंडर मिळाल्याचे मेसेज प्राप्त झाले, तर काहींना कॅश मेमो व डिलिव्हरी कोड (उऋ) मिळाला. मात्र कंपनीच्या नोंदीत सिलेंडर पोहोचल्याचे दाखवले जात असतानाही प्रत्यक्षात ग्राहकांच्या घरी गॅस पोहोचवण्यात आलेला नाही. एजन्सीकडून गाडी येईल तेव्हा बघू अशी उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याची तक्रार आहे.





गावात दर दोन दिवसांनी गॅसची गाडी येत असली, तरी ती ठराविक ठिकाणीच थांबत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. सर्वसामान्य ग्राहकांना डावलून सिलेंडर परस्पर जास्त दराने विकले जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

हक्काचे सिलेंडर मागणाऱ्या ग्राहकांना एजन्सीचे कर्मचारी अरेरावीची भाषा वापरत असून कुठेही तक्रार करा, आम्हाला फरक पडत नाही, अशा धमक्या दिल्या जात असल्याचेही समोर आले आहे.

ऐन गरजेच्या काळात गॅस मिळत नसल्याने गृहिणींचे मोठे हाल होत आहेत. सुमारे ९३७ रुपयांच्या सिलेंडरसाठी ग्राहकांना वारंवार चकरा माराव्या लागत आहेत.

या गंभीर प्रकाराची चौकशी करून संबंधित एजन्सीचा परवाना रद्द करावा व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. आता तहसीलदार या प्रकरणात काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> सिद्धिविनायक गॅस एजन्सी माझी असली तरी सध्या ती करारावर माझे सहकारी विशाल चिलगर यांच्याकडे चालवण्यासाठी दिली आहे. तेथील कारभाराबाबत मला पूर्ण माहिती नाही. उद्या यासंदर्भात माहिती घेईन.
> **अमर दीक्षित** (चालक, गॅस एजन्सी, ईट)

> या प्रकरणाची मला कोणतीही माहिती नाही. तक्रारदार आणि डिलिव्हरी बॉय एकाच गावचे आहेत. त्यामुळे या प्रकरणात काही गैरसमज असू शकतो. तहसीलदारांकडे तक्रार करण्याची गरज नव्हती.
> **विशाल चिलगर** (चालक, गॅस एजन्सी, ईट)

# लोटस पोदार लर्न स्कूलचा सीबीएसई निकालात यश

### प्राची मुकडे जिल्ह्यात प्रथम...

### २८ विद्यार्थ्यांना ९०% पेक्षा अधिक गुण...

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१७ एप्रिल -**

शिवछत्रपती बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लोटस पोदार लर्न स्कूल, उमरगा येथील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी सीबीएसई बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा नावलौकिक उंचावला आहे.

या परीक्षेत सर्व विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत उच्च गुण मिळवले. त्यामध्ये प्राची मुकडे हिने तब्बल ९९.२० टक्के गुण मिळवत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावत शाळेतही अव्वल स्थान मिळवले. चिन्मयी महामुनी हिने ९८.४० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला, तर जानवी फुगटे हिने ९७.६०% गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला.



शाळेतील एकूण २८ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवत यशाची उंच भरारी घेतली आहे. तसेच ४५ विद्यार्थ्यांनी ८० टक्के पेक्षा जास्त आणि ६२ विद्यार्थ्यांनी ७० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवून उल्लेखनीय यश मिळवले.

विशेष म्हणजे, ६ विद्यार्थ्यांनी माहिती तंत्रज्ञान विषयात, ४ विद्यार्थ्यांनी मराठी विषयात, तसेच इंग्रजी, विज्ञान आणि सामाजिक शास्त्र या विषयांमध्ये प्रत्येकी एका विद्यार्थ्याने १०० पैकी १०० गुण मिळवत उज्वल यश संपादन केले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व्यंकट अरगडे, उपाध्यक्ष युवराज गायकवाड, सचिव विशाल कोकरे तसेच विश्वस्त चिदानंद माणिकशेट्टी, पद्माकर पाटील, धनराज हावळे, उज्वल कारभारी, योगेश सुर्यवंशी, संजीवनी अरगडे, सुषमा कोकरे, जयश्री पत्रिके, स्मिता पांढरे आणि विक्रम कोकरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शिक्षकांचे कौतुक केले.

# भीम जयंतीनिमित्त शिंदे यांचा जल्लोषमय कार्यक्रम

### भीमगीतांनी रंगला माहोल; श्रोते मंत्रमुग्ध

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ एप्रिल -**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त धाराशिव नगरीत आयोजित भीम जयंती उत्सवात भीमगीतांचा जल्लोष शिखरावर पोहोचला. सुप्रसिद्ध गायक आदर्श शिंदे यांच्या दमदार आणि भारावून टाकणाऱ्या सादरीकरणाने उपस्थित श्रोते मंत्रमुग्ध झाले.



कार्यक्रमात सादर झालेल्या प्रत्येक भीमगीतामधून प्रेरणा, स्वाभिमान आणि सामाजिक परिवर्तनाची ऊर्जा प्रकट होत होती. आदर्श शिंदे यांच्या आवाजातील ताकद आणि भावपूर्ण अभिव्यक्तीमुळे संपूर्ण परिसर उत्साहाने भारून गेला होता. हा भव्य भीम महोत्सव आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. साक्षी पाटील आणि मल्हार पाटील यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी जि.प. अध्यक्षा अर्चना पाटील, नगराध्यक्षा नेहा काकडे, अक्षय ढोबळे, अमित शिंदे, नितीन काळे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थितांना भीम जयंतीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

# धाराशिवमध्ये ओपन कराटे चॅम्पियनशिप उत्साहात संपन्न

### ४०० खेळाडूंचा सहभाग; नवनाथ पवार अव्वल...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ एप्रिल -**



विर मल्टीपर्पज फाउंडेशन, गेन्सिरीयू जिल्हा धाराशिव, विर कराटे कॅडमी व श्री व्यंकटेश महाजन सिनीअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ओपन कराटे चॅम्पियनशिप मोठ्या उत्साहात पार पडली.

या स्पर्धेचे आयोजन सेन्साई मनोज पतंगे व सेन्साई संतोष नांगरे यांनी केले होते. कार्यक्रमास डॉ. अभय शहापूरकर, प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी, रामकृष्ण खडके (मुख्याध्यापक, जिल्हा परिषद), थलेटिक्स प्रशिक्षक योगेश थोरबोले, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे, डॉ. चंद्रजीत जाधव (उपाध्यक्ष, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन व सरचिटणीस, महाराष्ट्र खो-खो) तसेच समीर बावीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्वसंरक्षणासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या कराटे कलेचा प्रसार व्हावा, विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाप्रेम निर्माण व्हावे आणि त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत लातूर, धाराशिव, पुणे, नांदेड, बीड, हिंगोली व वसमत येथील सुमारे ४०० खेळाडूंनी सहभाग घेतला. त्यामध्ये नवनाथ पवार (मुरुड, लातूर) यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

पांडुरंग ठोसर (परांडा, रोहकळ) यांनी द्वितीय क्रमांक मिळवला, तर नितीन पवार (बीड) यांनी तृतीय क्रमांकाची ट्रॉफी जिंकली.

स्पर्धेदरम्यान विविध प्रशिक्षक व मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये गणेश काकडे, मोहम्मद रफी, तुषार अवस्थी, अजित ढोले, राजू दवणे (पुणे), अनिल वाघेला (बारामती), उत्तरेश्वर सपाटे (बीड), राम नेमटे, आकाश भोरे (नांदेड), बालाजी उदाने (नांदेड), नफिक (नांदेड), जगदीश वाघमारे, सृष्टी पांचाळ, उदयन शिंदे आणि विनोद बालगुडे (परांडा) यांचा समावेश होता.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू दवणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सेन्साई मनोज पतंगे व विर मल्टीपर्पज फाउंडेशनचे व्हाइस प्रेसिडेंट सेन्साई संतोष नांगरे यांनी केले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सर्व सिनिअर खेळाडूंनी विशेष परिश्रम घेतले.

# धाराशिव आरटीओमध्ये 'एमएच २५ बीके' नवीन मालिका सुरू

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ एप्रिल -**

उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव येथे परिवहन संवर्गातील वाहनांसाठी 'एमएच-२५ बीके' ही नवीन नोंदणी मालिका लवकरच सुरू करण्यात येणार आहे.





नवीन मालिका सुरू होताना कार्यालयात होणारी गर्दी कमी करण्यासाठी तसेच नागरिकांना पसंतीचे किंवा आकर्षक क्रमांक सुलभपणे मिळावेत यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे.

ज्या वाहनधारकांना आकर्षक अथवा पसंतीचे नोंदणी क्रमांक घ्यायचे असतील त्यांनी विहित शुल्कासह अर्ज सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अर्ज कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत स्वीकारले जाणार आहेत.

अर्जासोबत पत्त्याच्या पुराव्याची साक्षांकित प्रत (आधार कार्ड, वीज बिल, टेलिफोन बिल इ.) जोडणे आवश्यक आहे.

तसेच आकर्षक क्रमांकासाठी लागणाऱ्या शुल्काचा डिमांड ड्राफ्ट (डी.डी.) अर्जासोबत जमा करावा.

हा डी.डी. केवळ बँकेचा असावा; इतर कोणत्याही प्रकारचे डी.डी. किंवा बँकर्स चेक स्वीकारले जाणार नाहीत, डीडी. किमान महिन्याच्या मुदतीचा असणे आवश्यक आहे.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# आतापर्यंत ३३७मुलींना एचपीव्ही लस

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. १७ एप्रिल :** एचपीव्ही (ह्युमन पॉपिलोमा व्हायरस) लसीमुळे मुलींच्या प्रजनन क्षमतेवर कोणताही विपरीत परिणाम होत नाही. उलट गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचा धोका ८५ टक्क्यांनी कमी होतो. त्यामुळे सोशल मीडियावरील गैरसमज आणि अफवांवर विश्वास न ठेवता पालकांनी आपल्या पात्र मुलींना ही लस आवर्जुन द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले.

महिलांच्या गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढत असल्याने केंद्र सरकारने १४ वर्षे पूर्ण आणि १५ वर्षाच्या आतील मुलींसाठी ही लस मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. लातूर जिल्ह्यात ९ मार्चपासून हे लसीकरण सुरु झाले असून आतापर्यंत ३३७ मुलींना ही लस देण्यात आली आहे.



## विविध वृत्त...

### पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करावा

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. १७ एप्रिल : वीरशैव लिंगायत समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी, कला, समाजप्रबोधन आणि साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना दरवर्षी महात्मा बसवेश्र्वर सामाजिक समता शिवा पुरस्कार दिला जातो. प्रतिवर्षी अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर एक व्यक्ती व एक संस्था अशा दोन घटकांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.**

**या पुरस्कारासाठी लातूर जिल्ह्यातील पात्र व्यक्ती, संस्थांनी आपले प्रस्ताव तीन प्रतीत येत्या २० एप्रिल २०२६ पर्यंत सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, लातूर यांच्या कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन सहायक संचालक अभय अटकळ यांनी केले आहे.**

# जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांची रविवारी निघणार भव्य शोभा यात्रा

## भरगच्च कार्यक्रम,जोरदार तयारी : मोठया संख्येने सहभागी होण्याचे सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे आवाहन

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. १७ एप्रिल :** जगतज्योती महात्मा बसवेश्वर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने शहरात भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून जयंतीची जोरदार तयारी सुरू आहे.आझाद चौक येथून रविवारी महात्मा बसवेश्र्वरांच्या प्रतिमेची भव्य-दिव्य शोभा यात्रा निघणार आहे. जयंती निमित्त शहरात भरगच्च कार्यक्रम पार पडणार असून त्यामध्ये शनिवार दि.१८ एप्रिल रोजी रात्री ०७:३० वाजता महात्मा बसवेश्र्वर चौक रिंगरोड येथील बसवेश्र्वरांच्या अश्र्वारूढ पुतळा समोर उभारण्यात आलेल्या इलईडी नामफलक बोर्डाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. याच ठिकाणी लागलीच भव्य अशी आगळी-वेगळी अतिषबाजी करण्यात येणार आहे.मध्यरात्री महात्मा बसवेश्र्वर कॉलेज समोरील महात्मा बसेश्र्वरांच्या पुतळ्यास गवळी समाजाच्या वतीने दुग्धभिषेक होईल.रविवार दि.१९ एप्रिल रोजी सकाळी ठीक ८ वाजता महात्मा बसवेश्र्वर चौक रिंगरोड येथे आपणां सर्वांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात येणार आहे.



श्री पाचशेघर मठ येथे दुपारी १२:०५ वाजता बसव जन्मोत्सव पाळणा होईल.रविवारी सायंकाळी ५ वाजता महात्मा बसवेश्र्वरांच्या प्रतिमेची आझाद चौक ते महात्मा बसवेश्र्वर कॉलेज भव्य शोभा यात्रा निघणार आहे.

जयंती सोहळ्यानिमित्त आयोजित सर्व कार्यक्रमात समाज बांधवांसह लातूरकरांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन महात्मा बसवेश्र्वर महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष ड.निलेश मुचाटे,स्वागताध्यक्ष प्रा.भालचंद्र येडवे पाटील यांच्यासह जेष्ठ मार्गदर्शक सिद्रामआप्पा पोपडे,माजी अध्यक्ष केदारआप्पा रासुरे,उपाध्यक्ष विश्वास आंबेकर,सचिव बालाजी झिपरे, सहसचिव रोहीत चवळे,कोषाध्यक्ष लखन कावळे, कार्याध्यक्ष मुकेश उटगे,बालाजी पाटील रायवाडीकर,गणेश हेरकर,संयोजक नितीन मोहनाळे,जगदीश येरटे,बसवेश्र्वर हेंगणे,प्रा. ओमप्रकाश झुरुळे,ड. निखिल काळगे, सोमेश्र्वर ईश्र्वरशेटे, शिवकुमार रोडे,प्रमोद धुपे,लक्ष्मीकांत रासुरे, मन्मथ सोरटे,सुशील वेळापुरे,निखिल शेटकार, शरणाप्पा अंबुलगे, कल्याण लातूरे,मोहन मेंगशेट्टे, सुनील ताडमाडगे,किरण खोबरे आदिसह समाज बांधवांनी केले आहे.

### केज तहसीलदार अपघात प्रकरणी १५ जणांची चौकशी

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. १७ एप्रिल :** रेणापूर पिंपळफाट्यापासून न जवळ असलेल्या नेहरुनगरजवळ लातूर-गी अंबाजोगाई राष्ट्रीय महामार्गावर १. (दि. ९) रोजी पहाटे केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांचे अपघाती निधन झाले होते. र त्यांच्या अपघातावरुन तर्क-वितर्क १. काढले जात असताना घटनेनंतर सातव्या दिवशी १५ जणांची चौकशी करण्यात आली आहे. पोलीस तपासात हा अपघातच असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविला जात आहे.

३१ वर्षीय केजचे तहसीलदार राकेश गिड्डे हे ८ एप्रिल रोजी सकाळी आपल्या सहकाऱ्यांसोबत लातूरला आले होते. त्यांनी स्वतःची कार ही अंबाजोगाई येथील कारखान्यावर पार्क केली होती. लातुरातील काम आटोपून ते अंबाजोगाईकडे गेल्याचेही सीसीटीव्हीमध्ये दिसून आले आहे. त्यानंतर सहकाऱ्यांना सोडून दिवंगत गिड्डे हे स्वतःची कार घेऊन रेणापूरकडे मार्गस्थ झाले होते. यानंतरच त्यांच्या गाडीचा भीषण अपघात झाला होता. कारमधील ते दोघे कोण? शिवाय रेणापूरकडे येताना ते एकटेच दिसत होते तर इतर सहकारी गेले कुठे ? असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. याप्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे देण्यात आला असून गुरुवारपर्यंत १५ जणांची चौकशी करण्यात आली आहे. त्यामुळे तपासात आणखीन काय समोर येणार हे पहावे लागणार आहे.

# औसा टी-पॉईंटवरील अपघातात एक ठार, एक गंभीर

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. १७ एप्रिल :** औसा टी-पॉईंट परिसरात गुरुवारी सकाळी ९.१० वाजता झालेल्या भीषण अपघातात खोपेगाव येथील विजयकुमार सिताराम बर्डे (वय ५५) यांचा मृत्यू झाला असून त्यांचा मुलगा अक्षयकुमार विजयकुमार बर्डे (वय ३५) हा गंभीर जखमी झाला आहे. या अपघातात दुचाकीवर बांधलेला एक बकराही ठार झाला असून घटनेमुळे परिसरात काहीकाळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

प्राथमिक माहितीनुसार, विजयकुमार व अक्षयकुमार बर्डे हे दोघे स्प्लेंडर मोटरसायकल (क्र. एमएच २४ ७२०२) वरून औसा बाजारातून दोन बकरे खरेदी करून खोपेगावकडे जात होते. ते औसा टी-पॉईंटजवळ पोहोचताच उमरग्याकडून लातूरच्या दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या कारने (क्र. एमएच २४ एबी ५४००) त्यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी भीषण होती की दोघेही रस्त्यावर फरपटत गेले.

**उड्डाणपुलाची गरज पुन्हा ऐरणीवर**

या भीषण अपघातानंतर औसा टी-पॉईंटवरील उड्डाणपुलाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या ठिकाणी चारही बाजूंनी होणारी वाहतूक, वेगाने धावणारी वाहने आणि सततची कोंडी यामुळे अपघातांचे प्रमाण वाढत आहे. अनेकांनी यापूर्वीही येथे जीव गमावला आहे. 'रस्ते प्राधिकरण अजून किती बळींची वाट पाहणार?' असा संतप्त सवाल नागरिक आणि प्रवासी उपस्थित करत असून, तातडीने उड्डाणपूल उभारण्याची मागणी पुन्हा जोर धरू लागली आहे.

अपघातात विजयकुमार बर्डे गंभीर जखमी झाले, तर अक्षयकुमार यांनाही गंभीर दुखापत झाली. स्थानिकांच्या मदतीने दोघांना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले; मात्र उपचारादरम्यान विजयकुमार बर्डे यांचा मृत्यू झाला. या अपघातात मोटरसायकलवर बांधलेल्या दोन बकऱ्यांपैकी एक बकरा जागीच ठार झाला.

घटनेची माहिती मिळताच औसा पोलिसांनी घटनास्थळ धाव घेत पंचनामा केला कारचालकाविरुद्ध निष्काळजीपण वाहन चालविल्याप्रकरणी गुन्ह दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास पोलिस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. अपघातामुळे काह काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त निबंध स्पर्धा

तभा वृत्तसेवा



**लातूर दि. १७ एप्रिल :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत १४ ते २० एप्रिल दरम्यान, राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांत संविधानिक मूल्ये, सामाजिक न्याय या विषयी जागरुकता निर्माण करणे हा आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी दिलेल्या लिंकवर निबंध अपलोड करावेत, असे आवाहन लातूर येथील जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी पी. जे. औताडे यांनी केले आहे. गट १ साठी आयटीआय, डिप्लोमा, बायफोकल, एसीव्हीसी विद्यार्थ्यांसाठी शब्दमर्यादा ५०० ते ८०० असणार आहे. गट -२ साठी पुरुष, महिलांसाठी खुला गट शब्द मर्यादा ८०० ते ते १२०० असेल. दोन्ही गटांतील प्रथम पारितोषिक ३१ हजार रुपये व सन्मानपत्र, द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक २१ हजार, तृतीय क्रमांकाचे पारितोषिक ११ हजार रूपयांचे असेल.

### संत तुकाराम नॅशनल मॉडेल स्कूलचे यश





तभा वृत्तसेवा

**लातूर दि. १७ एप्रिल :** केंद्रीय शिक्षण बोर्डाच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या इयत्ता १० परीक्षेत शिव छत्रपती शिक्षण संस्थेच्या संत तुकाराम नॅशनल मॉडेल स्कूलचा निकाल १०० टक्के लागला असून दरवर्षाप्रमाणे यावर्षीही निकालाची उत्कृष्ट परंपरा कायम ठेवली आहे. शाळेतील तब्बल ३२ विद्यार्थ्यांनी ९५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण प्राप्त केले असून ७० विद्यार्थ्यांनी ९० टक्केपेक्षा जास्त गुण मिळवले आहेत. एकूण १८२ विद्यार्थ्यांपैकी १४३ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह म्हणजेच ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. शाळेतून प्रथम क्रमांक चिन्मयी सूर्यवंशी ९८.८० टक्के गुण घेऊन मिळवला तर द्वितीय क्रमांक महावीर प्रशांत येरमाळकर (९८.२०%) व तृतीय क्रमांक समृद्धी हरीश थोरमोटे पाटील (९७.८०%) या विद्यार्थिनीने मिळवला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. अजय जाधव, सचिव बी. बी. ठोंबरे, सहसचिव शिवाजी सूर्यवंशी व उद्धवराव पाटील, सचिदानंद पाटील व बी. ए. मैंदर्गे, प्राचार्या वीणा कोपकर, उपप्राचार्य राजेंद्र ढिवरे पंकज बागडे, बाळासाहेब राठोड, स्मिता साळुंके तसेच सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी कौतुक केले.

# एमआयडीसीतील कंपनीत स्फोट,एका मजुराचा मृत्यू

तभा वृत्तसेवा



**लातूर दि. १७ एप्रिल :** शहरातील जुन्या एमआयडीसी परिसरातील एका कंपनीत कोटींग प्रक्रियेसाठी वापरण्यात येणाऱ्या बॉयलरचा अचानक स्फोट झाल्याची घटना गुरुवारी (दि. १६) दुपारी ४ च्या सुमारास घडली. यामध्ये कंपनीतील एका मजूराचा होरपळून मृत्यू झाला तर कंपनीचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.

शहरातील एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील जुनी एमआयडीसी परिसरात मुंदडा ट्रेडर्स ही ॲल्युमिनियम कोटिंग व ॲल्युमिनियम शीट निर्मिती करणारी कंपनी आहे. कंपनीला आग लागल्याच्या घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे अधिकारी-कर्मचारी महापालिका अग्निशमन दल व एमआयडीसी अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल करण्यात आल्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून २ तासांत आग नियंत्रणात आणून विझविण्यात यश मिळविले.

सदर घटनेमध्ये मुंदडा ट्रेडर्स या युनिटचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येत आहे. या स्फोटात काम करणारे दोन कामगार गंभीर जखमी झाले होते. त्यापैकी दत्ता बुरांगे, (रा. प्रकाश नगर, लातूर) हे मयत झाले असून अभी कुमार, मूळ रा. उत्तर प्रदेश हे गंभीर जखमी असून त्यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या स्फोटामुळे परिसरातील इतर कोणत्याही औद्योगिक युनिटला कोणतेही नुकसान झालेले नाही. घटनेच्या अनुषंगाने मनपाचे उपायुक्त डॉ. खानसोळे, फायर ऑफिसर जाधव यांना घटनास्थळी दाखल झाले होते. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर कार्यालयामार्फत फॉरेन्सिक तपासणी पथकासही पाचारण करण्यात आले होते. एमआयडीसी पोलीस ठाण्याचे अधिकारी अधिक तपास करीत आहेत.

# उपसंचालक कार्यालयासमोर शिक्षक सेनेचे आंदोलन

तभा वृत्तसेवा



**लातूर दि. १७ एप्रिल : शिक्षकांचे रखडलेले वेतन, थकित देयकांसह अशैक्षणिक कारभाराचा निषेध करण्यासाठी शिक्षक सेनेने गुरूवारी लातूरच्या शिक्षण उपसंचालक कार्यालयासमोर जोरदार आंदोलन करीत प्रशासनाच्या उदासिनतेचा निषेध केला.**

**शिक्षण विभागाच्या विसंगत निर्णयांने हजारो शिक्षक आर्थिक, मानसिक दडपणाखाली आले आहेत. वारंवार विनंती करूनही प्रश्न सुटत नसल्याने शिक्षक रस्त्यावर उतरले. यावेळी शिक्षण उपसंचालक दीपक चवणे यांना शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष शरद हुडगे यांच्यासह शिक्षक सेनेच्या पदाधिकारी, सदस्यांनी मागण्यांचे निवेदन दिले. निवेदनात अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन व वेतन थांबविणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी.**

**गेल्या २ ते ६ वर्षांपासून शिक्षकांची हक्काची देयके थकली असून, निधी उपलब्ध असूनही अधिकाऱ्यांच्या दिरंगाईने कोट्यवधींचा निधी व्यपगत झाला. शिक्षकांना बीएलओ कामातून मुक्त करावे. मार्च महिन्याचे वेतन अद्याप मिळालेले नही. परीक्षा काळात पट पडताळणी करू नये. पडताळणी सप्टेंबर ते डिसेंबर महिन्यांत करावी, यासह अन्य मागण्यांचा समावेश होता. याप्रसंगी शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष शरद हुडगे, मुनीरखान पठाण, सचिन साबणे रवी भोसले, बाळासाहेब येळापु बालाजी पांचाळ, खुदबोद्दीन, भरत कोरे, दीपव जामकर, व्यंकुराम बोनवळे बालाजी बिडवे उपस्थित होते.**

### लवकरच ग्रामसेवकांच्या प्रशासकीय बदल्या

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. १७ एप्रिल :** बहुचर्चित ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या विनंती, आपसी व प्रशासकीय बदल्यांचे प्रयोजन तयार ठेवले आहे. यंदा लवकरच बदल्या होतील. फक्त राज्य सरकार बदल्यांबाबत काय निर्देश देते, यावर असेल, अशी माहिती पंचायतचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ यांनी दिली.

राज्य सरकारने जणगनणेचा मुद्दा पुढे केला तर कदाचित बदल्या यावर्षी थांबू शकतात. केंद्र सरकारने मात्र एक पत्र काढून जणगनणेसाठी ज्या कर्मचाऱ्याची निवड झाली, त्यांना बदली प्रक्रियेतून वगळावे, असे सूचित केले आहे. आता राज्य सरकार काय निर्देश देते, याकडे पंचायत विभागाचे लक्ष लागले आहे. बदल्यांची प्रक्रिया केली तर ती १० ते १५ मेपर्यंतच करावी लागणार आहे. कारण, लातूर जिल्ह्यातील सर्व बीडीओ मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात सहभागी झालेल्या गावांची तालुकास्तरीय पाहणी करण्यासाठी २६ एप्रिलपासून पुढे वीस दिवस सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर जात आहेत.

फक्त राज्य सरकारच्या बरेच अवलंबून पत्राची उत्सुकता झाल्यातरी आहेत. बीडीओ आल्यानंतर १० ते १५ मे दरम्यान, ग्रामसेवकांच्या विनंती, आपसी व प्रशासकीय बदल्या करण्याची तयारी केली आहे, असे नमूद करून वाघ म्हणाले, बदल्या शासन पत्राच्या अधिन राहून केल्या जातील. पुढे १६ मेपासून वीस दिवस उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हास्तरीय गाव पाहणीसाठी

जिल्ह्यातील ग्रामसेवक संघटनेचे मोजके पदाधिकारी यंदा प्रशासकीय बदल्या होणार नसल्याच्या वावड्या उठवत आहेत. परंतु, त्यांची माहिती अपूर्ण आहे. जि. प.त पडीक राहणाऱ्या पदाधिकाऱ्यांनी तरी वावड्यांबद्दल पदाधिकाऱ्यांना सांगावे, अशी चर्चा आहे.

# सोन्यावरचं कर्ज : वैयक्तिक कर्जाचा नवा चेहरा ?

मजबुरीतून सुरू झालेलं हे कर्ज आज आर्थिक प्रगतीचं प्रभावी साधन कसं बनत आहे ?

योग्य वापर केलं, तर सोन्यावरचं कर्ज अडचणीतून बाहेर काढणारंच नव्हे, तर पुढे नेणारं साधन ठरू शकतं. भारतीय घरांमध्ये सोनं हे केवळ दागिना नसतो; तो विश्र्वासाचा साठा असतो. संकटाच्या वेळी उपयोगी पडणारी एक न बोलता दिलेली खात्री. पण एक काळ असा होता की घरातलं सोनं गहाण ठेवणं म्हणजे आर्थिक अडचणीची जाहीर कबुली मानली जायची.

बँका, छइत्रऊ आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्समुळे सोन्यावर कर्ज काही तासांत उपलब्ध होतं-सोपं, पारदर्शक आणि विश्र्वासार्ह.

हे कर्ज आता व्यवसाय वाढवण्यासाठी, तातडीच्या संधी साधण्यासाठी, तसेच इतर महागड्या कर्जांची जागा घेण्यासाठी वापरलं जातंहे.

वाढीमागचं वास्तव गेल्या काही वर्षांत सोन्यावरच्या कर्जात झपाट्याने वाढ झाली आहे. २०२२ पासून जवळपास ३.८ पट वाढ होऊन आज हे कर्ज घरकर्जानंतर दुसऱ्या क्रमांकावर पोहोचलं आहे.

या वाढीमागे एक महत्त्वाचं कारण म्हणजे सोन्याच्या किमतीत झालेली सातत्यपूर्ण वाढ. दर वाढल्याने त्याच सोन्यावर अधिक कर्ज मिळू लागलं आहे. याशिवाय, सोन्यावरचं कर्ज घेण्याची प्रक्रिया कमी वेळखाऊ, सोपी आणि तुलनेने कमी खर्चिक आ

२०२५ मध्ये गोल्ड लोन घेताना कर्जदारांची स्थिती ७४% - १ लाखांपेक्षा जास्त आधीच कर्ज असलेले २६% - कमी किंवा कोणतेही कर्ज नसलेले बहुतांश कर्जदार आधीच आर्थिक व्यवहारात सक्रिय आहेत- आणि गोल्ड लोन त्यांच्यासाठी पूरक साधन बनत आहे.

सोन्यावरचं कर्ज आज अनेक बाबतीत वैयक्तिक कर्जापेक्षा सोयीचं ठरतं-जलद प्रक्रिया, कमी कागदपत्रं आणि तुलनेने कमी व्याजदर.

सोनं बँकेच्या सुरक्षित ताब्यात राहतं, त्यामुळे ग्राहकाला सुरक्षिततेचीही खात्री मिळते. मालमत्तेवर कर्ज घेण्याच्या तुलनेत येथे प्रक्रिया जलद, खर्च कमी आणि तांत्रिक गुंतागुंतही कमी असते. म्हणूनच ते तारण असलेलं वैयक्तिक कर्ज म्हणून पुढे येत आहे.

बदलती कर्ज संस्कृती लातूरमधील एका छोट्या व्यावसायिकाचं उदाहरण घ्या- सुरुवातीला व्यवसायासाठी घेतलेलं सोन्यावरचं कर्ज, त्यानंतर योग्य नियोजनासोबत टॉप-अप घेऊन त्याने व्यवसाय वाढवला. ही आता अपवादात्मक गोष्ट नाही-ती एक संधी ओळखण्याची पद्धत बनत आहे. सोन्यावरचं कर्ज आता तात्पुरती मदत नसून, आर्थिक प्रवासाला गती देणारं साधन बनत आहे.

सुविधा आणि शिस्त - दोन्ही आवश्यक सोन्यावरचं कर्ज हे योग्य पद्धतीने वापरलं, तर अत्यंत प्रभावी आर्थिक साधन ठरू शकतं. तारण असल्यामुळे व्याजदर नियंत्रित राहतात आणि कर्जप्रक्रिया जलद होते. अर्थात, कोणत्याही कर्जाप्रमाणेच येथेही शिस्त आवश्यक आहे. योग्य नियोजन, वेळेवर परतफेड आणि कर्जाचा योग्य उपयोग-या तिन्ही गोष्टी लक्षात घेतल्या, तर हे कर्ज प्रगतीचं साधन ठरू शकतं.

स्पर्धेचं नवं रूप बँका गोल्ड लोन देताना वींश वळश्रळसशपलश, उत्पन्नाचा आढावा आणि कर्जाच्या वापराची पडताळणी करतात.

यामुळे अनेक ग्राहक-विशेषतः तातडीची गरज असलेले सेश्रव श्रेरप कर्जप्रक्रियेतील वेग आणि सुलभता-हीच या क्षेत्रातील वाढीची गुरुकिल्ली ठरते आहे.२.५ लाखपर्यंत - ८५% डढत २.५ ते ५ लाख - ८०% ५ लाखांपेक्षा जास्त - ७५% वाढ हवी, पण शिस्तीसह - हा त्यामागचा स्पष्ट हेतू आहे.सामाजिक बाजू भारतात सोनं मुख्यतः महिलांच्या मालकीचं असल्याने महिला कर्जदारांची भूमिका वाढत आहे.

हे आर्थिक समावेशनासाठी सकारात्मक आहे. योग्य वापरासोबत हे कर्ज महिलांसाठीही आर्थिक स्वावलंबनाचं साधन ठरू शकतं.समारोप सोन्यावरचं कर्ज भारताच्या बदलत्या आर्थिक वास्तवाचं प्रतीक आहे-सुलभ, जलद आणि सर्वांसाठी उपलब्ध.आज प्रश्न असा नाही की कर्ज घ्यावं का;प्रश्न असा आहे की ते किती सुजाणपणे घ्यावं.योग्य नियोजन, योग्य उद्देश आणि योग्य परतफेड-या तिन्ही गोष्टींचा समतोल साधला, तर सोन्यावरचं कर्ज केवळ गरज भागवणारं नसूनआर्थिक प्रगतीचं प्रभावी साधन ठरू शकतं.

**-: नवनीत भंडारी**
**व्यवस्थापकीय संचालक लातूर अर्बन को ऑप बँक लि., लातूर**

### क्रांतिवीर उमाजी नाईक पुरस्काराची प्रक्रिया सुरू

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. १७ एप्रिल :** विमुक्त जाती व भटक्या जमाती समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी कला, समाज प्रबोधन आणि साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना क्रांतिवीर राजे उमाजी नाईक पुरस्कार प्रदान करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. या पुरस्कारासाठी लातूर जिल्ह्यातील पात्र साहित्यिक, समाजप्रबोधनकार, समाजसेवक आणि संस्थांनी २० एप्रिल २०२६ पर्यंत आपले प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक अभय अटकळ यांनी केले आहे.

विहित नमुन्यातील हे प्रस्ताव तीन प्रतीत सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, लातूर या कार्यालयात सादर करणे